# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | शनिवार । दि. ४ जुलै २०२६ । अंक २८ । पृष्ठे १० । किंमत ४ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


## पाली-दर्यागाव एसटी बसला अपघात

**पाली :** पालीवरून पाच्छापूर दर्यागावला जाणाऱ्या एसटी बसचा पाच्छापूर रस्त्याला गौळमाल गावाजवळ जोरदार अपघात झाल्याची घटना घडली. एसटी बस रस्ता सोडून रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात कलंडल्याने मोठी दुर्घटना टळली असून, सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार पाली बस स्थानाकातून सुटलेली व पाच्छापूर दर्यागावला जाणारी पेण आगाराची एसटी बस क्र. एम.एच २० बी.एल ३०९७ या बसचा पाच्छापूर रस्त्याला गौळमाल गावाजवळ मोठा अपघात झाला. पान ५ वर

## आंबेनळी घाट ६ जुलैपर्यंत बंद

**रायगड :** पावसाळ्यात अतिवृष्टी, भूस्खलन, दरड कोसळणे तसेच सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने उद्भवणारा धोका लक्षात घेऊन पोलादपूर-महाबळेश्वर (आंबेनळी) राज्य महामार्ग ६ जुलै पर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी किशन जावळे यांनी जारी केले आहेत. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या कार्यकारी अभियंत्यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, पोलादपूर-आंबेनळी-महाबळेश्वर हा राज्य महामार्ग सह्याद्री पर्वतरांगेतील अत्यंत संवेदनशील, भूस्खलनप्रवण व दरडप्रवण घाट विभागातून जातो. या मार्गावरील तीव्र उतार, खोल दऱ्या, नैसर्गिक जलप्रवाह, पान ५ वर

## वेधक

### सर्पदंशाने महिला दगावली

**उरण :** तालुक्यातील डोंगरी गावातील इंदुमती नरेंद्र पाटील या महिलेला घराच्या अंगणात साप चावला असता, रुग्णालायात नेत असतानाच तिचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली आहे. तिला अतिविषारी मण्यार सापाचा दंश झाला असल्याचे सांगितले जात आहे. पावसाळी हंगामात सापांपासून बचावासाठी काळजी घेण्याचे आवाहन सर्पमित्रांकडून करण्यात येत आहे. डोंगरी गावातील इंदुमती पाटील या अत्यंत मनमिळाऊ, प्रेम स्वभावाच्या गृहिणी होत्या सर्पदंशाने त्यांचा मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. डोंगरी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. उरण हा तालुका खाडीकिनारी, डोंगर भागात वसलेला तालुका असल्याने या तालुक्यात पावसाळ्यात सर्पदंशाच्या घटना पावसाळ्यात घडत आहेत. पावसाळ्यातील हंगामात प्रामुख्याने नागरिकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे असल्याचे सर्पमित्र विवेक केणी यांनी सांगितले आहे.

## जिल्ह्यातील पाच रोप-वे प्रकल्पांना हिरवा कंदील

# रायगडचं पर्यटन झेपावणार!

### पर्यटन, रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी चालना

**। रायगड । प्रतिनिधी ।**

पर्यटन जिल्हा म्हणून देश-विदेशात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या रायगडच्या पर्यटन विकासाला आता नवे पंख मिळणार आहेत. ऐतिहासिक गड-किल्ले, जागतिक वारसा स्थळे, धार्मिक केंद्रे आणि निसर्गरम्य पर्यटनस्थळांना अधिक सुलभपणे जोडण्यासाठी राज्य शासनाने रायगड जिल्ह्यातील पाच महत्त्वाकांक्षी रोप-वे प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे पर्यटकांचा प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि सु०भ होणार असून, पर्यटनासोबतच स्थानिक रोजगार, व्यवसाय आणि अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळणार आहे.

राज्य शासनाने मंजुरी दिलेल्या प्रकल्पांमध्ये घारापुरी (एलिफंटा) लेणी, अलिबाग समुद्रकिनारा ते कुलाबा किल्ला, नेरळ ते माथेरान, रायगड किल्ल्याचा पायथा ते रायगड किल्ला आणि श्रीक्षेत्र कनकेश्वर डोंगर या महत्त्वाच्या पर्यटनस्थळांचा समावेश आहे. ऐतिहासिक, धार्मिक आणि नैसर्गिक पर्यटनाचा समन्वय साधणारे हे प्रकल्प रायगडच्या पर्यटन क्षेत्रासाठी गेमचेंजर ठरणार असल्याचे मानले जात आहे.



- घारापुरी (एलिफंटा) लेणी जागतिक वारसा स्थळापर्यंत जलद आणि सुलभ पोहोच.
- अलिबाग समुद्रकिनारा-कुलाबा किल्ला-भरती-ओहोटीवर अवलंबित्व कमी; वर्षभर सुरक्षित प्रवास.
- नेरळ- माथेरान पर्यटकांसाठी जलद, सोयीस्कर आणि पर्यावरणपूरक प्रवास.
- रायगड किल्ल्याचा पायथा-रायगड किल्ला-ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि लहान मुलांसाठी मोठा दिलासा.
- श्रीक्षेत्र कनकेश्वर (अलिबाग) धार्मिक पर्यटनाला नवी चालना.

केंद्र सरकारच्या पर्वतमाला योजनेअंतर्गत राज्यातील डोंगराळ आणि दुर्गम पर्यटनस्थळांना जोडण्यासाठी ४५ हून अधिक रोप-वे प्रकल्प प्रस्तावित करण्यात आले आहेत. त्यापैकी १६ प्रकल्प राज्य शासनाच्या माध्यमातून, तर उर्वरित २९ प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर उभारण्यात येणार आहेत. रायगडमधील पाच प्रकल्पांना मिळालेली मंजुरी ही जिल्ह्याच्या पर्यटन पान ५ वर

## पावसाने धरणे फुल्ल

### नद्यांनी धोका, इशारा पातळी ओलांडली



**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

सतत कोसळत असलेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुसळधार पावसामुळे रस्त्यांवर पाण्याचा पाट वाहात आहेत. त्याचा परिणाम वाहतुकीवर झाला आहे. सहाहून अधिक धरणे शंभर टक्के, तर १२ हून अधिक धरणांमध्ये ५० टक्क्यांपर्यंत भरली आहेत. जिल्ह्यातील प्रमुख नद्यांपैकी अंबा नदीने धोक्याची, तर कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. त्यामुळे नदीकिनारी राहणाऱ्या नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. पावसामुळे शेतकरी सुखावून गेला असला, तरी पाऊस पडल्यावर पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना हा पाऊस नकोसा झाला आहे. या पावसात पेरणीची रोपे कुजून जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

रायगड पान ५ वर

### अंबा नदीने धोका पातळी ओलांडली

जिल्ह्यातील महाडमधील सावित्री नदी, खालापूरमधील पाताळगंगा कर्जतमधील उल्हास, पनवेलमधील गाढी नद्या ओसंडून वाहात आहेत. या नद्यांमधील पाणी इशारा पातळीपेक्षा कमी आहे. मात्र, रोहा तालुक्यातील नागोठणे येथील अंबा नदीने धोका पातळी ओलांडली आहे. रोहा तालुक्यातील डोलवहाल येथील कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. या नदीकिनारी राहणाऱ्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. आपत्कालीन प्रसंगी सुरक्षित ठिकाणी तातडीने आश्रय घ्यावा, असे रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून सांगण्यात आले आहे.


## पीयूसी न काढणाऱ्यांना दणका

### सात हजार चालकांकडून १३ कोटींचा दंड वसूल

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

धुराच्या वाढत्या प्रदूषणामुळे मानवी आरोग्य धोक्यात आले आहे. पर्यावरणावरही त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे वाहनांचे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र (पीयूसी) न काढणाऱ्या चालकांना पनवेल येथील प्रादेशिक परिवहन विभागाने दणका दिला आहे.

एप्रिल २०२५ ते जून २०२६ या पंधरा महिन्यांत सात हजार ८६४ चालकांविरोधात कारवाई करून त्यांच्याकडून १३ कोटी ४४ लाख रुपयांचा दंड वसूल केला आहे.





जिल्ह्यात वाहने खरेदीचा क्रेझ वाढत आहे. वेगवेगळ्या आकाराच्या रंगाच्या दुचाकींसह अन्य वाहने बाजारात उपलब्ध आहेत. दुचाकी वाहने खरेदीसह चारचाकी, तीनचाकी व अन्य अवजड वाहने खरेदी केली जातात. पर्यटनासह औद्योगिकीकरणामुळे वाहनांची संख्याही प्रचंड वाढली आहे. मात्र, वाहन चालवित असताना प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्राकडे पान ५ वर

### प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र अद्ययावत करा

पर्यावरण रक्षणासाठी आणि कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी आपल्या वाहनांचे प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र त्वरित अद्ययावत ठेवावे. प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र अद्ययावत नसणाऱ्या तसेच रस्त्यांवर संशयास्पद वाटणाऱ्या प्रदूषक वाहनांवर कारवाई केली जाईल. त्यामुळे प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पनवेलमधील प्रादेशिक परिवहन विभागाचे प्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत चव्हाण यांनी केले आहे.

## वन्यप्राण्यांच्या अवयवांची तस्करी; एकाला अटक

**। सावंतवाडी । प्रतिनिधी ।**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ बाजारपेठ येथे 'मसुरकर जेम्स' या दुकानावर वनविभागाने छापा टाकून वन्यप्राण्यांच्या अवयवांची मोठी तस्करी उघडकीस आणली आहे. या कारवाईत ६ बिबट नखे, २० बिबट नखांचे अवयव, २ बिबटचे सुळे (दात) आणि वन्यप्राण्यांच्या शिंगापासून तयार केलेली सहा नखे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी दुकानाचा मालक अजित वसंत मसुरकर याला अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची वन कोठडी सुनावली आहे. याबाबत वनविभागाने दिलेल्या माहितीनुसार, पान ५ वर

## बंद घरात गुटख्याचं गोदाम

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

बंदी असताना खुलेआमपणे गुटख्याचा साठा बंद घरात ठेवण्यात आला होता. अलिबाग पोलिसांसह अन्न व औषध प्रशासनाने गुरुवारी (दि.२) सकाळी संयुक्तरित्या कारवाई केली. या कारवाईत एक लाख ३१ हजार ३६१ रुपयांच्या गुटख्याचा साठा आढळून आला. ही कारवाई अलिबागमधील संगम येथे करण्यात आली आहे. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अलिबागमधील ही सर्वात मोठी कारवाई आहे. त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

संगममध्ये बेकायदेशीररित्या गुटखा व अन्य तंबाखूजन्य पदार्थांचा साठा असल्याची माहिती अलिबाग पोलिसांना मिळाली. अलिबाग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रवीण पांडे यांच्यासह त्यांचे पथक तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने गुरुवारी पान ५ वर



- **एक लाख ३१ हजार ३६१ रुपयांचा मुद्देमाल जप्त**
- **अलिबाग पोलिसांसह अन्न व औषध प्रशासनाची संयुक्त कारवाई**

## महायुती सरकारला इशारा | ८ जुलैला विधानभवनावर मोर्चा

# दिबांच्या नावाचा झेंडा रोवणार!

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव देण्यास टाळाटाळ केली जात असल्याने समाजबांधवामध्ये उद्रेक उफाळून येताना दिसत आहे. रश्मिता पोपेटा हिने त्याकरिता आजही हॉस्पिटलमधूनही आंदोलन सुरूच ठेवले आहे. या पार्श्वभूमीवर येत्या बुधवारी, ८ जुलैला विधानभवनावर मोर्चाचे आयोजन केले जाणार आहे.

रश्मिता पोपेटा हिने आंदोलनाची दुसरी इनिंग सुरु केली आहे. तिने समाजाला पुन्हा एकदा दिबांसाठी आंदोलनाला चेतविले आहे. तिच्या उपोषणातून नवे वादळ विधानभवनावर धडकणार आहे. त्याकरिता लोकनेते दिबाप्रेमी नामकरण समितीच्या बॅनरखाली एकजुटीने आंदोलक रस्त्यावर उतरणार आहेत.



आंदोलनाची सुरुवात पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून महाराजांना पुष्पहार घालून रश्मिताच्या हस्ते नारळ वाढवून होईल, अशी माहिती समितीचे प्रमुख सदस्य माजी आमदार बाळाराम पाटील यांनी दिली.

पुढे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मोर्चा एसटी स्टॅण्डमार्गे कळंबोलीकडे आणि तेथून मुंबईच्या दिशेने रवाना होईल. मोर्चात सुमारे १५ हजार आंदोलक सहभागी होतील. त्याकरिता पनवेल, पान ५ वर




## जाहीर नोटीस

दिनांक ०३/०७/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे माजगाव, ता. खालापूर, जि. रायगड येथील

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्रीमती.वनिता दत्तात्रेय ढवाळकर<br>श्री. राजेंद्र दत्तात्रेय ढवाळकर<br>श्री. किरण दत्तात्रेय ढवाळकर<br>श्रीमती. सुषमा अशोक भोईर<br>श्रीमती. अरूणा अविनाश पिंगळे | ४/१/अ | ०-२४-३० | २-२६ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेले आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रियांका प्रमोद मिरकुटे**
रा. मोरबे, ता. खालापूर, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ८३६९५६४६००

## जाहीर नोटीस

दि. ०४/०७/२०२६

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे-चोची, तालुका- कर्जत, जि-रायगड**
**येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| रेवा रमेश कदम | ७४ | १० | ०.०७.०० | ०.०३ |

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासुन ०७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि. ०४/०७/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड. उत्कर्षा सुरेश सोनावळे**
पत्ता. श्रीसाई सावली अपार्टमेंट, दुसरा मजला, दिवाणी न्यायालयासमोर, विठ्ठल नगर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९०७५९९५९२८

## जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) कल्पना शशिकांत घरत, २) जनाबाई जगन्नाथ जुईकर, ३) प्रशांत जगन्नाथ जुईकर आणि ४) संजीव जगन्नाथ जुईकर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये/विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह झुंजारराव आणि कं., वकील आणि सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मिळकतीचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा रायगड व उप-जिल्हा अलिबाग, यांचे कार्यक्षेत्र मधील गाव - शहाबाज, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग २९०/२, एकूण क्षेत्र ००.३४.०० (हे.आर.चौ.मी.) आकार ४ रु. ९० पै. धारक जमिनीचे सर्व ते भाग आणि विभाग.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०४/०७/२०२६

**झुंजारराव आणि कं. करीता**
**सही-**
**विक्रांत झुंजारराव**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमूद केलेली जमीन मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक सिंधु दामोदर वार्डे यांचेसोबत चालू आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| कोप्रोली ता. अलिबाग | २२४ | ०-१५-६०<br>पो.ख. ०-०२-१०<br>एकूण ०-१७-७० | ४.९४ |

वर नमूद केलेली मिळकत जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्याची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : ०३/०७/२०२६

सही/-
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु.पो. चिंचोटी
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९२७२६२०००५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक श्री. अनिल गेणू उतेकर व सुनिल गेणू उतेकर दोघेही रा. खोपोली ता. खालापूर जि. रायगड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे गोमाशी, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| ४०५ | २-४६-० | ०-९४ |
| यापैकी मिळकत मालकाचे क्षेत्र १-१७-०० हे. आर | | |
| ४०८ | ०-३८-० | ०-११ |

वरील शेत मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतींचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतींमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकती निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०३/०७/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे चाफेवाडी, तालुका कर्जत जिल्हा रायगड, येथील शेतजमीन मिळकत त्या मिळकतीचे सामाईक मालक श्री रमेश पुरुषोत्तम कुरळे, व श्री भगवान जगन्नाथ लोंढे, यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले असून सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे चाफेवाडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड.**

| सर्वे नं | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| ५ | ३ | एकूण क्षेत्र २.२८.००<br>विकण्याचे ठरलेले क्षेत्र<br>१.१४.०० | १.५६ |

तरी सदर नमूद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा किंवा संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा आमच्या अशिलांच्या वर नमुद केलेल्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसात लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीस कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा किंवा संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही आणि असल्यास त्यांनी ते हितसंबंध आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिले असून त्यांची आमच्या अशिलांच्या वर नमूद केलेल्या व्यवहारास कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील.

मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेण्यात येणार नाही.

ठिकाण : कर्जत
तारीख : ०४/०७/२०२६

सही /-
**अधिवक्ता पौर्णिमा आनंद जाधव**
मो.नं ९७६४५४७६४३
पत्ता-मार्लव क्षिप्रा मुद्रे बुद्रुक कर्जत

# ग्रामपंचायत नवेदर नवगांव

जावक क्र. २३२ | दिनांक :-०२/०७/२०२६

ग्रामपंचायत नवेदर नवगांव हद्दीतील १५ वा वित्त आयोग आणि ग्रामनिधी अंतर्गत खरेदी करण्यासाठी खालीलप्रमाणे

| अ. क्र. | कामाचे नाव | निधीचा स्त्रोत | ग्रा.पं.मध्ये निविदा सादर करण्याचा दिनांक (पासून) | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक (पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| १. | पाण्याच्या साठवण टाकी जवळ जनरेटर खरेदी करणे | १५ वा वित्त आयोग | ०६/०७/२०२६ | १४/०७/२०२६ |
| २. | ग्रामपंचायत हद्दीत धूरफवारणी करणे | १५ वा वित्त आयोग | ०६/०७/२०२६ | १४/०७/२०२६ |
| ३. | TCLपावडर खरेदी करणे | १५ वा वित्त आयोग | ०६/०७/२०२६ | १४/०७/२०२६ |
| ४. | ग्रामपंचायत हद्दीतील महिलांना सॅनिटरी पॅड वाटप करणे | १५ वा वित्त आयोग | ०६/०७/२०२६ | १४/०७/२०२६ |
| ५. | जल शुद्धीकरण साहित्य पाणी निर्जंतुकीकरण बॉटल | ग्रामनिधी | ०६/०७/२०२६ | १४/०७/२०२६ |

**अटी व शर्ती**

१. आपली दरपत्रके कार्यालयीन वेळेतच सादर करावीत तसेच दरपत्रके बंद लिफाफ्यात देऊन आपले नांव व दर पत्रक कोणत्या वस्तू साठी आहे हे स्पष्ट लिहावे.
२. कोणतीही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार मा. सरपंच ग्रामपंचायत नवेदर नवगांव, ता. अलिबाग यांनी राखून ठेवला आहे.
३. निविदा मंजुरीअंती पुरवठादार यांस रितसर पुरवठा आदेश दिला जाईल.
४. जनरेटर हे प्राधान्याने किर्लोस्कर, कोयल, होंडा, महिंद्रा अशा प्रचलित कंपनी चे असावेत तसेच जनरेटर सोबत कॉपर वायरिंग इन्स्टॉलेशन ट्रान्सपोर्ट, केबल इ. खर्च वेगळा दिला जाणार नाही. (३ फेज करिता २५ kva, ३० kva, ३५kva, ४०kva, ४५kva दरपत्रके असावीत.)
५. सॅनिटरी पॅड हे दर्जेदार व प्रचलित कंपनीच्या असाव्यात त्यामध्ये उच्चतम दर्जा, स्वच्छता आणि मिक्स डिप ॲब्सॉर्पशन अशा वैशिष्ट्यांनी युक्त असावे expiry date कडे विशेष लक्ष दिले जाईल.
६. जल शुद्धीकरण साहित्य अथवा पाणी निर्जंतुकीकरण साहित्य अंतर्गत प्रचलित कंपनीच्या बॉटल असाव्यात. (२५ml, ५०ml, १००ml) च्या बाटलीचे दर सादर करावेत. तसेच त्यामध्ये सोडीयम हायपो क्लोराइड ची मात्रा प्रमाणित असावीत.
७. वरील खरेदी वस्तूंबाबत दरपत्रका सोबत मागील ३ महिन्यात भरलेल्या नवीनतम जी-एस-टी बिलाची कॉपी जोडणे बंधनकारक आहे. आलेली दरपत्रके व वस्तूची गुणवत्ता पाहणी करूनच पुरवठा आदेश दिला जाईल.
८. धूरफवारणी सामग्री व मनुष्य बळ सह प्रती घर परिसर बाबत दरपत्रके सादर करावीत, घरामधील अंतर कमी जास्त असल्यास त्याचे वेगळे बिल दिले जाणार नाही.
९. TCL पावडर दर पत्रकासोबत क्लोरीन च्या प्रमाणाबाबत जोडणे बंधन कारक राहील.
१०. पुरवठा आदेश दिल्यानंतर १५ दिवसांच्या आत नमूद वस्तूचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. त्यानंतर उशीर केल्यास दरदिवशी ५०० रु. प्रमाणे दंड आकारला जाईल. १५ वा वित्त आयोगाची बिले PFMS प्रणालीतूनच होतील.
११. प्राप्त निविदा दि. १५/०७/२०२६ रोजी दुपारी ठीक ३:०० वाजता ग्रा.पं. कार्यालय नवेदर नवगांव येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच अथवा त्यांनी नेमून दिलेल्या अधिकाऱ्यांच्या हस्ते उघडण्यात येईल.

दिनांक: ०२/०७/२०२६
ठिकाण ग्रामपंचायत नवेदर नवगांव

सही/-
**समिला विनोद कवळे**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत नवेदर नवगांव**

सही/-
**सरपंच**
**अंकिता प्रणय जैतू**
**ग्रामपंचायत नवेदर नवगांव**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे पालीखुर्द, ता. खालापूर, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे 'परिशिष्ट -अ' आणि 'परिशिष्ट ब' मध्ये वर्णन केलेल्या मिळकती सदर मिळकतीचे विद्यमान मालक कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान यांचेकडून कायम खरेदी घेण्याबाबत आमच्या अशिलांच्या व्यवहाराच्या वाटाघाटी सुरु आहेत.

**'परिशिष्ट-अ'**
**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे पालीखुर्द, ता. खालापूर, जि. रायगड येथील**

| भोगवटादारांची नावे | स. नं. | हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ७ | ४/अ | ०-२४.३० | ०.८१ |

**'परिशिष्ट-ब'**

'परिशिष्ट ब' मध्ये सविस्तर नमुद केलेले सर्व बिनशेती भुखंड हे मुळ स. नं. ७/२ ब, क्षेत्र ० हे. - ४५ आर. ५ चौ. मी., आकार रु.५ पै. ३४ आणि स. नं. ७/३ब, क्षेत्र २ हे.-५३ आर.४ चौ.मी., आकार रु. १८ पै. ०७ पासुन निर्माण झालेले आहेत, ते पुढीलप्रमाणे :-

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे पालीखुर्द, ता. खालापूर, जि. रायगड येथील**

| भोगवटादारांची नावे | स. नं. | प्लॉट नं | क्षेत्र आर.-चौ.मी.-से.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | १ | ०२-८७-५० | २८.७५ |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | २ | ०३-०२-५० | ३०.२५ |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ३ | ०३-२४-५० | ३२.४५ |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ४ | ०३-४६-५० | ३४.६५ |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ५ | ०३-३१-५० | ३३.१५ |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ६ | ०२-६६-५० | २६.६५ |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ७ | ०३-२५-०० | ३२.५० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ८ | ०३-८५-०० | ३८.५० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ९ | ०२-०१-५० | २०.१५ |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | १० | ०१-९२-५० | १९.२५ |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ११ | ०१-४२-५० | १४.२५ |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | १२ | ०१-१७-०० | ११.७० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | १३ | ०३-६२-०० | ३६.२० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | १४ | ०३-२५-०० | ३२.५० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | १५ | ०२-०७-५० | २०.७५ |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | १६ | ०१-७०-०० | १७.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | १७ | ०१-२५-०० | १२.५० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | १८ | ०१-९८-०० | १९.८० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | १९ | ०१-९४-०० | १९.४० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | २० | ०१-९५-०० | १९.५० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | २१ | ०१-७८-०० | १७.८० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | २२ | ०१-४०-०० | १४.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | २३ | ०१-५४-०० | १५.४० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | २४ | ०२-०५-०० | २०.५० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | २५ | ०२-०५-०० | २०.५० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | २६ | ०२-००-०० | २०.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | २७ | ०२-१६-०० | २१.६० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | २८ | ०२-७५-०० | २७.५० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | २९ | ०१-८६-०० | १८.६० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ३० | ०१-८०-०० | १८.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ३१ | ०२-५२-०० | २५.२० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ३२ | ०२-८८-०० | २८.८० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ३३ | ०३-९१-५० | ३९.१५ |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ३४ | ०२-८३-०० | २८.३० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ३५ | ०३-६०-०० | ०३.६० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ३६ | ०५-२०-०० | ५२.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ३७ | ०५-६७-०० | ५६.७० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ३८ | ३०-६१-५० | ३०६.१५ |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ३९ | १५-२०-०० | १५२.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ४० | १११-३६-०० | १११३.६० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | ४१ | ०१-६०-०० | १६.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/१ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/२ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/३ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/४ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/५ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/६ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/७ | ००-४६-०० | ०४.६० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/८ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/९ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/१० | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/११ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/१२ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/१३ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/१४ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/१५ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/१६ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/१७ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/१८ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/१९ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/२० | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/२१ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/२२ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/२३ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/२४ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/२५ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/२६ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/२७ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/२८ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/२९ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/३० | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/३१ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/३२ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/३३ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/३४ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/३५ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/३६ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/३७ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/३८ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/३९ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/४० | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/४१ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/४२ | ००-४९-० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/४३ | २०-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/४४ | २०-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/४५ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/४६ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/४७ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/४८ | ००-४८-०० | ०४.८० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/४९ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/५० | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/५१ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/५२ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/५३ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/५४ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/५५ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/५६ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/५७ | ००-४९-०० | ०४.९० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/५८ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एल/५९ | ००-५०-०० | ०५.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/१ | ०१-००-०० | १०.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/२ | ००-९२-०० | ०९.२० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/३ | ०१-००-०० | १०.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/४ | ०१-००-०० | १०.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/५ | ०१-००-०० | १०.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/६ | ०१-००-०० | १०.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/७ | ०१-००-०० | १०.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/८ | ००-९४-०० | ०९.४० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/९ | ००-९८-०० | ०९.८० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/१० | ०१-००-०० | १०.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/११ | ००-९०-०० | ०९.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/१२ | ००-९५-०० | ०९.५० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/१३ | ००-९२-०० | ०९.२० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/१४ | ००-९०-०० | ०९.०० |
| कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान | ११ | एम/१५ | ००-९०-०० | ०९.०० |

त्याअर्थी सदर संबंधित व्यक्ती व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा - कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील कॅप्टन अवतेजिंदरसिंग मान यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. /०७/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को. ऑप हौ. सोसा. लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि. रायगड.
मोबाईल नं. ९३२५००४००८
Email: tushar.deore82@gmail.com

## KTSPM'S LAW COLLEGE KHOPOLI.(UNAIDED)

1. Applications are invited for the following teaching staff posts with relevant qualifications and experience as per university of Mumbai.

| Sr no | Post/Position | Vacancies |
|---|---|---|
| 1 | Assistant Professor Full time | 2 |

"**Qualifications, Pay scales and other requirements should be as prescribed by university of Mumbai.** Applicants are required to accounts for breaks, if any in their academic career.

Applications with full details should reach to the **CHAIRMAN, KHALAPUR TALUKA SHIKSHAN PRASARAK MANDAL'S LAW COLLEGE, KHOPOLI.** At.post. khopoli. tal: khalapur, Dist:Raigad-410203. Within 10 days from the date of publications of this advertisement.

Sd/-
**(S. G. Jangam)**

## जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक श्री. वसंत हिरू मुने, जनार्दन हिरू मुने, व संगिता भालचंद्र सोनावने यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे - बार्णे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन**

| भुमापन क्र. | उपविभाग क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.-पै |
|---|---|---|---|
| ३८ | १ | ०.९०.०० पो.ख. ०.०१.३० एकूण ०.९१.३० पैकी लिहून देणार यांचे मालकीचे ०.३०.०० क्षेत्र मिळकतीचे | २.७५ |

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत.
दिनांक : ०४/०७/२०२६

**ॲड. मोनाली रामदास हजारे**
एम. कॉम. एल. एल. बी.
पत्ता: दहिवली, ए. व्ही. एफ. रेसिडेन्सी, ललानी रोड, कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं. ९२६०१०९२८२

## रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग
### ता. अलिबाग, जि. रायगड

आर डी सी सी बँक

जा.क्र. १८५९ | दिनांक २ जुलै २०२६

**नोटीस मसुदा**

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. अलिबाग या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकांना सूचित करण्यात येते की, आपल्या सहकारी संस्थेच्या संचालक मंडळातील भटक्या जमाती/विमुक्त जमाती/विशेष मागास प्रवर्ग व महिला या प्रवर्गातील/मतदार संघातील संचालक/संचालकांच्या निवडीकरीता अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १० जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग, केंद्र कार्यालय, चौथा मजला संचालक मंडळ सभागृह या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे. सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. सभेत नैमित्तिकपणे रिक्त झालेली पदे निवडीसाठी खालील निवडणूक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यात येणार आहे.

**निवडणूक कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशिल | वेळ |
|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र वाटप व स्विकृती | सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० |
| २ | नामनिर्देशन पत्र छाननी | दुपारी १२.०० ते दुपारी १२.३० |
| ३ | वैध नामनिर्देशन पत्राची यादी प्रसिद्धी | दुपारी १.०० |
| ४ | नामनिर्देशन पत्र माघार | दुपारी १.०० ते दुपारी १.३० |
| ५ | अंतिम उमेदवाराची यादी जाहीर करणे | दुपारी १.३० |
| ६ | मतदान प्रक्रिया | दुपारी २.०० ते दुपारी २.३० |
| ७ | मतमोजणी प्रक्रिया | दुपारी २.३० ते दुपारी ३.०० |
| ८ | निवडून आलेल्या पदाधिकाऱ्यांबाबत निकाल घोषित करणे. | दुपारी ३.०० |

टिप :- निवडणूक कार्यक्रमातील वेळेत फेरबदल करण्याचे अधिकार अध्यासी अधिकारी यांचे राहतील.

सही/-
(मा. अध्यासी अधिकारी यांचे मान्यतेने)
दिनांक : २ जुलै २०२६
ठिकाण : अलिबाग

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी

## जाहीर नोटीस

दिनांक : ०२/०७/२०२६

मौजे रजपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालीलप्रमाणे नमूद जमीन/मिळकत आमचे अशील संबंधित मालकांकडून कायम खुशीने खरेदी घेण्याचे उभयतांमध्ये ठरले आहे.

तरी सदर मिळकतीवर अथवा तिच्या हक्कासंबंधी कोणत्याही व्यक्तीचा, संस्थेचा, सोसायटीचा, कंपनीचा किंवा कुटुंबाचा वहिवाट, परवाना, करार, खरेदी, इजमेंट, कब्जा, गहाण, दान, मृत्युपत्र, पोटगी, हिस्सा, विनिमय, बोजा, भागीदारी, भाडेपट्टा, मालकी हक्क किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध अथवा दावा असल्यास, तसेच सदर व्यवहारास कोणाची हरकत असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खाली सही करणारे खरेदी घेणारे यांचे वकील यांचेकडे संबंधित पुराव्यांसह लेखी स्वरूपात कळवावे.

अन्यथा, विहित मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जमीन/मिळकत निर्वाद, निर्वेध व निर्जोखमी असल्याचे तसेच ज्या कोणाचा हक्क असेल त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील.

यानंतर प्राप्त होणारी कोणतीही हरकत किंवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही तसेच ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ट**

| गाव/मौजे | सर्व्हे नं./हिस्सा | क्षेत्र हे.आर | आकारणी (रु.पैसे) | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| रजपे | ४४/२ | ०-८९-१० | १.७९ | कौशील राजेन शाह,<br>गोपाल गिरधारी रहेजा,<br>प्रवीण गोब्बूर,<br>विनीत हरेश मतलानी |

स्थळ : कर्जत
दिनांक : ०२/०७/२०२६

**ॲड. मनीषा समीर चिटणीस**
नोटरी, भारत सरकार
ओजस, रो हाऊस क्र.२, लक्ष्मण नगर,
बालेवाडी, पुणे - ४११०४५
मोबाईल : ९८८१९०८२४१
ई-मेल: docs@legalassure.in

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे तळे, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, विद्यमान मालक श्रीमती कविता जगदीश मुखी उर्फ कविता संजीव मुखर्जी त्यांच्याकडून सर्व हक्कांसहीत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे व सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची खात्री मालकानी दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे. | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे तळे, ता. मुरुड | ४०/१३ | ०-२३-००<br>०-५०-००<br>एकुण ०-७३-०० | ०.१६ |

वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, अधिकार अगर खरेदी, साठेकरार, दान, पोटगी, वाटप, मृत्युपत्र, कुळहक्क, दावा, वहिवाट, अगर इतर कोणताही बोजा अगर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

वरील मुदतीत कोणाचीही तक्रार, हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध मालकीची व बोजारहीत आहे असे समजून खरेदीचा व्यवहार पुर्ण केला जाईल व नंतर येणाऱ्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहाणार नाहीत ही नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक ०३/०७/२०२६

**ॲड. महेश एस म्हात्रे**
ऑफीस नं. १, शिवराम भास्कर बिल्डींग, बाजारपेठ रोड, केळकर नाका, अलिबाग
मो.नं.-९२२६८४७०७७

# खारपाडा टोलनाक्यावर आंदोलन

## भर पावसातही नागरिकांचा निर्धार कायम; शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी

| चिरनेर | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम अद्याप पूर्ण झालेले नसताना सुरू असलेली टोल वसुली आणि महामार्गाच्या अनेक ठिकाणची निकृष्ट व धोकादायक रस्त्याची गुणवत्ता या गंभीर प्रश्नांकडे शासनाचे आणि लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी आज खारपाडा टोलनाक्यावर भर पावसात शांततापूर्ण लक्षवेधी आंदोलन करण्यात आले.




मुसळधार पाऊस सुरू असतानाही नागरिकांनी मोठ्या निर्धाराने या आंदोलनात सहभाग घेतला. हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाचे नसून, समस्त कोकणातील जागरूक नागरिकांचे आंदोलन आहे. सुरक्षित, दर्जेदार आणि पूर्णत्वास गेलेला महामार्ग मिळावा, तसेच तोपर्यंत टोल वसुली थांबवावी, ही या आंदोलनामागील प्रमुख मागणी आहे.

आंदोलनातून कोकणातील सर्व पक्षीय विद्यमान व माजी खासदार, आमदार आणि लोकप्रतिनिधींना नम्र विनंती करण्यात आली आहे की, महामार्गावरील टोल वसुलीचा प्रश्न आणि रस्त्याच्या गुणवत्तेचा प्रश्न सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात ठामपणे मांडावा. हा विषय केवळ उपस्थित करून न थांबता, शासनाकडून ठोस निर्णय होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा करावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. हा महामार्ग कोकणवासीयांच्या दैनंदिन जीवनाशी, अर्थकारणाशी आणि सुरक्षित प्रवासाशी निगडित अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. त्यामुळे हा प्रश्न पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन जनहिताचा विषय म्हणून हाताळण्याची गरज आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

रस्ता पूर्ण आणि दर्जेदार होईपर्यंत टोल वसूली अन्यायकारक आहे, अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली. या प्रश्नावर शासनाने तातडीने सकारात्मक भूमिका घ्यावी आणि लोकप्रतिनिधींनी जनतेचा आवाज विधिमंडळात बुलंद करावा, अशी अपेक्षा आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

या आंदोलनात ज्येष्ठ साहित्यिक एल. बी. पाटील, नरेश पाटील, नंदकुमार जांभूळकर, निरंकार पाटील, कमलेश ठाकूर, अजय भोईर, वैभवी म्हात्रे, अरुण ओतकर, रस्ते अभ्यासक चैतन्य पाटील, तसेच अनेक सुजाण नागरिकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून आंदोलनाला सक्रिय पाठिंबा दिला तसेच कोकणासह राज्याच्या विविध भागांतील अनेक नागरिकांनी, पत्रकार यांनी सोशल मीडिया व अन्य माध्यमांद्वारे ऑनलाइन सहभाग नोंदवत या आंदोलनाशी एकात्मता व्यक्त केली.

या लक्षवेधी आंदोलनासाठी पनवेल तालुका पोलीस ठाण्याने घालून दिलेल्या अटी, नियम व सूचनांचे काटेकोर पालन करण्यात आले. हे लक्षवेधी आंदोलन शांततापूर्ण व सुव्यवस्थित पद्धतीने पार पडले. आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

या लक्षवेधी आंदोलनाच्या माध्यमातून जागरूक नागरिकांनी आपले कर्तव्य पार पाडले आहे.

### प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी पाठपुरावा

भर पावसात सुरू झालेले हे लक्षवेधी आंदोलन म्हणजे केवळ निषेध नसून, कोकणातील लाखो प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि न्याय्य हक्कांसाठी दिलेली शांततापूर्ण पण ठाम हाक असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहोचेपर्यंत हा पाठपुरावा सुरूच राहील, असा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

आता लोकशाही व्यवस्थेतील लोकप्रतिनिधींनी आपली जबाबदारी ओळखून महामार्गावरील टोल वसुली आणि रस्त्याच्या गुणवत्तेचा प्रश्न सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनात ठामपणे मांडावा आणि तो प्रश्नमार्गी लागेपर्यंत सातत्याने पाठपुरावा करावा, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

# निवडक



## मुरुड नगरपरिषदेकडून निचऱ्याची व्यवस्था

**आगरदांडा :** मुरूड शहरातील श्रीवर्धनकर गल्ली जवळ मुसळधार पावसामुळे गटार तुंबून त्यातील पाणी रस्त्यावर आल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. स्थानिक नगरसेवक आदेश दांडेकर, तमीम ढाकम यांना घटनेची माहिती मिळताच तातडीने नगरपरिषदेचे कर्मचारी अभी चांदोरकर व जेसीबी चालक मुकादम यांना तातडीने घटनास्थळी येऊन जेसीबीच्या साहाय्याने गटारीत साचलेली माती व गाळ काढून गटाराची स्वच्छता केली. त्यामुळे पाण्याचा निचरा सुरळीत झाला आणि रस्त्यावर साचलेले पाणी ओसरल्याने नागरिकांना दिलासा मिळाला. मुरुड जंजिरा नगरपरिषदेच्या या तातडीच्या कार्यवाहीमुळे परिसरातील वाहतूक आणि जनजीवन पूर्ववत झाले.



## आंबेवाडीतील रस्त्याला तलावाचे स्वरूप

**कोलाड :** मुंबई-गोवा महामार्गाच्या आंबेवाडी नाक्यावरील नव्याने सुरु असलेल्या उड्डाण पुलाखाली रस्त्याला सुरवातीच्या पावसातच तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. यातून मार्ग काढतांना वाहन चालकांसहित प्रवाशी वर्गाची तारांबल उडत असून यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे संबंधितांनी लक्ष देऊन काम करण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे. गेली तीन चार दिवस पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे आंबेवाडी बाजारपेठेतील रस्त्यावरील बायपास रस्त्यावर ठिकठिकाणी रस्ता उखडले आहेत. शिवाय नव्याने बांधण्यात आलेल्या पुलाखाली रस्ता उखडून या रस्त्याला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. यामुळे आंबेवाडीतून रोह्याकडे जाणाऱ्या-येणाऱ्या वाहन चालकांना वाहन चालवितांना प्रचंड खबरदारी घ्यावी लागत आहे. या भागात वाहने हळू चालवावी लागत आहे. यामुळे वाहतूक कोंडी होतांना दिसत आहे. महामार्गाच्या मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या कोलाड आंबेवाडी येथील आजूबाजूच्या ठिकाणी असणाऱ्या ७० ते ७२ खेडेगावातील वाडया वस्त्यावरील असंख्य नागरिक बाजारासाठी येत असल्याने येथे नागरिकांची मोठी वर्दल सुरु असते. तसेच धाटाव एमआयडीसी, रोहा, अलिबाग आदी ठिकाणी जाणाऱ्या येणाऱ्या वाहनांची देखील प्रचंड मोठ्या प्रमाणात वर्दल सुरु असते. यामुळे उखडलेल्या रस्त्याला तलावाचे स्वरूप प्राप्त झाल्यामुळे याचा वाहतुकीवर परिणाम होत आहे.

## धोकादायक इमारतीवर कारवाईची मागणी

**नवीन पनवेल :** पनवेल शहरातील विरूपाक्ष मंदिर जवळील मनिष मार्केट, श्री कलेक्शनच्या दुकानाच्या पाठीमागील बाजुस सुमारे १०० वर्षे जुनी चाळ बांधकाम आहे. चाळ बांधकामाच्या जवळपास सर्व भिंतीना मोठमोठे तडे गेले असून ते घर कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता आहे. सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे ही परिस्थिती अधिक गंभीर झाली असून नागरीकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. धोकादायक व जीर्ण अवस्थेतील जुन्या इमारतीची तत्काळ पाहणी करून आवश्यक कारवाई करण्याची नईम मन्सुरी यांनी पालिकेकडे मागणी केली आहे. या ठिकाणी दररोज दुकानात येणाऱ्या ग्राहकांची, स्थानिक नागरीकांची तसेच रस्त्याने ये-जा करणाऱ्या नागरीकांची मोठया असते. ते घर कोसळल्यास मोठी जीवीतहानी व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर धोकादायक घराची तत्काळ पाहणी करून संबंधीत मालकास आवश्यक त्या सुचना देण्यात याव्यात तसेच महानगरपलिकेच्या नियमांनुसार योग्य कारवाई करण्याची मागणी मन्सुरी यांनी केली आहे.

## मतदार यादी पुनर्निरिक्षण कार्यक्रम

**नेरळ :** मतदार यादी पुनरीक्षण राष्ट्रीय कार्यक्रम अंतर्गत माथेरान शहरात मतदार यादी पुनर्निरिक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. मतदार यादी सदोष करण्यासाठी मतदार यादी पुनर्निरिक्षण राष्ट्रीय कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीमध्ये मतदार यादी पडताळणी केली जाणार आहे. करावयाची असल्याने प्रत्येक मतदाराचा फॉर्म भरायचा आहे. त्यासाठी प्रत्येक मतदाराचे दोन पासपोर्ट साईज रंगीत फोटो, आधारकार्ड याप्रमाणे कागदपत्रे तयार करून ठेवावीत आणि मोबाईल नंबर आवश्यक आहे. एसआयआर फॉर्म ज्या मतदाराचा भरला जाणार नाही अशा मतदाराचे नाव मतदार यादीतून कमी होईल. सदर कामासाठी निवडणूक आयोगाने बीएलओ म्हणून माथेरान शहरात लक्ष्मण ढेबे संत रोहिदास नगर, पंचशील नगर, वाल्मिक नगर, मंकी पॉईंट विभाग संपर्क क्र. ९४२१९२६६०८ तर सचिन भोईर इंदिरा गांधी नगर, मुस्लिम मोहल्ला,सेट विला नाका विभाग, मेरी लाईन विभाग संपर्क क्र. ८९८३०९४९३२ या भागातील मतदारांच्या नोंदी ठेवणार आहेत.

### अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनतर्फे

# ‘वटपौर्णिमा’ विषयावर फोटोग्राफी स्पर्धा

| अलिबाग | प्रतिनिधी |

रायगड फोटोग्राफर अ‍ॅण्ड व्हिडीओ ग्राफर असोसिशनशी संलग्न असलेल्या अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने वटपौर्णिमा सणाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी ‘वटपौर्णिमा’ या विषयावर आधारित भव्य फोटोग्राफी व रील मेकिंग स्पर्धा उत्साहात पार पडली. गोकुळेश्वर तलाव येथे ही स्पर्धा आयोजित आयोजित केली होती. तालुक्यातील १४ फोटोग्राफर आणि ८ रील स्टार या स्पर्धेत सहभागी झाले होते. मेकअप आर्टिस्ट मृणाली कांबळे, ड्रेस डिझायनर प्रितेश भगत यांनी तयारी केलेल्या सृष्टी पाटील, अर्पिता कवजी या माडेलचे फोटोग्राफर्सनी काढलेल्या फोटोच्या प्रिंट आणि रील हॉटेल गुरुप्रसादच्या सभागृहात परीक्षणासाठी लावण्यात आले होते.



संदीप वाटवे, नितीन पाटील यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले. फोटोग्राफी स्पर्धेत अक्षय सुतार प्रथम क्रमांक, निशांत मढवी द्वितीय, विराज घरत याने तृतीय क्रमांक पटकवला. रील स्पर्धेत निशांत मढवी याने प्रथम क्रमांक, कल्याण पाटील द्वितीय आणि मयुरेश पाटील याने तृतीय क्रमांक पटकवला. विजयी स्पर्धकांना संदीप गायकवाड, रायगड फोटोग्राफर अ‍ॅण्ड व्हिडीओ ग्राफरअसोसिएशनचे उपाध्यक्ष समीर मालोदे, खजिनदार जितेंद्र मेहता अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष तुषार थळे, उपाध्यक्ष राकेश दर्पे, कार्याध्यक्ष सुदेश माळी, विकास पाटील, विवेक पाटील, ज्येष्ठ फोटोग्राफर सुरेश खडपे, सचिन आसराणी, अतुल वर्तक यांच्या हस्ते गौरविण्यात आले. अलिबाग फोटो असोसिएशनचे विजय पाटील, विराज घरत, वैभव शिंदे, दीपेश पाटील, सुमित मालोदे, सुरेश पाडावे, राजेश पाटील आदी मान्यवर उपस्थित होत. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अमर मढवी, निलेश दुदम यांनी मेहनत घेतली.

# अलिबाग-मुरुड मेडिकल असोसिएशनचा सेवाभावी उपक्रम

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त अलिबाग-मुरुड मेडिकल असोसिएशनतर्फे आत्मनिर्भर स्पेशल चाईल्ड स्कूल, आरसीएफ कॉलनी, अलिबाग येथे सेवाभावी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रख्यात न्युरोसर्जन डॉ. कृष्णमूर्ती कोकणकर यांनी शाळेतील ५० विशेष मुलांची मोफत आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना खाऊ, शालेय साहित्य आणि चॉकलेटचे वाटप करण्यात आले.

यावेळी अलिबाग-मुरुड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील यांनी आत्मनिर्भर स्पेशल चाईल्ड स्कूलच्या कार्याचे कौतुक केले. विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था अत्यंत समर्पितपणे कार्य करत असून अशा सेवाभावी संस्थांना समाजातील सर्व स्तरांतून सातत्याने सहकार्य व पाठबळ मिळणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले. या उपक्रमास लायन्स क्लब, अलिबाग यांनीही मोलाचे सहकार्य केले. यावेळी अलिबाग-मुरुड मेडिकल असोसिएशनचे डॉ. अमित बेनकर, डॉ. आदेश मोकल, डॉ. रेखा म्हात्रे व डॉ. सोनाली नाईक, डॉ. समीर धामणकर, डॉ. निशिकांत ठोंबरे, डॉ. भूषण शेळके, डॉ. अमोल ठाकूर व डॉ. भाग्यश्री धातावकर, डॉ. अमृता गवळी व डॉ. रश्मी गंभीर, तसेच डॉ. वैभव भगत, आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे अभ्यास शिबीर

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

आयटक प्रणित, महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे राज्यस्तरीय अभ्यास शिबीर नुकतेच अलिबागमध्ये झाले. जिल्हाध्यक्ष कॉ. मंगेश म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शिबिराचे उदघाटन डॉ. राजेंद्र गोरे यांनी केले प्रमुख वक्ते म्हणून प्रा. कॉ. तानाजी ठोंबरे, कॉ. नामदेव चव्हाण, कॉ. राहुल जाधव होते. या शिबीराला प्रमुख उपस्थिती कॉ. सुहासिनी मोकाशी,कॉ. मिलींद गणवीर यांची होती.

पुरोगामी-सामाजिक कार्यकर्त्या इंजिनिअर कॉ. मोहिनी गोरे (ठोंबरे) यांनी मार्गदर्शन केले. शिबिराच्या पहिल्या सत्रात प्रा. कॉ. तानाजी ठोंबरे यांनी मार्क्सवाद व फुले, शाहू, आंबेडकर या विषयावर मार्गदर्शन केले. कामगार कायदयाचे अभ्यासक अ‍ॅड. राहुल जाधव यांनी बदलते कामगार कायदे आणि संघटनेचे महत्व या विषयांवर मार्गदर्शन केले.

शिबीराच्या दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. तानाजी ठोंबरे यांनी जात, वर्ग व समाज या विषयावर सांगितले, कीजात आणि धर्म या पलिकडे जाऊन कामगारांनी वर्गीय जाणीव जागृत करणे आवश्यक आहे. कॉ.



नामदेव चव्हाण यांनी सरकारचे कामगार विरोधी आर्थिक धोरण या विषयांवर अभ्यासपुर्ण मार्गदर्शन केले. शिबीराच्या अंतिम सत्रानंतर महासंघाचे पदाधिकारी आणि निमंत्रित सदस्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत संघटनात्मक विषयांवर सविस्तर चर्चा करून पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात आली.

यावेळी कॉ. सखाराम दुर्गुडे, ए. बी. कुलकर्णी, बबन पाटील, शाम चिंचणे, निळकंठ ढोके, उज्वल गांगुर्डे, गोविंद म्हात्रे, चत्रुघ्न लांजेवार, सचिन गाडेकर, संतोष चव्हाण, अरुण देसाई, रमेश तांडेल, विजय कदम आदी पदाधिकारी व राज्य कार्यकारिणी सदस्यासह राज्याच्या अनेक जिल्हयातून आलेले प्रशिक्षणार्थी-ग्रामपंचायत कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अलिबागकरानी अनुभवली सुरेल संध्याकाळ

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

संगीत मनांचा ठाव घेत.. संगीत जे मनात रुंजी घालत.. गीत जे आपल्या ओठांवर सहज तरळत...असे गीतसंगीत जर कानावर पडले तर रसिक मंत्रमुग्ध झाल्या खेरीज राहत नाही. याचा अनुभव नुकताच अलिबागेत आला. एम .पी आयोजित आणि सिंगिंग स्टार्स संचलित गाणी म नामनातील हा जुन्या मराठी आणि हिंदी गीतांचा सुरेख आणि सुरेल नजराणा घेऊन आलेली संध्याकाळ अलिबागकरांनी अनुभवली.

**■ एम. पी आयोजित गाण्यांचा कार्यक्रम**

अलिबाग शहरात गेली वर्ष कराओकेच्या माध्यमातून अनेक कार्यक्रम पार पडले. यामध्ये विशेषतः जुन्या, नव्या हिंदी चित्रपट गीतांचा अधिक समावेश होता. मराठी गीतांचे मोजकेच कार्यक्रम घेण्यात आले. एम.पी आयोजित गाणी मनामनातील या कार्यक्रमात देखील काही मोजक्याच हिंदी गीतांचा समावेश करण्यात आला होता. कार्यक्रमात अशा मराठी गीतांचा समावेश होता,की ती गाणी फार जुनी आणि क्वचितच कानावर पडत असतात. त्या मध्ये काय बाय सांगू..कस ग सांगू..तसेच लटपट लटपट, बुगडी माझी सांडली .. पदावरती जरातरीचा...बाई सुया घे ग.. दाभण घे...या अवीट गोडीच्या गीतांचा समावेश होता. उपस्थित रसिक प्रेक्षकांनी ही गाणी ऐकून आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. या संगीत रजनीचा आस्वाद घेण्यासाठी राजकिय, सामाजिक अशा सर्वच क्षेत्रातील मंडळी आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ख्यातनाम गीतकार जगदीश खेबुडकर यांचे सुपुत्र मुकुल खेबूडकर यांनी ग साजणी..कुण्या नावाची..कुण्या राजाची..हे गीत सादर करून आपल्या वडिलांच्या गीताला उत्तम न्याय दिला. ज्येष्ठ गायिका माधुरी नाईक यांनी गणेश वंदना गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली.रसिकांचा मिळालेला प्रतिसाद आणि त्यांच्या कडून मिळणारी दाद ही कार्यक्रमाची उंची वाढवत होती. विशेष म्हणजे या कार्यक्रमात गाणारे हौशी कलाकार होते.

# खोपोलीत आपत्कालीन परिस्थितीवर मार्गदर्शन

| खोपोली | प्रतिनिधी |

खोपोली पोलीस ठाण्याच्या वतीने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर विविध आपत्कालीन परिस्थितींना सामोरे जाण्यासाठी विशेष मार्गदर्शन व प्रात्यक्षिक शिबिराचे आयोजन करण्यात आले. उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल यांच्या अध्यक्षतेखाली महाराजा मंगल कार्यालय येथे पार पडलेल्या या शिबिरातून आपत्तीसमयी त्वरित प्रतिसाद, संसाधनांची उपलब्धता आणि विविध यंत्रणांमधील समन्वय अधिक सक्षम करण्याचा हेतू स्पष्ट करण्यात आला. यावेळी

पावसाळ्यात उद्भवू शकणाऱ्या पूर, दरड कोसळणे, भूस्खलन, औद्योगिक आपत्ती, महामार्गावरील अपघात अशा विविध संकटांमध्ये कोणती उपाययोजना करावी, यावर शिबिरात विशेष भर देण्यात आला.

यावेळी खोपोली नगरपालिकेचे उपमुख्याधिकारी रणजीत पवार, परिवहन सभापती किशोर पाटील, हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर, पद्माकर गायकवाड, सचिन घरत यांनी आपत्कालीन प्रसंगी येणाऱ्या अडचणी, त्यावर मात करण्याचे मार्ग, आवश्यक समन्वय आणि सर्व घटकांनी एकत्रितपणे कसे कार्य करावे याविषयी मार्गदर्शन केले.

या शिबिरात खोपोली पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी, खोपोली नगरपालिका अग्निशमन दल, हेल्प फाउंडेशन, यशवंती हायकर्स, पोलीस पाटील, महिला दक्षता समिती, पोलीस मित्र संघटना आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नेरळ कळंब राज्यमार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य

| नेरळ | प्रतिनिधी |

माथेरान नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्याचे काँक्रीटीकरण आणि रस्त्याच्या दुतर्फा संरक्षण भिंत बांधण्याचे काम सुरू आहे. या रस्त्याच्या बाजूला नेरळ परिसरात काँक्रीटीकरणाचे काम सुरू झाले पण दोन महिन्यानंतर त्या ठिकाणी कोणतेही काम करण्यात आले नाही. त्यामुळे खोदण्यात आलेला चांगला रस्ता पावसाळ्यात वाहनचालक यांच्यासाठी धोकादायक बनला आहे. दरम्यान, रस्ता खोदण्यात आल्याने हुतात्मा हिराजी पाटील नगर समोरील रस्ता नदी सारखा बनला आहे.

माथेरान नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एमआरआयडीसीकडून करण्यात येत आहे. या रस्त्यावर धामोतेपासून कोदीवले भागातील रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. मात्र, त्याचवेळी नेरळ ग्रामपंचायत भागातील रस्ता काँक्रीटीकरण करण्यासाठी खोदण्यात आले. त्यावेळी लगेच रस्त्याचे काँक्रीटीकरण केले जाईल असे अपेक्षित होते. परंतु, गेली दोन महिने रस्ता तयार करण्यासाठी खोदलेल्या भागातील रस्ता बनविला गेला नाही. खड्ड्याच्या परिणाम पाऊस सुरू झाल्यानंतर रस्त्यात खड्डा बनला आहे. हा खड्डा जवळपास ५० फूट लांब असा असून हा खड्डा वाहनचालक यांच्यासाठी डोकेदुखी बनला आहे. त्यामुळे त्या खराब रस्त्यामुळे हा रस्ता वाहनचालकांचे वेळ घेणारा ठरत आहे.

### प्रशासनाचा शहरवासीयांच्या जीवाशी खेळ | तळा नगरपंचायत प्रशासनाचा ढिम्म कारभार

# तळ्यातील डम्पिंग ग्राऊंडचे स्थलांतर रखडले

| तळा | प्रतिनिधी |

तळा शहरातील डम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला असून कित्येक वर्षांपासून करण्यात येणाऱ्या या डम्पिंग ग्राऊंडचे स्थलांतर अद्यापही रखडलेल्या अवस्थेत असल्याने तळा नगरपंचायत प्रशासनाच्या ढिम्म कारभाराबाबत तळा शहरवासीयांकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

तळा नगरपंचायतीने डम्पिंग ग्राऊंडची व्यवस्था मालकीच्या तळा धरणाजवळ केली आहे. शहरातील सर्व गोळा केलेला ओला व सुका कचरा एकत्रित या ठिकाणी टाकला जातो.



मात्र, या डम्पिंग ग्राऊंडसभोवती संरक्षक भिंत न बांधल्यामुळे मोकाट गुरे, कुत्रे व पक्षांनी तो पसरला जात आहे. यामुळे या परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरलेली असते जवळच तहसिल कार्यालय असल्याने जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना या दुर्गंधीचा सामना करावा लागतो. तसेच डम्पिंग ग्राऊंड शेजारीच निम्म्या शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी बोअरवेल मारण्यात आली आहे.

डम्पिंग ग्राऊंडवर टाकलेला हा कचरा कुजून घाण पाणी जमिनीत मुरले जात असल्याने याचा परिणाम मानवी आरोग्यावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नगरपंचायत प्रशासनाकडून शहरवासीयांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. या डम्पिंग ग्राऊंडचे स्थलांतर शहरातील आंबेळी येथे नगरपंचायतीच्या मालकी हक्क असलेल्या जागेत होणार असल्याचे नगरपंचायत प्रशासनाकडून सांगितले गेले होते. त्यानुसार त्या ठिकाणी काम ही पूर्ण करण्यात आले आहे.

मात्र, अद्यापही धरणा शेजारीच शहरातील कचरा टाकण्यात येत आहे. यामुळे तळा शहरातील कचऱ्याची समस्या बिकट होत चालली असून सदर डम्पिंग ग्राऊंड लवकरात लवकर स्थलांतर करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

> **तळा शहरातील डम्पिंग ग्राऊंड सध्या धरणाशेजारी असून ते अंबेळी येथे स्थलांतरित करण्यासाठी युद्धपातळीवर तयारी सुरू आहे. अंबेळी येथे नविन डम्पिंग ग्राऊंडचे जवळपास ८० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करून शहरातील सर्व ओला व सुका कचरा गोळा करून या ठिकाणी त्याचे संपूर्ण विघटन करण्यात येणार आहे.**
>
> **-मनिषा वजाळे**
> **मुख्याधिकारी**

## हे वाढतच राहणार

सध्या उद्योगपती सारखे एआय एआय म्हणतात. ते म्हणतात म्हणून आपले मंत्रीसंत्रीदेखील शेतीमध्ये एआयचा वापर, वाहतुकीत एआयचा वापर अशा घोषणा करीत असतात. त्यामुळे आपल्या घरात रोजची पोळीभाजी, वरणभातदेखील एआयच्या मदतीने होऊ लागणार आहे असे सामान्य लोकांना वाटू लागते. पण मग पाऊस येतो. ५०-१०० मिलीमीटर पाऊस झाला तरी आपले रस्ते पाण्याखाली बुडून जातात. वाहतूक बंद पडते. मग रस्त्यांना खड्डे पडले आहेत असे दिसते. अख्खी मोटारकार आत जाईल एवढे खड्डे ठिकठिकाणी दिसतात. त्यावर बोंबाबोंब होते. कितीही एआयच्या बाता चालू असल्या तरी आपण अजून एकोणिसाव्या शतकात आहोत याची सर्वांना खात्री पटते. मग आणखी पाऊस होतो. मुंबईसारख्या शहरात अचानक झाडे पडून, मॅनहोलमध्ये पडून किंवा पाण्यात उतरलेल्या विजेमुळे सटासट माणसे मरतात. गेल्या तीन दिवसात किमान अशा चार घटना घडल्या आहेत. त्या घडल्या की आपण सगळे ताळ्यावर येतो. एआय येऊदे किंवा आणखी कितीही प्रगती होऊदे, भारत, आपली मुंबई आणि महाराष्ट्र आहे तिथेच आहे याबद्दल सगळ्यांची खात्री पटते. मग सगळे जण शाहू फुले आंबेडकर यांची नावे घ्यायला, गणपती उत्सव साजरे करायला आणि दहीहंड्यांसारखे पक्ष फोडायला मोकळे होतात. महाराष्ट्र हा खरोखर वेगाने ढासळत चालला आहे. मुंबई हे हाताबाहेर गेलेले शहर झालेले आहे. गेल्या काही वर्षांमध्ये इथे झाडे पडून अधिकाधिक लोकांचे मृत्यू होऊ लागले आहेत किंवा वाहनांचे जबर नुकसान होऊ लागले आहे. नुकतेच चेंबूरमध्ये एका स्कूलबसवर पिंपळाचे झाड पडले आणि विहान श्रीवास्तव नावाचा अकरा वर्षांचा मुलगा हकनाक मरण पावला. हे झाड धोकादायक आहे अशी तक्रार स्थानिक लोकांनी केली होती. मात्र त्याकडे पालिका अधिकारी इत्यादींनी दुर्लक्ष केले. आता या प्रकरणी रस्ते व उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. यावर चौकशीचे नाटक होईल. समिती आपला अहवाल दिल्यासारखे करील. पण पुन्हा पुढच्या अपघातापर्यंत स्थिती आहे तशीच राहील.

### मैनहोलचा बळी

ही घटना घडल्याच्या दोनच दिवसात गुरुवारी गटाराचे झाकण म्हणजे मॅनहोल उघडे राहिल्याने त्यात पडून एकाचा बळी गेला. साकीनाका भागात ही घटना घडली असली तरी अशी चार हजार मैनहोल शहरभर उघडी आहेत अशी माहिती खुद्द आयुक्तांच्याच पत्रकार परिषदेत देण्यात आली. याचा अर्थ इतक्या माणसे मारण्याची व्यवस्था तयार आहे. साकीनाक्यामध्ये गटाराच्या झाकणावर जाळी बसवण्याचे काम चालू होते. पण त्याच्या आजूबाजूला हे काम चालू असल्याच्या कोणत्याही खुणा नव्हत्या. त्यामुळे अस्लम शेख हे फोनवर बोलत बोलत तिथून गेले आणि गटारात पडले व खालच्या पाण्यात वाहून गेले. हा निव्वळ बेदरकारपणा आहे. यापूर्वी मुंबईचे विख्यात डॉक्टर अमरापूरकर प्रभादेवीजवळ अशाच रीतीने मैनहोलमध्ये पडून मरण पावले होते. तेव्हा खूप ओरडा झाला होता. पण महापालिका आणि तिचे कंत्राटदार यांची बेपर्वाई संपत नाही. साकीनाक्यामध्ये मैनहोल उघडे आहे हे सांगणारे फलक किंवा आजूबाजूला दगड लावून तिथला मार्ग बंद करण्याचे साधे मार्ग अवलंबले गेले नव्हते. आर्टिफिशियल इंटेलिजन्स उर्फ एआय येवो की आणखी काही तंत्रज्ञान येवो, या साध्या गोष्टी माणसांनाच कराव्या लागतात. त्यासाठी आपल्या कामात सावधगिरी बाळगणे ही मूलभूत पूर्वअट आहे. पण आपले कंत्राटदार, पालिका अधिकारी यांना त्यांची पर्वा वाटत नाही. कारण अपघात झाले तरी त्यांना कधीच त्याचे शासन होत नाही. गेल्या दोन दिवसांच्या पावसांमध्ये साठलेल्या पाण्यात विजेचा प्रवाह किंवा करंट उतरल्याने अपघाताच्याही घटना घडल्या आहेत. नवी मुंबईमध्ये दोन मुली पाण्यात बेशुध्द पडल्या व तेवढ्यावरच निभावले. मुंब्र्यामध्ये मात्र पाण्यातील विजेच्या धक्क्याने एका सतरा वर्षांच्या मुलीचा बळी गेला. आता कुठे पावसाळा सुरू झाला आहे. दरवर्षी पावसात असे किंवा इतर प्रकारचे असंख्य अपघात होतात. रायगडसारख्या सह्याद्रीलगतच्या जिल्ह्यात दरडी कोसळतात. नागोठणे, पेण, महाड अशा गावांमध्ये पाणी भरते. त्यातून नुकसान होते. एरवी आपले मुख्यमंत्री व त्यांचे सरकार ज्या विकासाविषयी श्रेय घेत हिंडत असतात तो अशा अपघातांमध्ये कुठे गायब होतो असा खरा प्रश्न आहे.

### विकासाचा भ्रम

मुंबईमध्ये वास्तविक जागा शिल्लक उरलेली नाही. तरीही तिथे दणादण बांधकामे चालू आहेत. शंभर, दीडशे माळ्यांच्या इमारती उभ्या करणे म्हणजे पराक्रम असे बिल्डरांना वाटते आहे. बिल्डरांचा हा कथित पराक्रम म्हणजेच विकास असे फडणवीस लोकांना सांगत आहेत. पण रस्त्यावरची उघडी मैनहोल्स दुरुस्त करायला पालिकेकडे तातडीचा कार्यक्रम व यंत्रणा नाही अशी स्थिती आहे. पाण्यामध्ये वीजप्रवाह उतरण्याच्या घटना बहुदा गरीब वस्त्यांमध्ये घडत असतात. तिथे माणसांच्या जिवाला काही किंमत नसते. मुंब्रा परिसर मुस्लिमबहुल आहे. त्याकडे बाकीच्यांची पाहण्याची दृष्टी खराब आहे. गेले काही दिवस तिथे वीज येण्याजाण्याचे तसेच विजेचा दाब अचानक कमीजास्त होण्याचे प्रमाण वाढले होते.. तिथे खासगी टोरेंट कंपनी वीजपुरवठा करते. पण ती सरकारी कंपनीइतकीच बेपर्वा आहे. त्यामुळेच नागरिकांच्या तक्रारी येऊनही त्याकडे ध्यान दिले गेले नव्हते. झाडे पडण्याच्या वाढत्या घटनांचाही फडणवीस वगैरे मंडळींच्या कथित विकासाशी संबंध आहे. मुंबईत सिमेंटचे रस्ते करण्याचे खूळ या मंडळींनी जोपासले आहे. यामुळे मुंबईच्या जमिनीत पाणी मुरायला जागाच उरलेल्या नाहीत. हे सिमेंटचे रस्ते धड नाहीत ही आणखी वेगळीच रड आहे. हे रस्ते तसेच मेट्रो व बाकीची बांधकामे यामध्ये मुंबईतील झाडे तोडली जात आहेत वा खिळखिळी केली जात आहेत. चेंबूरमध्ये कोसळलेले झाड पिंपळाचे होते. वड, पिंपळ अशा झाडांच्या मुळांना आजूबाजूला भरपूर माती लागते. तिचा भक्कम आधार लागतो. अन्यथा त्यांची मुळे बाहेर येतात व दुर्बल होतात. कालांराने पायाच दुबळा झाल्याने अशी झाडे पडतात. काल एका दिवसात चर्चगेटला एक झाड पडून गाड्यांचा चेंदामेंदा झाला. तर सांताक्रूझमध्ये झाड पडून आठ जण जखमी झाले. एकूणच दिवसेंदिवस हा मुंबईतला गंभीर प्रश्न होऊ लागला आहे. याची जबाबदारी निश्चित करून पालिका अभियंते इत्यादींवर जी काय कारवाई व्हायची ती होईल. पण मुळात फडणवीस सरकारच्या कल्पनेतल्या विकासामुळे मुंबईकरांची आणि इथल्या झाडांची मुळे उखडली जात आहेत हे ओरडून समस्त जनतेला सांगण्याची वेळ आली आहे. उंच टॉवर, उड्डाणपूल, शक्तीपीठासारखे अनावश्यक रस्ते म्हणजे विकास नव्हे हे आता लोकांना पटू लागले असेल. मेट्रो वगैरेंनी मुंबईकरांच्या सुविधांमध्ये भर पडली पण आयुष्य आणखी बकाल झाले. शिवाय तंत्रज्ञान कितीही आधुनिक आले आणि भांडवल कितीही करोडोंचे आले तरी आपल्या व्यवहारातील माणसांच्या जिवाविषयीची बेपर्वाई संपत नाही तोवर हे असेच चालू राहणार, नव्हे वाढत राहणार.

**विचार**

# अपेक्षित राजकीय खेळी

***शिवसेनेतील ताज्या फुटीने अलिकडेच देशातले वातावरण ढवळून काढले. आज उद्धव ठाकरेंच्या तुलनेत एकनाथ शिंदे यांची सरशी होत आहे. अर्थात केंद्राचा भक्कम पाठिंबा त्यांना मिळत आहे, हे ही महत्वाचे. मात्र या सर्व घडामोडींमध्ये अंतिम फायदा भाजपचा आहे. भाजप राज्यसभा आणि लोकसभेत दोन तृतियांश बहुमताच्या दिशेने वाटचाल करत आहे, हे या घडामोडींचे फलित आहे.***



**डॉ. सुकृत खांडेकर**

शिवसेनेच्या निमित्ताने केंद्रातील राजकारण ढवळून काढणारे वातावरण अलिकडेच अनुभवायला मिळाले. मराठी माणसाच्या न्याय्य हक्कासाठी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी मुंबईत शिवसेना स्थापन केली. बाळासाहेबांच्या करारी आणि लढाऊ नेतृत्वाने शिवसेना नेहमीच धगधगत राहिली. मुंबईतील मराठी माणसाला ताठ मानेने उभे करण्यामागे ठाकरे व त्यांनी स्थापन केलेली शिवसेनाच होती. बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेना यांच्याविषयी मराठी माणसाच्या हृदयात माझा नेता आणि माझा पक्ष अशी भावना निर्माण झाली. याच शिवसेनेने मुंबईतील कामगार क्षेत्रातील लाल बावटा चळवळ संपवली. याच शिवसेनेने दोन्ही समाजवादी पक्षांना संकुचित केले हे त्यांनाही समजले नाही. तत्कालीन बलाढ्य काँग्रेस पक्षाला अंगावर घेण्याचे काम याच शिवसेनेने केले. भूमिपुत्रांना नोकऱ्यांमध्ये आणि घरांमध्ये ८० टक्के हक्काचा वाटा मिळाला पाहिजे यासाठी लढणारी हीच शिवसेना होती. भारतीय कामगार सेना, स्थानिय लोकाधिकार समिती, विद्यार्थी सेना अशा आघाड्यांवर शिवसेना नेहमी रस्त्यावर दिसायची. शिवसेना ही मुंबईतील मराठी माणासाची शक्ती होती, मराठी माणसाचे कवच होते. शिवसेना या चार अक्षरांचा मुंबईत जबरदस्त दरारा होता. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे या नावाचा सार्वजनिक जीवनात मोठा दबदबा होता. मातोश्रीवर रोज खुला जनता दरबार असायचा. आपले म्हणणे ऐकून घेणारा आणि न्याय मिळवून देणारा नेता अशी त्यांची जनतेत प्रतिमा होती. दत्ताजी साळवी, मनोहर जोशी, प्रमोद नवलकर, छगन भुजबळ, नारायण राणे, सुधीर जोशी, सतीश प्रधान, लिलाधर डाके, शरद आचार्य, दत्ताजी नलावडे, मधुकर सरपोतदार, सूर्यकांत महाडिक, सुभाष देसाई अशा अफाट जनसंपर्क असलेल्या नेत्यांची मालिका हे शिवसेनेचे वैभव होते. मात्र हे वैभव पुढील काळात उतरणीला लागले.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना राज्याचे मुख्यमंत्री होण्याचीही संधी मिळाली. राज्यात शिवसेना- भाजपा युती असेपर्यंत गाडी रूळावर होती. पण सर्वाधिक आमदार असलेल्या भाजपाला दूर सारून आणि काँग्रेसशी आघाडी करून उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले, तेव्हापासूनच भाजपाच्या रडावर त्यांचे नाव नोंदवले गेले. पंचवीस वर्षांच्या युतीतील मैत्रीचे रूपांतर राजकीय स्पर्धकांमध्ये झाले. त्याचे परिणाम उध्दव आणि त्यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला सतत चार वर्षे भोगावे लागत आहेत. पक्षाच्या सहा खासदारांनी उद्धव यांच्या नेतृत्वाविरोधात केलेला उठाव आणि एकनाथ शिंदे यांच्या पक्षाशी केलेला घरोबा हे त्याचे ताजे उदाहरण आहे. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये ठाकरे यांच्या शिवसेनेचे नऊ खासदार निवडून आले. त्यातले संजय जाधव (वय ५९, परभणी), भाऊसाहेब वाघचौरे (७६, शिर्डी), संजय देशमुख (५८, यवतमाळ- वाशीम), नागेश पाटील अष्टीकर (५४, हिंगोली), ओमराजे निंबाळकर (४२, धाराशिव), संजय दिना पाटील (५७, ईशान्य मुंबई) या सहा खासदारांनी ठाकरेंच्या शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' केला. हे सर्व खासदार मशाल चिन्हावर निवडून आले होते. या सर्वांनी बाळासाहेब ठाकरे व उद्धव ठाकरे यांचे बोर्डावर फोटो लावून मते मागितली होती. ठाकरेंच्या शिवसैनिकांनी मेहनत करून त्यांचा प्रचार केला होता. भाजपा-शिवसेना शिंदे पक्षाच्या विरोधात जनतेने त्यांना लोकसभेवर निवडून दिले होते. मग दोन वर्षांमध्ये नेमके असे काय घडले की, त्यांना ठाकरेंच्या पक्षात राहणे नकोसे झाले?

येथे लक्षात घेण्याजोगी बाब अशी की आपण पक्षनेतृत्वावर नाराज असल्याचे त्यांनी कधी सांगितले नाही. पक्षाच्या नेमक्या कोणत्या निर्णयाबद्दल त्यांचे मतभेद झाले हे कधी पुढे आले नाही. पक्ष सोडून जाण्याची खरी कारणे पुढे आलेली नाहीत. या फुटीर खासदारांनी दोन वर्षांमध्ये संसदेत महाराष्ट्राचे कोणते प्रश्न मांडले, मतदारसंघाला काय मिळवून दिले, पक्षाची कोणती भूमिका तडफेने मांडली? आता शिंदेंच्या पक्षात गेले, त्याचा राजकीय आणि आर्थिक लाभ त्यांना झाला असेल, पण जनतेच्या जीवनात काय फरक पडणार आहे? आता हे सर्व फुटीर शिवसेनेचे धनुष्यबाण हे चिन्ह हाती घेणार आहेत. म्हणून ते एनडीएमधे येतील. लोकसभेत एनडीए सरकार विधयके किंवा ठराव सादर करील तेव्हा या खासदारांना सरकारच्या बाजुने मतदान करावे लागेल. महिला आरक्षण तसेच मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाला याच खासदारांनी दोन महिन्यापूर्वी लोकसभेत विरोध केला होता. आता ते पुन्हा सादर झाले की त्यावर एनडीएच्या बाजुने मतदान करावे लागेल. १९ जून हा शिवसेनेचा स्थापना दिवस. एकनाथ शिंदे यांनी बंडाचा झेंडा फडकावून शिवसेना हे नाव व निवडणूक चिन्ह काबीज केले, तेव्हापासून मुंबईत ठाकरे आणि शिंदे शिवसेनेचा वर्धापनदिन वेगवेगळा साजरा करतात. ठाकरेंकडे सत्ता नाही. राज्य गेले, महापालिका गेली, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ठाकरे यांनी कधी रस घेतला नाही. मुंबई महापालिका हाच ठाकरेंच्या शिवसेनेचा प्राणवायु होता. तो ऑक्सिजन सिलेंडर भाजपाने हिसकावून घेतला. अशा वेळी या सहा खासदारांनी पळ काढण्यासाठी हीच वेळ का निवडली, याचा विचार करायला हवा.

आता बंडखोर खासदारांचे बॉस एकनाथ शिंदे आहेत. ते सर्व निर्णय मोदी- शहांना विचारूनच घेत असतात. शिवसेना वर्धापनदिनाच्या तोंडावर दिल्लीतून या सहा खासदारांनी वेगळा गट स्थापन करण्यासाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र दिले. लोकसभा निवडणुकीत 'चार सौ पार'ची घोषणा देणाऱ्या भाजपाला बहुमताचा आकडाही गाठता आला नव्हता. मग चंद्राबाबू नितीशकुमार यांना बरोबर घेऊन एनडीए सरकारची स्थापना झाली. विधेयके मंजुर करण्यासाठी लोकसभेत ३६२ खासदारांचे संख्याबळ गरजेचे आहे. म्हणूनच आयारामांना भाजपाकडून पायघड्या घातल्या जात आहेत. अगोदर पंजाबमधील आम आदमी पक्षाचे सात खासदार फुटले आणि भाजपामध्ये आले. नंतर तृणमूल काँग्रेसचे बावीस खासदार फुटले आणि त्यांना नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टीमधे विलिन केले. आता ठाकरेंच्या शिवसेनेचे सात खासदार फुटले आणि त्यांना शिंदेंच्या शिवसेनेने पायघड्या घातल्या. काँग्रेसशी संबंध तोडलेल्या द्रमुकच्या २२ खासदारांवर भाजपाची नजर आहेच. शिवाय सपाचे खासदार फुटणार अशी कुजबुज चालू आहे. शिंदे यांच्या शिवसेनेचे लोकसभेवर सात खासदार निवडून आले आहेत. प्रतापराव जाधव केंद्रात मंत्री आहेत. ठाकरेंचे सहा खासदार मिळाल्याने शिंदे यांच्या खासदारांची संख्या तेरा झाली आहे. त्यामुळे त्यांना केंद्रात आणखी एक मंत्रीपद मिळेल अशी चर्चा सुरू आहे. भाजपाकडे आयारामांची रांग लागल्याने एनडीएमधील चंद्राबाबू नायडू आणि नितीशकुमार यांचे महत्व कमी होईल, अशी चिन्हे आहेत.

दुसरीकडे राज्याच्या राजकारणात एकनाथ शिंदे यांचे महत्व वाढेल. महाराष्ट्रात आपली राजकीय भूमिका अमलात आणण्यासाठी एकनाथ शिंदे अतिशय उपयुक्त नेते आहेत, असे मोदी-शहांना समजले आहे. एकनाथ शिंदे लोकांना जेवढे भेटतात, दौरे करतात तेवढे कोणी करत नाहीत. भाजपा हायकमांडशी सर्वाधिक जवळचे संबंध राखणारा हा नेता आहे. उध्दव ठाकरे यांचे नेतृत्व आणि त्यांचा पक्ष कमकुवत करण्यात एकनाथ शिंदे यांचा सिंहाचा वाटा आहे. आपणच शिवसेनाप्रमुखांचे सच्चे वारस आहोत, असा त्यांचा दावा आहे. ठाकरे पिता-पुत्र हे राज्यात कुठे फिरत नाहीत, फोन घेत नाहीत, जनसंपर्क नाही, पदाधिकारी-कार्यकर्ते यांच्याशी मुक्त संवाद नाही, पक्षाचे मुख्यालय असलेल्या शिवसेना भवनमधे ते नियमित जात नाहीत. मग जनमानस काय आहे, कार्यकर्त्यांची भावना काय आहे हे कसे समजणार? ठाकरे भेटत नाहीत आणि शिंदे रात्री उशीरापर्यंत मुंबई-ठाण्यात भेटत असतात. त्याचा लाभ त्यांना मिळतो. म्हणूनच आजच्या राजकारणामध्ये एकनाथ शिंदे यांची सरशी होत आहे. अर्थात या पलिकडे जाऊन केंद्राचा भक्कम पाठिंबा त्यांना मिळत आहे. मात्र या सर्व घडामोडींमध्ये अंतिम फायदा भाजपचा आहे. भाजप राज्यसभा आणि लोकसभेत दोन तृतियांश बहुमताच्या दिशेने वाटचाल करत आहे, हे या सर्व घडामोडींचे फलित आहे.

**चर्चा आजची**

# पुरस्कार्थी आगारात 'स्वच्छते'चे धिंडवडे




**अंतरा पारंगे**

अलिबाग बस आगारात कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे स्वच्छतेमध्ये राज्यस्तरीय पुरस्कार मिळवणाऱ्या अलिबाग बस आगारातच स्वच्छतेचा बोजवारा उडाल्याचे दिसून येत आहे. या कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळच हिरकणी कक्ष आहे. कचरा आणि दुर्गंधीमुळे प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र आगाराच्या स्वच्छतेबाबत प्रशासन उदासीन ठरल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आगाराला स्वच्छतेमध्ये मिळालेल्या राज्यस्तरीय पुरस्कावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्वच्छतेचा दिखावा करण्यापेक्षा आगार परिसरातील स्वच्छतेबाबत प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी चर्चा प्रवाशांमध्ये सुरु असल्याचे चित्र आहे.

शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. जिल्ह्यातील प्रत्येक आगार, स्थानकांमधील सोयी सुविधा, स्वच्छता, कामकाज अशा अनेक प्रकारचे निकष या स्पर्धेमध्ये ठेवण्यात आले होते. वेगवेगळ्या गटामध्ये ही स्पर्धा घेण्यात आली होती. रत्नागिरीपासून वेगवेगळ्या जिल्ह्यांतील वरिष्ठ अधिकारी यांनी अलिबागसह जिल्ह्यातील अनेक स्थानक, आगार यांना भेट दिली. तेथील कामकाजाची व प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधांची माहिती घेतली. त्यानंतर गुण देण्यात आले. या स्पर्धेत मुंबई प्रदेशातील नऊ स्थानकांची विजेती म्हणून निवड करण्यात आली असून या स्पर्धेमध्ये रायगड विभागातील अलिबाग एसटी बस आगार तृतीय क्रमांकाने विजेता ठरले. एसटी महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात अलिबाग एसटी बस आगाराच्या अधिकाऱ्यांना पुरस्काराने सन्मानितही करण्यात आले. परंतु, स्वच्छता अभियानाच्या स्पर्धेत पुरस्कार मिळवणाऱ्या अलिबाग आगारात स्वच्छतेचा बोजवारा उडाला असल्याचे दिसून येत आहे. अलिबाग बस आगाराच्या परिसरात कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे पर्यटन व ऐतिहासिक तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अलिबाग आगारामधील कचऱ्याबाबत पर्यटकांसह स्थानिक प्रवाशांकडून स्थानकातील अस्वच्छतेबाबत नाराजी व्यक्त करत असल्याचे दिसून येत आहे.

अलिबाग हे रायगड जिल्ह्यातील महत्वाचे ठिकाण म्हणून ओळखले जाते. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी एसटी बस आगार व स्थानक आहे. अलिबाग एसटी बस आगारातुन रोहा, पनवेल, मुरूड, कर्जत, खोपोली, पुणे, मुंबई, शिर्डी, नाशिक अशा अनेक ठिकाणी एसटी बसेस जातात. अशातच एसटी महामंडळाकडून वेगवेगळ्या सवलती देण्यात आल्या आहेत. या सवलतींचा फायदा विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक व नियमीत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठ्या प्रमाणात होतो. त्यामुळे दररोज हजारो प्रवासी आणि शेकडो लालपरी बस या आगारातून ये-जा करत असतात. तसेच, अलिबाग पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने या ठिकाणी पर्यटकांची संख्याही मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे अलिबाग स्थानकात प्रवाशांची कायमच वर्दळ असते. मात्र अलिबाग एसटी बस स्थानकात कचऱ्याचा ढिगारा पाहून पर्यटक आणि स्थानिक प्रवाशांकडून अस्वच्छतेबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.

प्रवासादरम्यान अथवा शासकीय कार्यालयांतून मातांना आपल्या लहान बाळांना स्तनपान करण्यासाठी किंवा त्यांची काळजी घेण्यासाठी सुरक्षित आणि हक्काची जागा मिळावी म्हणून स्थानकात हिरकणी कक्ष सुरु करण्यात आला आहे. मात्र या हिरकणी कक्षाच्या बाजूलाच कचऱ्याचा ढिगारा असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे स्तनदा माता आणि बालकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

उन्हाळ्यातच आगार परिसरात मोठमोठे खड्डे पडले होते. हे खड्डे बुजविण्यात आले असले तरी पावसात स्थानकात गुडघाभर पाणी साचल्याचे दिसून येत आहे. शिवार शेडच्या समोरच मोठ्या प्रमाणात पाणी साचून आगाराला तलावाचे स्वरूप प्राप्त होते. या पाण्यात परिसरातील कचरा वाहून आल्याने दुर्गंधीयुक्त पाणी साचून राहत आहे. त्यामुळे प्रवाशांना या कचरामिश्रित आणि दुर्गंधीयुक्त पाण्यात उभे राहण्याची वेळ आहे.

तर काही प्रवासी या घाणीच्या पाण्यातून जायला टाळत असल्याने त्यांना भर पावसात छत्री घेऊन स्थानकाच्या मधोमध उभे राहावे लागत आहे. आगारात येणाऱ्या जाणाऱ्या बसमुळे हे घाण पाणी बऱ्याचदा प्रवाशांच्या अंगावर उडते. भर पावसात बसची वाट पाहत उभे राहावे लागत असल्याने विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे.

केवळ याच वर्षी नाही तर दरवर्षी हीच समस्या उद्भवताना दिसत आहे आणि तरीही प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याने प्रवाशांमध्ये नाराजीचे सूर उमटत आहेत. तरी प्रशासनाने आगारात साचणाऱ्या पाण्याची तसेच कचऱ्याची लवकरात लवकर विल्हेवाट लावावी, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

**लोकसंसद**

### संगीत पुरस्काराचे स्वरूप आणि निकष वेगळे असावेत

महाराष्ट्र शासनाने अलीकडेच दिवंगत झालेल्या आशाताई भोसलेंच्या नावाने संगीत क्षेत्रातील योगदानासाठी 'स्वरसम्राज्ञी आशा भोसले संगीत जीवन गौरव पुरस्कार' सुरू करण्याचा घेतलेला निर्णय निश्चितच स्वागतार्ह असाच आहे. परंतु महाराष्ट्रात आधीच गायन आणि संगीत क्षेत्रात प्रदीर्घ काळ सातत्यपूर्ण सेवा देणाऱ्या ज्येष्ठ कलाकारांचा सन्मान करण्यासाठी 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' दिला जातो. त्यामुळे आशाताईंच्या नावाने संगीत गौरव पुरस्कार देताना या पुरस्काराची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी या पुरस्काराचे स्वरूप आणि निकष काहीसे वेगळे असावेत असे वाटते. लता मंगेशकर आणि आशा भोसले या दोन्ही भगिनींनी केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर संपूर्ण भारताचे नाव जगभरात रोशन केले आहे. लतादीदींचा सोज्वळ दैवी स्वर आणि आशाताईंच्या गायकीतील अष्टपैलूत्व आणि अफाट वैविध्य या दोन्ही काहीशा भिन्न गोष्टी आहेत. मात्र दोघींनीही आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आवाजाने जगभरातील संगीत रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. त्यामुळे दोघींचेही संगीत क्षेत्रातील स्थान निर्विवाद आणि अढळ आहे. त्यामुळे आशाताईंच्या नावानेही राज्य सरकारने पुरस्कार सुरू करणे हा त्यांचा योग्य तो सन्मानच आहे. आशाताईंनी केवळ शास्त्रीय, नाट्य किंवा सुगम संगीतच नाही, तर पॉप, कॅबरे, गझल अशा वैविध्यपूर्ण गायनाने संगीत जगताला समृद्ध केले आहे. त्यांच्या या अष्टपैलू गायकीचा सन्मान करण्यासाठी या पुरस्काराचे नाव 'संगीत क्षेत्रातील नावीन्य आणि प्रयोगशीलता पुरस्कार' अशा आशयाचे असावे असे वाटते.– **प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**दिनविशेष**

# सरखेल कान्होजी आंग्रे यांचे निधन

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या आरमाराचे प्रमुख सरखेल कान्होजी आंग्रे यांचा स्मृतीदिन. कान्होजी आंग्रे यांनी इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच आरमाराबरोबर लढून मराठा आरमाराचा भगवा समुद्रात फडकवत ठेवला. त्याकाळी भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर वर्चस्व गाजवण्यासाठी आणि मोक्याच्या ठिकाणची बंदरे, किल्ले काबीज करण्याची परकीय सत्तांमध्ये चढाओढ लागली होती. इंग्रज आणि पोर्तुगीज आरमाराच्या अथक प्रयत्नानंतरही, मरेपर्यंत कान्होजी आंग्रे यांचे मराठा आरमार अजिंक्य राहिले. कान्होजींनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनींच्या व्यापारी जहाजांवर हल्ला चढवून केली. अनेक प्रयत्नांनंतरही कान्होजींच्या आरमराचा पराभव करण्यात अपयश आले. ब्रिटिशांनी केलेले अनेक हल्ले कान्होजी आंग्रे यांनी परतवून लावले. ब्रिटिशांनी कान्होजींना पकडण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली होती. पण, उलट त्यांना अपयशाचे तोंड पाहावे लागत असे. ब्रिटिशांची जहाजे आंग्रे यांनी ताब्यात घेतली. इंग्रजांनी आंग्रे यांना समुद्री चाचे म्हणून घोषित केले. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्यात आरमाराचे महत्त्व कान्होजी आंग्रे यांनी चांगलेच ओळखले होते. मृत्यूपर्यंत आंग्रे यांचे सुरतेपासून दक्षिणेकडे गोव्यापर्यंत अनिर्बंध वर्चस्व होते. इ.स.१६८८ च्या सुमारास सिद्दी कासम ह्या औरंगजेबाच्या सेनापतीस कान्होजींच्या अभ्यासपूर्ण योजनेपुढे आणि जिद्दीपुढे हार पत्करावी लागली. कान्होजींनी सुवर्णदुर्गाचा लढा यशस्वी करून आपल्या पराक्रमास सुरुवात केली. तसेच ह्या विजयानंतर मोगलांनी ताब्यात घेतलेले सर्वच किल्ले काबीज करण्यास त्यांनी सुरुवात केली. कान्होजींचे शौर्य व निष्ठेने पाहून राजाराम महाराजांनी त्यांना 'सरखेल' हे सन्मानाचे पद दिले. कान्होजींनी अलिबागचा कुलाबा किल्ला जिंकून घेऊन आपली राजधानी तेथे थाटली. छत्रपती राजारामांनी आंग्रे यांना आरमाराचा प्रमुख केले आणि आंग्रे कोकण किनाऱ्याचे राजे झाले. इ.स. १७०० मध्ये राणी ताराबाईंनीही ह्या पराक्रमी वीराला सन्मानित करून सावंतवाडी ते मुंबईपर्यंतची किनारपट्टी रक्षणासाठी ताब्यात दिली. ह्या नव्या आव्हानाबरोबर कान्होजींना अनेक परकीयांशी एकाच वेळी लढा द्यावा लागला. कोकणाबरोबरच कच्छ, सौराष्ट्रापासून त्रावणकोर, कोचीनपर्यंतची सागरी सत्ता कान्होजींच्या हाती होती. सागरी भागात मुक्तपणे संचार करणाऱ्या परकीयांवर कान्होजींनी निर्बंध घातले. १६९८ पासून मराठी राज्याची सारी सागरी सत्ता कान्होजींकडे आली आली. त्यांच्या परवान्याशिवाय कोणीही सागरावर व्यापार करू शकत नव्हते. कान्होजींचा प्रतिकार करण्याचे परकीयांनी ठरविले. सर्व परकीयांनी एकत्रित येऊन कान्होजींना संपविण्याचे ठरविले होते.तरीही कान्होजींनी इंग्रज, पोर्तुगीजांनाही पराभूत केले. शत्रूच्या आक्रमणांना तोंड देण्यासाठी कान्होजींनी दूरदृष्टीने अगोदरच अनेकांशी मैत्रीचे संबंध ठेवलेले होते. अशा संबंधांच्या मदतीने त्यांनी आपले आरमार अधिक शस्त्रसज्ज केले. पोर्तुगीजांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रनिर्मितीचा कारखाना आणि कुलाबा, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग येथे सुधारीत पद्धतीचे जहाज बांधणीचे कारखाने त्यांनी उभारले. या सुसज्जतेसह कान्होजींनी समुद्र किनाऱ्यावर एक दबदबा निर्माण केला होता. छत्रपती शाहू महाराज ज्यावेळी १७०७ मध्ये औरंगजेबाच्या तुरुंगातून सुटून महाराष्ट्रात आले. त्यावेळी पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ यांनी कान्होजी आग्रेंना शाहू महाराजांची बाजू समजून दिली. कान्होंजी शाहू महाराजांच्या पक्षात आले. त्यामुळे शाहू महाराजांची बाजू बळकट झाली. पोर्तुगीज व सिद्दी यांची धार्मिक असहिष्णुता सर्वत्र परिचित होती. कान्होजींचा हा लढा धार्मिक आक्रमणाची धार कमी करण्यासाठीही होती. कान्होजी आंग्रे यांनी कोकणातील मंदिरांसह पंढरपूर, आळंदी, जेजुरी, तुळजापूर येथील देवस्थानांना इनाम व रोख देणग्याही दिल्या. कान्होजींनी स्वकर्तृत्वावर उत्तुंग झेप घेतली. शत्रूची दाणादाण उडवणारे दर्याबहाद्दर कान्होंजी आग्रेंचे नाव मध्ययुगीन भारताच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने लिहिले गेले. दिनांक ४ जुलै, १७२९ रोजी कान्होजींनी जगाचा निरोप घेतला.

# पनवेल एसटी डेपोच्या विकासाची प्रतीक्षा कायम

**● मुसळधार पावसामुळे पुन्हा खड्ड्यांचे साम्राज्य ● चालकांसह प्रवासी त्रस्त**



| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

मुंबईचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पनवेल येथील राज्य परिवहन (एसटी) डेपोच्या समस्या अनेक वर्षांपासून कायम असून, त्या अद्यापही सुटताना दिसत नाहीत. दररोज हजारो प्रवासी आणि शेकडो लालपरी बस या डेपोमधून ये-जा करत असतात. असे असतानाही येथे मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने प्रवासी व चालकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे डेपोत आणि परिसरातील रस्त्यांवर पुन्हा मोठमोठे खड्डे पडले असून, संपूर्ण परिसराची दुरवस्था झाली आहे. या खड्ड्यांमुळे बस आदळत आहे. बसच्या स्प्रिंग व टायरचे नुकसान होत आहे. या खड्ड्यांमधून बस चालविताना चालकांना मोठी कसरत करावी लागत असून, बसच्या देखभालीचाही अतिरिक्त खर्च वाढत आहे. खड्ड्यांमुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एसटी महामंडळाकडून वेगवेगळ्या सवलती देण्यात आल्या आहेत. त्यामुळे दररोज हजारो प्रवासी आणि शेकडो लालपरी बस या डेपोमधून ये-जा करत असतात. मात्र डेपोमध्ये प्रवाशांसाठी स्वच्छ प्रतीक्षागृह, पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था, स्वच्छतागृहे तसेच वाहनतळाची सुविधा अपुरी असल्याबद्दल प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे काही काळापूर्वी राज्याचे परिवहन मंत्र्यांनी स्वतः या डेपोची पाहणी करून लवकरच विकासकामे सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र त्यानंतरही प्रत्यक्षात कोणतेही मोठे काम सुरू झालेले नाही.

पनवेल एसटी डेपो हा रायगड जिल्ह्यासह कोकण, मुंबई, पुणे आणि राज्यातील विविध भागांना जोडणारा महत्त्वाचा वाहतूक केंद्रबिंदू आहे. त्यामुळे दररोज मोठ्या प्रमाणावर प्रवासी या डेपोचा वापर करतात. तरीही डेपोच्या दुरवस्थेकडे संबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

### तातडीने नूतनीकरण करण्याची मागणी

पावसाळ्यात परिस्थिती अधिकच बिकट होत असल्याने डेपोचे तातडीने नूतनीकरण करून प्रवासी व चालकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी प्रवाशांसह वाहनचालक आणि नागरिकांकडून केली जात आहे.

## नशामुक्ती अभियान अंतर्गत विशेष व्याख्यान

| पोलादपूर | प्रतिनिधी |



शिवाई शिक्षण प्रसारक मंडळ, महाड संचलित चोळई येथील सुंदरराव मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये नशामुक्ती अभियानानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. यासाठी पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि आजीवन अध्ययन व विस्तार कार्य विभाग यांच्या विद्यमाने आयोजित केलेल्या या विशेष व्याख्यानाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील बलखंडे व उपप्राचार्य डॉ. महेश वल्ले यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. पोलादपूर पोलीस स्टेशनच्या विशेष सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय सुर्वे, महिला सहाय्यक फौजदार जयश्री सरणेकर, पोलीस हवालदार अनुज शिंदे तसेच महिला पो.शि. निकम, जाधव, तेलंगे, लांजरे आदी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून एपीआय विजय सुर्वे यांनी विद्यार्थ्यांना एनडीपीएस या कायद्याबद्दल विस्तृत माहिती दिली. नार्कोटिक्स ड्रग्स अँड सायकोट्रॉपिक सबस्टन्सेस (एनडीपीएस) कायदा १९८५, हा मादक द्रव्ये आणि सायकोट्रॉपिक पदार्थांचे उत्पादन, बाळगणे, विक्री, वाहतूक आणि सेवन यांचे नियमन व प्रतिबंध करणारा भारतातील प्रमुख कायदा आहे असे सांगून सुर्वे यांनी या कायद्याअंतर्गत येणाऱ्या विविध कलमांची विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल झाल्यास गुन्ह्याच्या स्वरूपानुसार कमीत कमी एक वर्षापासून ते अत्यंत गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये फाशीची शिक्षा देखील होऊ शकते, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांपासून स्वतःला दूर ठेवणे आवश्यक असल्याचे मत आपल्या मनोगताच्या अखेरीस व्यक्त केले.

### अमिता भायदे सेवानिवृत्त

| बोर्लीपंचतन | प्रतिनिधी |

आंगणवाडी पर्यवेक्षिका अमिता भायदे यांचा कापोली येथे ग्रामस्थ, भायदे परिवार आणि मित्रवर्ग यांनी त्यांच्या अंगणवाडी सेवेचा सन्मान करुन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. बालकांच्या उज्वल भविष्याची पायाभरणी, बालकांवर संस्कार या भावनेने वांरवार अंगणवाडी सेविकांना मोलाचे मार्गदर्शन केले. १९९२ मध्ये वडवली येथे अंगणवाडी सेविका म्हणून काम केले. अकरा वर्षांच्या अंगणवाडी सेविकेच्या कामानंतर सन२००३मध्ये पर्यवेक्षिका म्हणून म्हसळा येथे नियुक्ती झाली. पर्यवेक्षिका सेवेचा कालखंड संपल्याने त्यांनी सेवानिवृत्ती स्वीकारली.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**४ जुलै**

१) श्री.भालचंद्र लक्ष्मण म्हात्रे
मु.शिरवली, अलिबाग,
दि.४-७-१९३८

२)श्री.महादेव वामन पाटील
मु.बोरिस, अलिबाग
दि.४-७-१९४६

३)श्रीम.शर्मिला शशिकांत कोलते
वरसोली, अलिबाग
दि.४-७-१९४६

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
**(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५
**(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

### विद्यार्थिनींना मार्गदर्शन

**उरण :** श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहाय्यता संस्था, उरण आणि शीलक्ष्मी सोशल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उरण येथील एन. आय. हायस्कूल येथे इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थिनींसाठी मासिक पाळी आरोग्य व स्वच्छता जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थिनींना मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची स्वच्छता, सॅनिटरी नॅपकिनचा वापर याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

## निवडक



### अनोख्या पद्धतीने वृक्ष वाढदिवस साजरा

**पाली/बेणसे :** पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज ओळखून, १ जुलै कृषीदिनाचे औचित्य साधत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवघर येथे वृक्षदिन आणि वृक्ष वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नेहमीपेक्षा वेगळा आणि पर्यावरणपूरक संदेश देणाऱ्या या उपक्रमाची सध्या सर्वत्र कौतुकास्पद चर्चा होत आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी केवळ नवीन झाडे लावली नाहीत, तर मागील वर्षात लावलेल्या आणि अत्यंत प्रेमाने जोपासलेल्या झाडांचा वाढदिवस साजरा केला. मुलांनी या झाडांना पारंपरिक पद्धतीने ओवाळून (औक्षण करून), केक कापून आणि एकमेकांना चॉकलेट वाटून हा आनंद साजरा केला. या आगळ्यावेगळ्या वाढदिवसामुळे विद्यार्थ्यांमध्ये झाडांविषयी आपुलकी आणि कृतज्ञतेची भावना पाहायला मिळाली. या विशेष दिवसाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता बैकर यांचाही वाढदिवस होता. आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत त्यांनी स्वतः शाळेच्या परिसरात वृक्षारोपण केले आणि सर्व विद्यार्थ्यांना वृक्ष संवर्धन व निसर्ग रक्षणाचा मोलाचा संदेश दिला. रिमझिम बरसणाऱ्या पावसाच्या सरीत हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

### सुधागड विद्यासंकुलाचा वर्धापन दिन

**कळंबोली :** कळंबोली येथील जनसामान्यांची शाळा ओळख असलेली शिक्षण संस्था सुधागड विद्या संकुलचा ४१ वा वर्धापन दिन सोहळा बुधवारी (दि.१) अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या मंगलमयी दिनाचे औचित्य साधून संस्थेच्या वतीने वर्ष २०२६ मधील एच.एस.सी. आणि एस.एस.सी. परीक्षेतील उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, शिस्त आणि सातत्याच्या बळावर यश संपादन करून संस्थेचा नावलौकिक वाढविल्याचे गौरवोद्गार यावेळी मान्यवरांनी काढले. ४१ वर्षांची शैक्षणिक परंपरा जपत गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुधागड विद्या संकुल सातत्याने कार्यरत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. यावेळी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

### फार्मर कप शुभारंभाचे थेट प्रक्षेपण

**पाली :** महाराष्ट्र शासन कृषी विभाग, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सुधागड-पाली यांच्या वतीने माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते झालेल्या फार्मर कप उपक्रमाच्या डिजिटल शुभारंभाचे थेट प्रक्षेपण लिमये हॉल, पाली येथे सोमवारी आयोजित करण्यात आले हाते. या कार्यक्रमाला कृषी विभाग व उमेद अभियानामार्फत सुधागड तालुक्यातील फार्मर कप स्पर्धेत सहभागी झालेल्या विविध गटांचे निमंत्रक व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांना सर्वप्रथम फार्मर कप उपक्रमाच्या डिजिटल शुभारंभाचे थेट प्रक्षेपण दाखवण्यात आले. यानंतर तालुका कृषी अधिकारी दयावंती कदम यांनी उपस्थित गट प्रतिनिधींना या स्पर्धेचे महत्त्व, गटशेतीची गरज तसेच शेती क्षेत्रातील महिलांचे योगदान याविषयी मार्गदर्शन केले. तसेच पाणी फाउंडेशनचे तालुका समन्वयक रघुनाथ जगतापांनी स्पर्धेच्या पुढील नियोजनाबाबत मार्गदर्शन करून गटांनी समन्वयाने व नियोजनबद्ध पद्धतीने सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.

पान १ वरुन

## पावसाने धरणे फुल्ल

जिल्ह्यामध्ये ६ जुलैदरम्यान अतिमुसळधार पावसाची शक्यता असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला होता. त्यानुसार जिल्ह्यात मुसळधार पावसाने सुरुवात केली आहे. गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा जोर कायम असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्र ते उत्तर केरळ किनारपट्टीपर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रीय झाला आहे. त्यामुळे जिल्ह्यामध्ये बहुतांश ठिकाणी मुसळधार व मध्यम स्वरुपात पाऊस कोसळला. अनेक सखल भागात पाणी साचले असून, रायगड जिल्ह्यातील संपूर्ण भाग जलमय झाला आहे. रस्त्यांवर पाण्याचे पाट वाहात आहेत. त्यामुळे पाण्यातून वाट काढण्याची वेळ चालकांसह पादचाऱ्यांवर आली आहे.कोकणात २८५.४ मि.मी. पाऊस कोसळला आहे. त्यामध्ये रायगड जिल्ह्यामध्ये ३४५.७ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्यातील अलिबाग, पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, उरण, मुरुड, पेण, माणगाव, महाड, श्रीवर्धन, म्हसळा, तळा, रोहा, पोलादपूर या तालुक्यांमध्ये २२५.४ मि.मी. पासून ४६४.९ मि.मी.पर्यंत पाऊस पडल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे. रायगड पाटबंधारे विभाग, कोलाडच्या अखत्यारित येणारी २८ धरणे पाण्याअभावी कोरडी पडली होती. मात्र, सतत सुरु असलेल्या पावसामुळे या धरणांमध्ये जलसाठा होऊ लागला आहे. जिल्ह्यातील सुतारवाडी, म्हसळ्यातील पाभरे, संदेरी आणि महाडमधील खैरे, सुधागडमधील कोंडगाव, उन्हेरे या धरणांमध्ये शंभर टक्के जलसाठा आहे. तळामधील वावेमध्ये ५० टक्के, महाडमधील वरंध, श्रीवर्धनमधील कुडकीमध्ये ५७ टक्के, खालापूरमधील भिलवलेमध्ये ७८ टक्के, महाडमधील कोथुर्डेमध्ये ६६ टक्के, श्रीवर्धनमधील कार्ले, पेणमधील आंबेघर, या धरणांमध्ये ४२ टक्के पाणीसाठा आहे. उर्वरित धरणांमध्ये तीन टक्क्यांपासून ३६ टक्के जलसाठा आहे. कोरडी पडलेली धरणे या पावसात भरू लागली आहेत.

## रायगडचं पर्यटन झेपावणार!

विकासाच्या दृष्टीने मोठी उपलब्धी मानली जात आहे.अलिबाग समुद्रकिनाऱ्यापासून कुलाबा किल्ल्यापर्यंत रोप-वे सुरू झाल्यास भरती-ओहोटीवर अवलंबून राहण्याची गरज कमी होईल. पर्यटकांना वर्षभर सुरक्षित आणि जलद प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल. रायगड किल्ल्याच्या पायथ्यापासून गडावर जाणाऱ्या रोप-वेमुळे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि लहान मुलांसह सर्व पर्यटकांसाठी गडदर्शन अधिक सुलभ होणार आहे.नेरळ-माथेरान रोप-वे प्रकल्पामुळे माथेरानपर्यंतचा प्रवास कमी वेळात आणि अधिक आरामदायी होईल. श्रीक्षेत्र कनकेश्वरसाठीचा रोप-वे धार्मिक पर्यटनाला नवी चालना देईल, तर घारापुरी (एलिफंटा) लेणीपर्यंतच्या रोप-वेमुळे जागतिक वारसा स्थळाला भेट देणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे.या प्रकल्पांच्या अंमलबजावणीनंतर पर्यटन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याबरोबरच हॉटेल व्यवसाय, वाहतूक, स्थानिक बाजारपेठा, हस्तकला आणि अन्य सेवा क्षेत्रांनाही मोठी चालना मिळणार आहे. पर्यटनाशी संबंधित उद्योगांना नवे बळ मिळाल्याने स्थानिक अर्थव्यवस्था अधिक गतिमान होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.प्रकल्पांच्या पुढील टप्प्यात सविस्तर आराखडा, पर्यावरणीय मंजुरी, तांत्रिक प्रक्रिया आणि निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कामांना सुरुवात होणार आहे. या निर्णयाचे पर्यटन व्यावसायिक, स्थानिक नागरिक आणि पर्यटनप्रेमींनी स्वागत केले असून, रायगडच्या पर्यटन विकासाच्या इतिहासात हे प्रकल्प महत्त्वाचा टप्पा ठरतील, असा आशावाद व्यक्त होत आहे.

## पीयूसी न काढणाऱ्यांना दणका

दुर्लक्ष केले जात. वाहनातून उत्सर्जित होणाऱ्या धुरामुळे पर्यावरणाचा समतोल बिघण्याचा धोका निर्माण झाला आहे. मानवी आरोग्यावरही त्याचा परिणाम होत आहे. तरीदेखील अनेकजण नियमांचे उल्लंघन करून पीयूसी अर्थात प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र न काढता वाहन चालवित आहेत. केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम ११५ व ११६ अंतर्गत वाहनामधून उत्सर्जित होणाऱ्या धुरामुळे होणारे प्रदूषण व त्याबाबतच्या कायदेशीर तरतुदी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. वाहनांमुळे होणाऱ्या वायू प्रदूषणाचा थेट आणि गंभीर परिणाम मानवी आरोग्य व पर्यावरणावर होत असल्याने, उच्च न्यायालयानेदेखील या संदर्भात अत्यंत कडक निर्देश दिले आहेत. नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी सर्व वाहनधारकांनी आपल्या वाहनांची निर्धारीत कालावधीनंतर मान्यताप्राप्त संगणकीय प्रदूषण नियंत्रण केंद्रांमार्फत ऑनलाइन पद्धतीने प्रदूषण नियंत्रण चाचणी करून घेणे व त्याचे वैध प्रमाणपत्र सोबत बाळगणे कायदेशीररित्या अनिवार्य आहे, अशी सक्त सूचना प्रादेशिक परिवहन विभागाकडून देण्यात आली. तरीदेखील नियमांचे उल्लंघन करण्यात आले. त्यामुळे पनवेल येथील प्रादेशिक परिवहन विभागाकडून कारवाईचा बडगा उगारण्यात आला. वायुवेग पथकामार्फत एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत एकूण ६ हजार ५९८ इतक्या वाहनांवर कारवाई करुन १३.१९ कोटी रुपये इतका दंड आकारण्यात आला आहे. एप्रिल २०२६ ते जून २०२६ या कालावधीत एकूण एक हजार २६६ वाहनांवर कारवाई करुन २५.३२ लाख इतका दंड आकारण्यात आला आहे. या पंधरा महिन्यांच्या कालावधीमध्ये १३ कोटी ४४ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

## वन्यप्राण्यांच्या अवयवांची तस्करी; एकाला अटक

वनक्षेत्रपाल यांना कुडाळ बाजारपेठ येथील मसुरकर जेम्स या दुकानात वन्यप्राण्यांच्या अवयवांची बेकायदेशीर विक्री होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे वनक्षेत्रपाल आणि वनपरिक्षेत्र अधिकारी कुडाळ यांच्या संयुक्त पथकाने दोन पंचांसमक्ष सदर दुकाची झडती घेतली. या झडतीदरम्यान वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या अनुसूची-१ मधील संरक्षित प्राणी असलेल्या बिबट्याची शिकार करून, त्यापासून मृगयाचिन्हे तयार करून विक्री करण्याच्या उद्देशाने ठेवलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी सावंतवाडी वनविभागाने गुन्हा नोंदवला आहे. त्याला कुडाळच्या प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची वन कोठडी सुनावली. सिंधुदुर्ग जिल्हा निसर्गसंपन्न असून येथे बिबट, रानगवा, सांबर, खवलेमांजर, पिसोरी यांसारख्या संरक्षित वन्यजीवांचा अधिवास आहे. वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ नुसार या प्राण्यांची शिकार करणे, त्यांचे अवयव किंवा मृगयाचिन्हे बाळगणे अथवा त्यांचा व्यापार करणे हा गंभीर गुन्हासून यामध्ये सात वर्षांपर्यंत कारावास आणि आर्थिक दंडाची तरतूद आहे. अशा प्रकारचे बेकायदेशीर कृत्य आढळल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा, माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असे आवाहन उपवनसंरक्षक मिलीश शर्मा यांनी केले आहे.

## दिबांच्या नावाचा झेंडा रोवणार!

उरण तालुका आणि शहरी भागात गाव बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय रोहा, पेण, अलिबाग, खालापूर, चौक कर्जत, ठाणे, नवी मुंबई, कल्याण, भिवंडी, वसई, विरार, पालघर आदी भागातून समाजबांधव सहभागी होणार आहेत, अशीही माहिती त्यांनी दिली.रश्मिता पोपेटा हिच्या आंदोलनाना पाठिंबा देणाऱ्या महिला संघटना, कलाकार संघटना, बैलगाडा संघटना, २७ गाव संघटना, १० गाव संघटना, विविध राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, औषध विक्री संघटना, आगरी समाज संघटना अशा विविध संघटना मोर्चात सक्रिय सहभाग घेणार असल्याचे त्या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी कळविले आहे. याशिवाय व्यक्तिगत काही लोकं स्वयंस्फूर्तीने सहभागी होणार असल्याने हे आंदोलन अभूतपूर्व ठरणार आहे, असा दावा सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू यांनी केला.कोविड काळात राज्य सरकारविरोधी आंदोलने झाली. परंतु, महायुतीने नावाबाबत जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने आंदोलने होऊ शकली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्यात आम्हीही कमी पडलो असलो तरी ती कसूर येत्या ८ तारखेच्या आंदोलनातून भरून काढणार आहोत, अशी भूमिका दिशा पाटील यांनी स्पष्ट केली.संबंधित आंदोलनासंदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, आझाद मैदान पोलीस ठाणे, नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, कोकण आयुक्त रुबल अग्रवाल, पनवेल तहसीलदार मीनल भामरे भोसले, पनवेल शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार आदींना आंदोलनाची माहिती लेखी निवेदनाद्वारे लोकनेते दिबाप्रेमी नामकरण समितीच्या लेटरहेडवर दिली आहे, असेही कांतीलाल कडू यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. आंदोलनात स्वतः रश्मिता पोपेटा, खासदार बाळ्यामामा ऊर्फ सुरेश म्हात्रे, माजी आमदार बाळाराम पाटील, सामाजिक कार्यकर्ते कांतीलाल कडू, माजी आमदार मनोहर भोईर, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर, सुधाकर पाटील, स्थानिक सामाजिक संस्थांचे पदाधिकारी सहभागी होतील.पत्रकार परिषदेला बाळाराम पाटील, मनोहर भोईर, भावना घाणेकर, संतोष घरत, अतुल म्हात्रे, काशिनाथ पाटील, नरेश घरत, हेमराज म्हात्रे, प्राजक्ता गोवारी, शंकर म्हात्रे, तेजस्विनी घरत, सुनील कटेकर, रवी घरत, विलास फडके, कवी तारेकर, सचिन गायकवाड, महेंद्र म्हात्रे याशिवाय अन्य मान्यवर उपस्थित होते.

## बंद घरात गुटख्याचं गोदाम

(दि.२) सकाळी संयुक्तरित्या छापा टाकला. एका बंद घरात गुटख्याचा साठा आढळून आला. त्यामध्ये प्रिमिअम रजनीगंधा पान मसाला, केशरमिश्रित विमल पान मसाला, सुगंधीत तंबाखू आदी साठ्यांचा समावेश आहे. सकाळपासून सुरु झालेली कारवाई रात्री उशिरापर्यंत सुरु होती. मुद्देमालाच्या मोजदादीबरोबरच अंतिम पंचनामा सुरु होता. अखेर एक लाख ३१ हजार ३६१ रुपयांचा साठा जप्त करून रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईनंतर जिल्ह्यातील इतर भागांमधील गुटखा विक्रेते आणि साठे बाजारांमध्ये खळबळ उडाली आहे.

## आंबेनळी घाट ६ जुलैपर्यंत बंद

हवामानामुळे विदीर्ण झालेले बेसॉल्ट खडक, अस्थिर मातीचे थर आणि दाट वनक्षेत्र यामुळे पावसाळ्यात हा मार्ग अत्यंत धोकादायक बनतो.भारतीय हवामान विभागाच्या नोंदीनुसार या परिसरात दरवर्षी अतिमुसळधार पर्जन्यवृष्टी होत असून, अल्प कालावधीतही तीव्र स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता असते. त्यामुळे उतारांची स्थिरता कमी होऊन भूस्खलन, दरड कोसळणे, दगड घसरणे, भूस्तर खचणे, वृक्ष उन्मळून पडणे तसेच रस्त्यावरून वेगाने पाणी वाहणे अशा घटना कोणतीही पूर्वसूचना न देता घडू शकतात. यामुळे सार्वजनिक वाहतुकीस गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.तसेच घाट परिसरात मोठ्या प्रमाणावर दरडी व दगड रस्त्यावर कोसळणे, भरावांची धूप होऊन रस्ता खचणे, खोल दऱ्यांच्या बाजूचा रस्ता कमकुवत होणे, दाट धुके व कमी दृश्य अंतरामुळे अपघातांचा धोका वाढणे तसेच बचाव व आपत्कालीन यंत्रणांच्या हालचालींमध्ये अडथळे निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.यापूर्वीही अशा प्रतिकूल हवामानाच्या परिस्थितीत आंबेनळी घाटात भूस्खलन, दरड कोसळणे, वृक्ष पडणे व वाहतूक विस्कळीत होण्याच्या घटना घडल्या असून, सार्वजनिक सुरक्षिततेला प्राधान्य देत वेळोवेळी घाटबंदीचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यामुळे संभाव्य जीवितहानी व अपघात टाळण्यास मदत झाली होती.तहसीलदार तथा अध्यक्ष, तालुका आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पोलादपूर यांनीही ६ जुलैपर्यंत आंबेनळी घाट सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद ठेवण्याची शिफारस केली होती. तसेच पोलीस अधीक्षक, रायगड यांनी अवजड वाहतूक पूर्णपणे बंद ठेवणे आवश्यक असल्याचे तसेच ऑरेंज व रेड ॲलर्टच्या कालावधीत हलक्या वाहनांनाही प्रवेश बंद ठेवण्याबाबत अभिप्राय सादर केला होता.

## पाली-दर्यागाव एसटी बसला अपघात

भरधाव वेगात असलेली बस रस्ता सोडून रस्त्याच्या कडेला असलेल्या मोठ्या खड्ड्यात कळंडली. एकूणच, चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडल्याची माहिती उपस्थितांकडून मिळाली. या बसमध्ये महिला पुरुष, विद्यार्थी व वयोवृद्ध नागरिक असे एकूण ४२ प्रवासी होते. सुदैवाने यात कोणतीही दुर्दैवी घटना घडली नाही. मात्र, प्रवासी प्रचंड घाबरून गेले होते. स्थानिकांच्या मदतीने व ट्रॅक्टरच्या सहायाने बसला बाहेर काढण्यात यश आले. याकरिता दोन ट्रॅक्टर ची मदत घेण्यात आली. समोरून अचानक भरधाव वेगात चारचाकी गाडी आल्याने व रस्ता अतिशय खराब असल्यामुळे चालकाचे गाडीवरचे नियंत्रण सुटले असल्याची माहिती पालीचे वाहतूक नियंत्रक शिद यांनी दिली.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे भालीवडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक सुमन नैन यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे भालीवडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| २५ | ११ | ०-२०-२८ | ०-५५ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०४/०७/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

### जाहिर नोटीस

सर्वांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे दहिगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमिन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे विद्यमान मालक स्वाती मोहिते यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविल्या आहेत सदर जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे दहिगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकती :**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| २५ | १/फ | ०-४३-०० | ०-५० |
| २५ | १८ | ०-१७-०० | ०-१५ |
| २५ | १९ | ०-०८-०० | ०-१० |
| २५ | २० | ०-२४-०० | ०-२५ |
| २५ | २२ | ०-३५-०० | ०-३५ |

तरी वरील मिळकतींच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०४/०७/२०२६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८०५५

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. :- 7000040322** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-25/2026-2027** RFx e-tender for replacement of LA surge counters at 220kV Apta & Wadkhal Substation under EHV (O&M) Division Panvel...**2nd call** **Tender amount Rs. 7,44,865/-, EMD amount Rs. 7,449/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **03.07.2026, 18:00 Hrs. to 13.07.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 13.07.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **14.07.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER (I/C)**
**E.H.V.(O&M) DN. PANVEL**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे भेरसे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक संगिता दत्तात्रेय राऊत रा. फ्लॅट नं. २०३, रायांश रेसिडेन्सी, स्टेशन रोड, सारस्वत बँक जवळ, ठाणे, असलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| भेरसे, ता. अलिबाग | ४० | ०-१३-००<br>पो.ख. ०-०२-००<br>एकूण ०-१५-०० | ३.३७ |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/०७/२०२६ सही/-

**श्री. शेखर विष्णू मगर**
पत्ता : दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक सौ. सुप्रिया रूपेश म्हात्रे रा. कोपरखैरणे नवी मुंबई यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नवघर, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| २५३ | ०-४५-५०<br>यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे क्षेत्र<br>०-२४-४० | २- ३०<br><br>१-२५ |

वरील शेत मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली सही/-
दिनांक : ०१/०७/२०२६

**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई–निविदा सूचना

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-३८(4th call), टी-३९(2nd call), टी-४०(2nd call), टी-४१(2nd call), आणि टी-४२ (२०२६-२७) अशा एकुण **पाच** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. ०४.०७.२०२६ पासून ते दि. १३.०७.२०२६ @१३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. १३.०७.२०२६** ला **१५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

**(सही)**
**कार्यकारी अभियंता (स्था.) स्थापत्य विभाग भांडुप**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक श्री. सुरेंद्र यशवंत शिर्के रा. नागशेत, ता. सुधागड, जि. रायगड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नागशेत, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| ४६५ | १-३९-० | ३-८७ |

वरील शेत मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली सही/-
दिनांक : ०१/०७/२०२६

**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकती ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकानी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे मोठे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| अ. क्र. | मालकाचे नाव | सर्व्हे नं. हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकारणी |
|---|---|---|---|---|
| १ | १) नितिन शांताराम आंबवणे | ८०/१/ब | ०-३९-०० | ३-१५ |
| | यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-११-०० मात्र. | | | |
| २ | सौ.भाग्यश्री प्रभाकर शेळके | १५/१ | ०-५७-२० | ७-५० |
| | यापैकी लिहून देणार यांचे मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-१८-०० मात्र. | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही /-
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अपार्टमेंट कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, ता.कर्जत, जि.रायगड, ४१०२०१.

**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :-०४/०७/२०२६
मो. नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १ महेश दत्तात्रेय पन्हाळे २ दिनेश दत्तात्रेय पन्हाळे ३ प्रमोद दत्तात्रेय पन्हाळे खालील वर्णनाची बिनशेती प्लॉट तिचे मालक उदय कुमार नायडू यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे. किरवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील बिनशेती प्लॉट**

| मालकाचे नाव | भूमापन क्रं व उपविभाग / सर्व्हे नं/हिस्सा नं | क्षेत्र आर.चौ.मी | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| उदय कुमार नायडू | ७१/४ | ३.०४.७७ | ३०.४८ |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध,बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि तसेच त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतील जाणार नाही.

ता. ०४/०७/२०२६ खरेदीदारातर्फे वकील
**ॲड वृषाली रघुनाथ मोरे** मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता - प्रशाकीय भवन जवळ सरकारमान्य गाळा नं २ ता. कर्जत जि.रायगड.

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे खारसापोली, ता. पेण जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल यांनी त्याचे नमुद विद्यमान मालक श्री.नितीन शामकांत ठाकुर यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| खारसापोली | १८/१/अ | ०.५२.३०<br>पो.ख. ०.०१.३०<br>एकुण क्षेत्र०.५३.६० | १०.४४ |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी खरेदीखत लिहुन देणार श्री.नितीन शामकांत ठाकुर यांच्या हिश्याचे क्षेत्र ०.३४.६० हे.आर.आकार ६.६५ रु.पै. या संपुर्ण क्षेत्रापैकी ०.१६.०० हे.आर.इतके क्षेत्र हे आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिज, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी. वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिप:- सदर नोटीस खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण:- पेण
दि:-०३/०७/२०२६

**ॲड. हेमा.ज.पाटील (घोडिंदे)**
पेण पोलिस स्टेशन जवळ तहसिल ऑफिस आवारात,कोटआळी पेण मो.नं ९८२२०३०३८९

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- प्रशस्त ३००० चौरस फूट खुला हॉल ऑफिशिअल कामासाठी भाडेतत्त्वावर देणे आहे. गरजूनी संपर्क करावा. संपर्क – ९२२६३७९८४४ / ९८२३९२७२८८
- किहीम बिच येथे जागा विकणे आहे. संपर्क : ९४०३५६१४८१, ८१४९२४९९४७
- वॉन्टेड :– अलिबागमधील दवाखान्यामध्ये वृद्ध महिलेला सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत काळजीवाहू सेविका भेटा किंवा पगाराचे अपेक्षासह लिहा. सुधाकर रानवडे, अन्नपूर्णावाडी, हरिष बेकरीजवळ चेंढरे.
- Vacancy for Furniture store Manager, location- Zirad, Qualification Graduation, MBA Experience- 2-4 years in Retail Contact- 9823585321

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जप्ती आदेश

जा.क्र./८३/कलम १५६/मिळकत जप्ती/२०२६-२७
विशेष वसुली अधिकारी, अलिबाग यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग
मुख्य कार्यालय दिनांक : ०३/०७/२०२६

**: जप्ती आदेश :**

वाचले : १. मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये मिळालेला वसुलीचा दाखला क्रमांक ८१७/२०२०-२१/२८.०९.२०२०
२. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७
३. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड अलिबाग यांचेकडील आदेश क्रमांक जान जिउनि/कात-६/कलम-१५६/आदेश/रायगड जि.म.स. बँक/९८२/सन २०२६ दिनांक ४ मे २०२६ रोजीचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ चे अधिकार प्रदान आदेश

ज्याअर्थी, मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांनी १) श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड कर्जदार २) श्री कृष्णा यशवंत खोत मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड जामीनदार ३) श्री नितिन मुकुंद अडसुले मु. गोविंद बंदर पो. ता. अलिबाग जि रायगड जामीनदार यांचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र, दिनांक २८ सप्टेंबर २०२० रोजी दिलेले आहे.
२. ज्याअर्थी, वसुली अधिकारी, अलिबाग यांनी नियम १०७ अन्वये नोटीस रा. जि.म.स. बँक/वसुली/४०/ सन २०२६-२७/ ठिकाण अलिबाग /०३/०६/२०२५ मागणी नोटीस देणेत आली होती;
३. आणि, ज्याअर्थी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड अलिबाग यांचेकडील आदेश क्रमांक जाक्र. जिउनि/कात -६ / कलम -१५६/आदेश /रायगड जि.म.स. बँक/९८२/सन २०२६ दिनांक ४ मे २०२६ रोजीचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ चे अधिकार प्रदान आदेशाने किरण कमळाकांत राउत निम्न स्वाक्षरीदार यांना कलम १५६ व नियम १०७ चे अधिकार प्रदान करणेत आले आहेत;
४. आणी ज्याअर्थी १. सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड कर्जदार यांनी वसुली दाखल्यात नमुद रक्कमेची वसुली व रक्कमेचा भरणा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग यांचेकडे केलेला नाही. तसेच त्यांचेकडून अद्यापी दिनांक १९ जून २०२६ अखेर रक्कम रुपये ७७१३५/- (रुपये सत्यातर हजार एकशे पस्तीस मात्र) अधिक दिनांक ०१/०४/२०२० पासुन पुढील व्याज, खर्च, शासकीय अधिभार इ. वसुल करावयाचे आहेत आणि,
५. ज्याअर्थी, वसुली अधिकारी, अलिबाग यांचे असे निदर्शनास आले आहे की, वसुली प्रमाणपत्र मध्ये नमुद श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड कर्जदार यांच्या मालकी वहिवाटीची व हिश्श्याची स्थावर मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

मौजे अलिबाग नगर परिषद, ता अलिबाग जि रायगड, तलाठी सजा अलिबाग सिटी सर्व्हे अलिबाग तालुका अलिबाग, जिल्हा रायगड तसेच मे. सहदुय्यम निबंधक व तहसिलदार, अलिबाग यांच्या अधिकार/कार्यक्षेत्रातील हद्दीतील स्थावर मिळकत पुढीलप्रमाणे-

| मिळकतदाराचे नांव | मिळकतीचा तपशिल | मिळकत क्रमांक |
|---|---|---|
| श्री सूर्यकांत यशवंत खोत | मौजे अलिबाग नगर परिषद हद्दीतील श्रीबाग क्षेत्र विकास योजना क्र २ मधील भूखंड क्रइ - १०८ क्षेत्र ५० चौ मी जागा व त्यावर बांधकाम केलेले २९३.६३ चौ फु घर | Z१ASB२२६११ (जुना घर क्र ५० ब) |

६. आणी ज्याअर्थी वसुली अधिकारी, अलिबाग यांच्या असेही निदर्शनास आले आहे की, श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड यांची वर नमूद केलेली स्थावर मालमत्ता जप्त करुन विक्री केल्यास यांचेकडून येणेबाकी असलेली रक्कम वसूल होणे शक्य आहे.
त्याअर्थी मी वसुली अधिकारी, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**: आदेश :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ (११) ड त्यातील संबंधित पोटनियमाद्वारे मला प्राप्त झालेले अधिकार व तरतुदीस अनुसरुन मी श्री किरण कमळाकांत राउत वसुली अधिकारी, अलिबाग, द्वारा/- रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग, श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड यांची खाली वर्णन केलेली त्यांचे मालकी वहिवाटीची व हिश्श्याची स्थावर मिळकत या आदेशान्वये जप्त करीत आहे.
२. जप्त करण्यात आलेल्या स्थावर मिळकतीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.
मौजे अलिबाग नगर परिषद, ता अलिबाग जि रायगड, तलाठी सजा अलिबाग सिटी सर्व्हे अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड तसेच मे. सहदुय्यम निबंधक व तहसिलदार, अलिबाग यांच्या अधिकार/ कार्यक्षेत्रातील हद्दीतील स्थावर मिळकत पुढीलप्रमाणे -

| मिळकतदाराचे नांव | मिळकतीचा तपशिल | मिळकत क्रमांक |
|---|---|---|
| श्री सूर्यकांत यशवंत खोत | मौजे अलिबाग नगर परिषद हद्दीतील श्रीबाग क्षेत्र विकास योजना क्र २ मधील भूखंड क्र इ - १०८ क्षेत्र ५० चौ मी जागा व त्यावर बांधकाम केलेले २९३.६३ चौ फु घर | Z१ASB २२६११ (जुना घर क्र ५० ब ) |

३.श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड कर्जदार आणि त्यांचे प्रतिनिधी अगर दलाल यांना सदर मालमत्तेची विक्री करणे अगर त्यावर बोजा निर्माण करणे अगर सदर मालमत्तेचे कोणत्याही तऱ्हेने हस्तांतरण करणे यास या आदेशाने प्रतिबंध करण्यात येत आहे.
४. तमाम लोकांस कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या आणि जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेबाबत श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड कर्जदार अगर त्यांचे प्रतिनिधी अगर दलाल यांचेबरोबर कसलाही कोणताही व्यवहार करु नये. या आदेशाविरुद्ध कोणास कोणत्याही स्वरुपाची हरकत घेणे असल्यास/नोंदविणे असल्यास खाली सही करणार यांना लेखी पुराव्यानिशी ३० दिवसात कळविण्यात यावे, अन्यथा अशी कोणतीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कारवाई केली जाईल. या आदेशाविरुध्द यदा कदाचित कोणाही इसमाने वरील मिळकतीबाबत. श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड कर्जदार अगर त्यांचे प्रतिनिधी, अगर दलाल यांचेबरोबर व्यवहार केल्यास सदर व्यवहार खाली सही करणार व वसुली प्रमाणपत्र/ॲवॉर्ड धारण करणार रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग यांचेवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.
५. श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड व इतर यांनी हा आदेश प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाचे आत दिनांक ०२ ऑगस्ट २०२६ अखेर रक्कम रुपये ७७१३५/- (रुपये सत्यातर हजार एकशे पसतीस मात्र) अधिक दिनांक ०१/०४/२०२० पासून होणारे व्याज तसेच वसुलीचा खर्च, शासकीय अधिभार वसुल करावयाचे भरणा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग यांचेकडे समक्ष भरणा करावा.
६. श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड व इतर वर नमुद केलेल्या रक्कमेचा भरणा वरील मुदतीत केला नाही तर त्यांच्या वर नमूद केलेली आणि जप्त केलेल्या स्थावर मिळकतीची विक्री करण्यात येईल व सदर विक्रीच्या रकमेतून बँकेस येणे असलेल्या रकमेची वसुली करण्यात येईल.
७. हा आदेश बँकेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर व बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.
८. महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम १४६ (न) मधील तरतुदीनूसार, ''एखाद्या संस्थेच्या सदस्याने संस्थेचा अग्रहक्क असलेल्या मालमत्तेची लबाडीने विल्हेवाट लावणे किंवा एखाद्या सदस्याने किंवा अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने किंवा कोणत्याही व्यक्तीने संस्थेची देणी टाळण्याच्या लबाड उद्देशाने विक्री, हस्तांतर, गहाण, देणगी, बक्षीसपत्र याद्वारे किंवा अन्यथा आपल्या मालमत्तांची विल्हेवाट लावणे अपराध ठरेल याची नोंद घ्यावी.
हा आदेश कार्यालयीन शिक्का व माझे स्वाक्षरीसह दिनांक ०३ जुलै २०२६ रोजी दिला आहे.

स्थळ : अलिबाग
दिनांक : ०३/०७/२०२६

**(किरण राउत)**
**वसुली अधिकारी, अलिबाग**
**(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७)**
**द्वारा/- रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग**

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये जप्ती आदेश

जा.क्र./ ८३/कलम १५६/मिळकत जप्ती/२०२६-२७
विशेष वसुली अधिकारी, अलिबाग यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या
अलिबाग मुख्य कार्यालय
दिनांक : ०३/०७/२०२६

**: जप्ती आदेश :**

वाचले : १. मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांचे कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये मिळालेला वसुलीचा दाखला क्रमांक ८१७/२०२०-२१/२८.०९.२०२०
२. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७
३. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड अलिबाग यांचेकडील आदेश क्रमांक जाक्र . जिउनि / कात -६ / कलम -१५६/आदेश /रायगड जि.म.स. बँक/९८२/सन २०२६ दिनांक ४ मे २०२६ रोजीचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ चे अधिकार प्रदान आदेश

१. ज्याअर्थी, मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अलिबाग यांनी १) श्री. सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड कर्जदार (मयत) २) श्री देवीचंद तुकाराम कळंबे मु. पो. कुरुळ, ता. अलिबाग जि रायगड जामीनदार ३) श्री अशोक जयराम पाटील मु. पो. कुरुळ, ता. अलिबाग जि रायगड जामीनदार यांचे विरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र, दिनांक २८ सप्टेंबर २०२० रोजी दिलेले आहे;
२. ज्याअर्थी, वसुली अधिकारी, अलिबाग यांनी नियम १०७ अन्वये नोटीस रा.जि.म.स. बँक/वसुली/४१/सन २०२६-२७/ठिकाण अलिबाग /०३/०६/२०२६ मागणी नोटीस देणेत आली होती;
३. आणि, ज्याअर्थी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड अलिबाग यांचेकडील आदेश क्रमांक जाक्र. जिउनि/कात -६/कलम - १५६/आदेश/रायगड जि.म.स. बँक/९८२/सन २०२६ दिनांक ४ मे २०२६ रोजीचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ चे अधिकार प्रदान आदेशाने किरण कमळाकांत राउत निम्न स्वाक्षरीदार यांना कलम १५६ व नियम १०७ चे अधिकार प्रदान करणेत आले आहेत;
४. आणी ज्याअर्थी १. सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड कर्जदार यांनी वसुली दाखल्यात नमुद रक्कमेची वसुली व रक्कमेचा भरणा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग यांचेकडे केलेला नाही. तसेच त्यांचेकडून अद्यापी दिनांक १९ जून २०२६ अखेर रक्कम रुपये ४९१३३८.५८/- (रुपये चार लाख एक्यानऊ हजार तीनशे अडतीस रुपये अठावन्न पैसे मात्र) अधिक दिनांक ०१/०४/२०२० पासुन पुढील व्याज, खर्च, शासकीय अधिभार इ. वसुल करावयाचे आहेत आणि,
५. ज्याअर्थी, वसुली अधिकारी, अलिबाग यांचे असे निदर्शनास आले आहे की, वसुली प्रमाणपत्र मध्ये श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड कर्जदार यांच्या मालकी वहिवाटीची व हिश्श्याची स्थावर मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

मौजे अलिबाग नगर परिषद, ता अलिबाग जि रायगड, तलाठी सजा अलिबाग सिटी सर्व्हे अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड तसेच मे. सहदुय्यम निबंधक व तहसिलदार, अलिबाग यांच्या अधिकार/ कार्यक्षेत्रातील हद्दीतील स्थावर मिळकत पुढीलप्रमाणे-

| मिळकतदाराचे नांव | मिळकतीचा तपशिल | मिळकत क्रमांक |
|---|---|---|
| श्री सूर्यकांत यशवंत खोत | मौजे अलिबाग नगर परिषद हद्दीतील श्रीबाग क्षेत्र विकास योजना क्र २ मधील भूखंड क्र इ - १०८ क्षेत्र ५० चौ मी जागा व त्यावर बांधकाम केलेले २९३.६३ चौ फु घर | Z१ASB २२६११ (जुना घर क्र ५० ब) |

६. आणी ज्याअर्थी वसुली अधिकारी, अलिबाग यांच्या असेही निदर्शनास आले आहे की, श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड यांची वर नमूद केलेली स्थावर मालमत्ता जप्त करुन विक्री केल्यास यांचेकडून येणेबाकी असलेली रक्कम वसूल होणे शक्य आहे.
त्याअर्थी मी वसुली अधिकारी, रायगड जिल्हा मध्यर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**: आदेश :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ (११) ड त्यातील संबंधित पोटनियमाद्वारे मला प्राप्त झालेले अधिकार व तरतुदीस अनुसरुन मी श्री किरण कमळाकांत राउत वसुली अधिकारी, अलिबाग, द्वारा/- रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग, श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड यांची खाली वर्णन केलेली त्यांचे मालकी वहिवाटीची व हिश्श्याची स्थावर मिळकत या आदेशान्वये जप्त करीत आहे.
२. जप्त करण्यात आलेल्या स्थावर मिळकतीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.
मौजे अलिबाग नगर परिषद, ता अलिबाग जि रायगड, तलाठी सजा अलिबाग सिटी सर्व्हे अलिबाग, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड तसेच मे. सहदुय्यम निबंधक व तहसिलदार, अलिबाग यांच्या अधिकार/ कार्यक्षेत्रातील हद्दीतील स्थावर मिळकत पुढीलप्रमाणे -

| मिळकतदाराचे नांव | मिळकतीचा तपशिल | मिळकत क्रमांक |
|---|---|---|
| श्री सूर्यकांत यशवंत खोत | मौजे अलिबाग नगर परिषद हद्दीतील श्रीबाग क्षेत्र विकास योजना क्र २ मधील भूखंड क्र इ - १०८ क्षेत्र ५० चौ मी जागा व त्यावर बांधकाम केलेले २९३.६३ चौ फु घर | Z१ASB २२६११ (जुना घर क्र ५० ब) |

३. श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड कर्जदार आणि त्यांचे प्रतिनिधी अगर दलाल यांना सदर मालमत्तेची विक्री करणे अगर त्यावर बोजा निर्माण करणे अगर सदर मालमत्तेचे कोणत्याही तऱ्हेने हस्तांतरण करणे यास या आदेशाने प्रतिबंध करण्यात येत आहे.
४. तमाम लोकांस कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या आणि जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेबाबत श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड कर्जदार अगर त्यांचे प्रतिनिधी अगर दलाल यांचेबरोबर कसलाही कोणताही व्यवहार करु नये. या आदेशाविरुद्ध कोणास कोणत्याही स्वरुपाची हरकत घेणे असल्यास/नोंदविणे असल्यास खाली सही करणार यांना लेखी पुराव्यानिशी ३० दिवसात कळविण्यात यावे, अन्यथा अशी कोणतीही हरकत नाही असे गृहीत धरुन पुढील कारवाई केली जाईल. या आदेशाविरुध्द कदाचित कोणाही इसमाने वरील मिळकतीबाबत. श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड कर्जदार अगर त्यांचे प्रतिनिधी, अगर दलाल यांचेबरोबर व्यवहार केल्यास सदर व्यवहार खाली सही करणार व वसुली प्रमाणपत्र/ॲवॉर्ड धारण करणार रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग यांचेवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.
५. श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड व इतर यांनी हा आदेश प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसाचे आत दिनांक ०२ ऑगस्ट २०२६ अखेर रक्कम रुपये ४९१३३८.५८/- (रु रुपये चार लाख एक्याण्णव हजार तीनशे अडतीस रुपये अठावन्न पैसे मात्र) अधिक दिनांक ०१/०४/२०२० पासून होणारे व्याज तसेच वसुलीचा खर्च, शासकीय अधिभार वसुल करावयाचे भरणा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग यांचेकडे समक्ष भरणा करावा.
६. श्री सूर्यकांत यशवंत खोत, मु. श्रीबाग नं २, पो. ता. अलिबाग जि रायगड व इतर वर नमुद केलेल्या रक्कमेचा भरणा वरील मुदतीत केला नाही तर त्यांच्या वर नमूद केलेली आणि जप्त केलेल्या स्थावर मिळकतीची विक्री करण्यात येईल व सदर विक्रीच्या रकमेतून बँकेस येणे असलेल्या रकमेची वसुली करण्यात येईल.
७. हा आदेश बँकेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर व बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.
८. महाराष्ट्र सहकारी संस्था, अधिनियम १९६० चे कलम १४६ (न) मधील तरतुदीनूसार, एखाद्या संस्थेच्या सदस्याने संस्थेचा अग्रहक्क असलेल्या मालमत्तेची लबाडीने विल्हेवाट लावणे किंवा एखाद्या सदस्याने किंवा अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने किंवा कोणत्याही व्यक्तीने संस्थेची देणी टाळण्याच्या लबाड उद्देशाने विक्री, हस्तांतर, गहाण, देणगी, बक्षीसपत्र याद्वारे किंवा अन्यथा आपल्या मालमत्तांची विल्हेवाट लावणे अपराध ठरेल याची नोंद घ्यावी.
हा आदेश कार्यालयीन शिक्का व माझे स्वाक्षरीसह दिनांक ०३ जुलै २०२६ रोजी दिला आहे.

स्थळ : अलिबाग
दिनांक : ०३/०७/२०२६

**(किरण राउत)**
वसुली अधिकारी, अलिबाग
(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७)
द्वारा/- रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या अलिबाग




## राशीभविष्य

- **मेष** : अचानक अधिक खर्च करावा लागेल. जुनी दुखणी पुन्हा उद्‌भवतील. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **वृषभ** : कौटुंबिक प्रश्नांचा ताण राहील. महत्त्वाची कामं वेळीच करून घ्यावी. प्रवासात काळजी घ्यावी.
- **मिथुन** : व्यवसायात नवे करार होतील. अनुभवींचा सल्ला ध्यानी घ्या. उपजत कला-गुणोंना वाव मिळेल.
- **कर्क** : आर्थिक व्यवहारात लाभ होईल. दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. जुनी येणी सहज वसूल होतील.
- **सिंह** : .स्थावर, वाहन सौख्य लाभेल. दिलासादायक घटना घडतील. विद्यार्थ्यांना नव्या संधी लाभतील.
- **कन्या** : कामाचा उत्साह राहील. प्रियजनांच्या भेटी होतील. शिक्षण, क्रीडा क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **तूळ** : सुवार्ता कानी येईल. हितसंबंधियांकडून दिलासा मिळेल. कामांसाठी अधिक मेहनत घ्यावी लागेल.
- **वृश्चिक** : स्वकर्तृत्त्वावर विश्वास ठेवा. दृढनिश्चयानं कामं मार्गी लागतील. व्यवसायात बदल तुर्तास नको.
- **धनु** : नोकरीत कामाचा ताण राहील. बोलण्यातून गैरसमज संभवतात. जुनी दुखणी पुन्हा उद्‌भवतील.
- **मकर** : गुंतवणुकीला चालना मिळेल. छोट्या व्यावसायिकांना नव्या संधी लाभतील. बाकी चिंता नसावी.
- **कुंभ** : प्रियजनांच्या भेटीनं समाधान लाभेल. व्यवसायात अडचणी येतील. कलाकारांचा उत्साह वाढेल.
- **मीन** : महत्त्वाच्या कार्यात अडचणी येतील. कामासाठी प्रवास लाभदायक ठरेल. विचारानं रहायला हवं.

स्टाईल स्टेटमेंट

## रंग मान्सून फॅशनचे

✲ या दिवसात कॉटन, सिंथेटिक, खादीचे लूज फिटिंगचे कपडे घाला. जास्त घट्ट कपडे अंगाला चिकटून बसतात. यामुळे खूप अस्वस्थ वाटतं. हाफ स्लीव्ह किंवा स्लीव्हलेस कपड्यांना पसंती द्या. ऑफ शोल्डर टॉप्स,लिनन किंवा कॉटनचे डंग्री, जंपसूट्स ट्राय करा.

✲ पावसाळ्यात गडद रंगांची चलती असते. चेरी, फ्रेश रेड, ब्लश या रंगांसोबत ग्रे, ब्लू, बेज हे न्यूट्रल रंगही ट्राय करता येतील. पिवळ्या रंगालाही पसंती मिळते आहे. या दिवसात पांढऱ्या रंगाचा वापर टाळा.

✲ या हंगामात केस घट्ट बांधू नका. त्याऐवजी लूज हेअरस्टाईल्स ट्राय करा. तसंच फार भडक मेक अप टाळा. या दिवसात सौम्य मेक अप शोभून दिसतो. वॉटरप्रूफ मेक अप उत्पादनं वापरा.

## ४ जुलै

दिन विशेष

- **२०१३ :** इजिप्तमध्ये देशाची सूत्रे सरन्यायाधीश अदली मसूर यांच्याकडे सोपवली गेली.
- **२०१६ :** कुख्यात दहशतवादी यासीन भटकळचा तुरुंगातून पळून जाण्याचा इशारा.
- **२०१७ :** मुख्य निवडणूक आयुक्तपदी अचलकुमार ज्योती यांची नियुक्ती.
- **२०१८ :** रिझर्व्ह बँकेने 'बँक ऑफ चायना'ला भारतात व्यवसाय करण्यास परवानगी दिली.

धमाल

## दंश त्यांचा वेदनादायी

मित्रांनो, पिवळ्या रंगाच्या गांधीलमाशीची एक प्रजाती आपल्याला पहायला मिळते. या गांधीलमाशीच्या पोटावर पिवळे पट्टे असतात. त्यामुळे या माशीला यलो जॅकेट म्हटलं जातं. त्यांचं शरीर तीन भागांमध्ये विभागलेलं असतं. त्यांना चार पंख असतात. त्यांच्या पोटाच्या खालच्या बाजूला नांगी असते. यलो जॅकेटचा दंश वेदनादायी असतो. जगभरात यलो जॅकेटच्या वेगवेगळ्या प्रजाती आढळतात. उत्तर अमेरिकेत युरोपियन यलो जॅकेट, ईस्टर्न यलो जॅकेट आणि सदर्न यलो जॅकेट या प्रजाती आढळतात. या माशा घरट्यांमध्ये राहतात. काही घरटी जमिनीखाली तर काही झाडांवर असतात. त्यांच्या गटात कामकरी माशा असतात. तसंच एक राणी माशी असते. राणी माशी घरट्यात राहते आणि अंडी देते. कामकरी माशा घरटी बांधतात आणि अन्नाची सोय करतात. एका घरट्यात ४ ते ५ हजार माश्या राहतात. हे घर एका हंगामापुरतं टिकतं. या माश्या फळं आणि पानांमधला रस शोषतात. गोड पेयं, फळांचे रस याकडेही त्या आकर्षित होतात. काही वेळा छोटे किडे खातात. मधमाश्यांच्या पोळ्यातून मध पळवतात. कामकरी माश्या आणि या माशीचे नर हिवाळ्यात जगत नाहीत. फक्त राणी माशी तग धरू शकते.

### पंचांग

**शनिवार, ४ जुलै २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
निज ज्येष्ठ कृ. ४, चंद्रराशी : कुंभ,
नक्षत्र : धनिष्ठा, योग : प्रीति,
सूर्योदय ६.०८ सूर्यास्त ७.१८

### फॉरवर्ड्स


**इस छोटे से दिल में किस किस क़ो ज़गह दे हम...**

**गम रहे.. दम रहे... फरियाद रहे..**
**या अपनों क़ी यादें रहें...!**

आरोग्यमंत्र

## दात संवेदनशील आहेत?

दातांची दुखणी विविध प्रकारची असतात. दात किडतात, काळे होतात, तुटतात, त्यात पोकळी निर्माण होते त्याबरोबरच ते संवेदनशीलही होतात. भारतीयांच्या जेवणात लोणची, चटण्या यांचा समावेश असतो. सोडा, कोल्ड ड्रिंक, चहा-कॉफी पिणाऱ्यांची संख्याही खूप मोठी आहे. आपण गोडाचं सेवनही अधिक प्रमाणात करतो. पण या अन्नपदार्थांमुळे दातांची संवेदनशीलता वाढते. थंड किंवा गरम पेय पिताना किंवा काही खाताना दातांमध्ये झिणझिण्या आल्यासारखं वाटतं. याला दातांची संवेदनशीलता म्हणतात. कमी पीएच असणाऱ्या पदार्थांमुळे दातांवरच्या



आवरणावर दुष्परिणाम होतो आणि संवेदनशीलता वाढीस लागते. अजाणतेपणी आपण आम्लयुक्त पदार्थ खात असतो. त्याचाही विपरीत परिणाम होतो. कॉफी, लोणची, चटण्या, सोडा, कँडी असे पदार्थ दातांच्या आवरणावर परिणाम करतात. त्यामुळे हिरड्या कमकुवत होऊ लागतात. दातांमध्ये झिणझिण्या येतात. अनेकजण त्याकडे दुर्लक्ष करतात. या समस्येवर काय उपाय करावा याची माहिती नसते. बरेचदा यावर घरगुती उपाय केले जातात. या उपायांनी बरं वाटलं नाही तर लोक झिणझिण्या आणणारे पदार्थ वर्ज्य करतात. पण हा यावरचा उपाय नाही. डेंटिस्टकडे जाऊन योग्य उपचार घेणं हाच यावरचा योग्य उपाय आहे. दातांच्या संवेदनशीलतेकडे केलं गेलेलं दुर्लक्ष तुम्हाला चांगलंच महागात पडू शकतं. त्यामुळे याबाबत काळजी घेणं गरजेचं आहे.

### फॅशन पॅशन

✲ डेनिम शर्ट किंवा जॅकेटवर छानसं नक्षीकाम करून घेता येईल. हे नक्षीकाम हातांनी केलं जात असल्याने तुम्हाला रॉयल लूक मिळू शकतो.

✲ डेनिम जॅकेट किंवा शर्टच्या मागच्या बाजूला वेगवेगळे पॅच लावता येतील. पॅचेसची निवड करून ते शिवून घेता येईल.

✲ यापैकी काहीच करायचं नसेल तर एखादा लेदर पॅच लावून घ्या. यामुळे तुम्हाला क्लासी लूक मिळेल.

✲ शेडेड म्हणजे दोन रंगांचं कॉम्बिनेशन तुम्ही करू शकता. लाईट आणि डार्क रंगांमध्ये खेळू शकता. शेडेड जीन्स खूप छान दिसते.

करिअरवाटा

## प्रोजेक्ट मॅनेजर होताना...

सध्या प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून काम करु पाहणाऱ्यांना मुबलक संधी उपलब्ध होत आहेत. विविध औद्योगिक संस्थांना या व्यावसायिकांची गरज भासते. एखादा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी, त्याच्या विविध पैलूंवर लक्ष ठेवण्यासाठी, विविध कामात समन्वय साधण्यासाठी अशा प्रकल्प



व्यवस्थापकांची गरज असते. प्रोजेक्ट मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ही या क्षेत्रातील उत्तम शिक्षण देणारी प्रमुख संस्था समजली जाते. या तसंच अन्य काही संस्थांचा यासाठीचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध आहे. हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पदव्युत्तर आहे. त्यांना सर्टिफाईड असोसिएट इन प्रोजेक्ट मॅनेजमेंट असं म्हटलं जातं. या अभ्यासक्रमात प्रोजेक्ट मॅनेजमेंटमधील पायाभूत गरजांचं ज्ञान दिलं जातं आणि या कामामध्ये सातत्याने वापरल्या जाणाऱ्या काही संकल्पनांची माहिती दिली जाते. हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी चांगल्या संस्थेत नोकरी करुन उत्तम अर्थार्जन करु शकतात अथवा प्रोजेक्ट मॅनेजमेंट प्रोफेशनल (पीएमपी) म्हणून स्वतंत्रपणे मार्गदर्शन संस्थाही चालवू शकतात. या संस्थांनाही चांगलं काम आणि उत्तम नफा मिळतो.

खेचाखेची

### चष्मा

**डॉक्टर** : चष्मा कोणासाठी बनवायचा आहे?

**बबलू** : माझ्या शिक्षकांसाठी.

**डॉक्टर** : पण का?

**बबलू** : कारण ते माझ्याकडे बघून मला गाढव म्हणतात!

### वेगळं काही

जपानमध्ये ज्येष्ठांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यांच्या देखभालीचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत. म्हणूनच टोकियोमध्ये ज्येष्ठांसाठी 'सर्व्हिस लास वेगास' नावाने डे केअर सेंटर चालवलं जातं. इथे ज्येष्ठांच्या करमणुकीची सर्व सुविधा उपलब्ध आहे. कॅसिनो थीमवर आधारित या डे केअर सेंटरमध्ये विनिंग फॉर्म्युला मशीन्स बसवण्यात आली आहेत. या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक गेम्स खेळू शकतात. जपानमध्ये जुगारावर बंदी आहे. कोणीही पैसे लावून जुगार खेळू शकत नाही. मात्र आपण फक्त आनंदासाठी इथे गेम्स खेळत असल्याचं ज्येष्ठ नागरिक सांगतात. ज्येष्ठ नागरिक अशा ठिकाणी निवांत वेळ घालवू शकतात.

## डोळ्यांचा मेक अप करताना...

सौंदर्यसाधना

डोळ्यांचा मेक अप परफेक्ट असेल तर रुप अधिक उत्तम प्रकारे खुलतं. म्हणूनच आय मेक अपच्या काही टिप्स जाणून घ्यायला हव्या.

✲ डोळ्यांचा मेक अप पसरू नये यासाठी आय प्रायमरची भूमिका महत्त्वाची असते. मात्र त्वचेशी मिळतजुळतं आयप्रायमर लावावं. त्यामुळे आयशॅडोलाही उठाव मिळतो. ✲ अनेकींचे आयलॅशेस तेलकट असतात. अशा वेळी



मस्कारा जास्त काळ टिकत नाही. हे टाळायचं तर बीबी आणि सीसी क्रीम कन्सिलरसोबत मिसळावं आणि आयबेस क्रीम बनवावं. हे क्रीम पापण्यांवर लावावं आणि लूज पावडरने सेट करावं. यामुळे पापण्या तेलकट होत नाहीत. ✲ डोळ्यांखाली काळी वर्तुळं असतील तरच कन्सिलरचा वापर योग्य ठरतो हा गैरसमज आहे. घरच्या घरी आय मेक अप करत असाल तर कन्सिलरचा आवर्जून वापर करावा. ✲ आयशॅडो लावताना चांगल्या प्रकारे ब्लेंड करणं गरजेचं आहे. पहिल्यांदा आयशॅडो वापरणार असाल तर पावडर आयशॅडोची निवड करावी. ✲ आय मेक अपसाठी फ्लॅट ॲप्लीकेटर ब्रश सर्वात योग्य आहे. ब्रो बोनला उभारी देण्यासाठी फ्लॅट अँगल ब्रश वापरावा.

## सुडोकू १२३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | | | | | | ८ | | ३ |
| | ३ | २ | | | | | १ | |
| | | ६ | ३ | १ | | | ९ | |
| ३ | | | १ | | | ९ | | |
| | | ९ | ५ | ८ | ७ | ३ | | |
| | | ८ | | | ९ | | | ४ |
| | १ | | | ७ | ५ | ४ | | |
| | ८ | | | | | २ | ३ | |
| ५ | | ४ | | | | | | ६ |

**टीप -**

✲ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्न ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


✲ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✲ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १२२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ७ | ६ | २ | ९ | ३ | ८ | १ | ४ |
| २ | ३ | ८ | ७ | ४ | १ | ९ | ५ | ६ |
| १ | ४ | ९ | ८ | ५ | ६ | ३ | ७ | २ |
| ३ | ९ | १ | ५ | ६ | ७ | ४ | २ | ८ |
| ४ | ८ | २ | १ | ३ | ९ | ५ | ६ | ७ |
| ६ | ५ | ७ | ४ | ८ | २ | १ | ९ | ३ |
| ९ | २ | ४ | ३ | ७ | ५ | ६ | ८ | १ |
| ७ | ६ | ३ | ९ | १ | ८ | २ | ४ | ५ |
| ८ | १ | ५ | ६ | २ | ४ | ७ | ३ | ९ |

## शब्दकोडे क्रमांक १२३



**आडवे शब्द :-**
१) आपल्याला जे मिळत असेल त्यात तृप्त असावे या अर्थाची एक म्हण
६) मानखंडना
९) गवंडी
१०) उपकार
११) वायू, हवा
१३) खोडण्याचे साधन
१५) सोळावा ✲✲✲ धोक्याचे
१७) टीका करणारा
२०) डावखोरा
२१) सद्वर्तन
२३) लहानच्या विरुद्धचा शब्द
२५) नवप्रवेशित
२८) पुरुष
२९) सबब
३०) भीती
३१) हमाल
३४) चालविणारा
३५) मायाळू, ममताळू
३६) सोंगट्या मांडण्याचे वस्त्र, गुणाकार
३७) प्लेग-एक आजार
३९) रचण्याची मजुरी
४१) हेकट
४२) विशेष उल्लेखनीय हकिगत
४३) ✲✲✲ जावक
४४) फुरसत
४६) सरस्वतीचे एक नाव
४७) बोटासह हाताचा तळवा
४८) ओकारी
५०) सुचविणारे, दर्शविणारे
५२) आवड, द्रवपदार्थ
५४) जीवलग मित्र
५५) पाप
५६) काळ्या तोंडाचे माकड
५७) मीन, एक जलचर
५९) डोके
६०) मनाला लागलेली टोचणी
६१) शुष्कता, आग, भकभक
६४) स्तुत्य
६६) चकचकीत, स्वच्छ
६९) ठिसूळ दगडाचा एक प्रकार
७१) तमाशातील नाट्य
७२) लाख-एक ज्वालाग्रही पदार्थ
७३) नवऱ्याची किंवा बायकोची आई
७४) माणूसघाणा, मत्सरी
७७) एक चतुर्थांश भाग
७८) कामदेवाचे एक आयुध
८०) मलई
८१) दोन मैलाचे अंतर
८२) प्रभात
८३) जंगली
८४) दानवीर
८५) रसिक, जाणकार
८६) बूड, सर्वात खालचा भाग

**उभे शब्द :-**
१) भटक्या जनावरांना अडकवून ठेवण्याची जागा
२) गवत
३) वाघोबाची मावशी
४) गुणज्ञ, कदर करणारा
५) श्रेष्ठ पुरुष
६) शेकोटी, शेगडी
७) झोका, आंदोलन
८) कापडी बंद
१२) गव्हाचे अथवा वेळूचे सत्व
१४) प्रवासी गाडी
१६) च्या पुढे, च्या प्रत्यक्ष
१८) कानाजवळचा भाग
१९) घाईने पुष्कळ काम उरकणे, विपुलता, चंगळ
२२) बग्गी, मोटार इ. वाहन
२४) समई
२६) गोणपाटाचे कापड
२७) मैत्री
२९) कावकाव कावळ्यांचा आवाज
३१) स्तुती करणारा
३२) उत्तराधिकारी
३३) चहा पिण्याचे जोड साधन
३८) टिंगल, उपहास
४०) एक पालेभाजी
४१) पूर्णपणे बजावून, ठाकून ठोकून, (केलेली विचारणा)
४२) लोणच्यातील द्रव मसाला
४३) आजोबा
४४) वर्ष
४५) पाठीला आलेली छोटी वक्रता
४६) शाळेतील शिक्षक
४७) वारा घेण्याचे, हवेला फिरविण्याचे एक साधन
४९) दहावी रास
५१) खंदक
५३) वेळ (हिं.)
५४) संपूर्ण
५५) मेणा
५६) घाव, दिवस
५८) प्रामाणिक
६०) अखंड
६२) व्यय
६३) शेव, चिवडा, पापडी इ.चे मिश्रण
६५) बेचव, पचपचीत
६७) डोक्यातील फोड
६८) तळे, सरोवर
७०) बोटाच्या टोकावरील आवरण
७३) सर्द होणे, ओलसर होणे
७४) नेत्र
७५) नाकावरील मोत्याचा दागिना
७६) वागणूक
७७) जवळ (हिं), उत्तीर्ण (इं)
७८) एक धान्य
७९) च्या बद्दल
८०) जमिनीवरील सरकारी कर
८१) चंद्राची कड
८२) पडसे

**(उत्तर उद्याच्या अंकात)**

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# कलासक्त


रंगबहार

**शरद कोरडे**

# कांतीलाल कडू यांचे व्यासांचे महाभारत

भारतीय पवित्र ग्रंथ रामायण आणि महाभारत हे अग्रणी आहेत. मानवाच्या नानाविध पैलूंचे दर्शन घडविणाऱ्या या ग्रंथात मानवी स्वभावाचे अत्यंत जिवंत चित्रण गुणां व गुणांचे निरपेक्ष दर्शन अधिक आणि पार आर्थिक वैभव वाचन दौलणिक परीक्षण व अदृश्य मूल्यांचे आदर्श यांनी पानोपन भरलेली आहे. रामायण आणि महाभारतातील कथानके ही ऐतिहासिकच आहेत पण रामायणाचे स्वरूप हे महाकाव्याचे तर महाभारताचे स्वरूप हे इतिहासाचे आहे रामायणातील अनेक व्यक्ती चित्रे ही बहुरंगी पण प्रखर आदर्शवादी आहेत.

महाभारतातील व्यक्तिचित्रे ही व्यवहाराचा आदर्श मानणारी विशाल वृत्तीची व विकसित बुद्ध झालेली आहेत, तितकीच ती जटिल स्वभावाची गुंतागुंतीची आहेत. यांतील दुर्गुणी माणसांच्या अंगी गुणांची ही भलावण आहे तशीच गुणी माणसांच्या अंगी अवगुणांचे वेस्टन ही आहे युजेस्टेला सारखे अति सत्वशील त्यातून अगदी कडे झोपणारे आहेत. तर अर्थश्य पुरुषो दास हा म्हणणारे भीष्मा द्रोणांसारखे थोर पुण्य पुरुषही आहेत. आपल्या पित्याच्या लग्नासाठी देवराच्या घरी जाऊन सत्य व तिला मागणी घालण्याची वेळ देववृत्तावर येते त्यासाठी सत्यवतीच्या मुलाला राज्यपदासाठी एवढा राज्य पद देण्याची अट मांडण्याची मागणी धीवर घालतो व दैवत ती मान्य करतो इतकेच नव्हे तर पुढे कधीही माझ्या मनान व माझ्या पत्रांच्या मनात राज्य लालसा निर्माण होऊ नये म्हणून मी आजन्म अविवाहित राहील अशी भीष्म प्रतिज्ञा देवव्रत करतो व ती पुढे अखेरपर्यंत पाळतो आणि तो भीष्म ठरतो पुढे पुढे विचित्र वीर्याच्या मृत्यूनंतर सत्यवती भीष्माला गुरुकुलासाठी तू लग्न कर व राज्यपदाचा स्वीकार कर अशी विनंती करते पण भीष्म आपल्या प्रतिज्ञांनी इतके आत्मकेंद्रे झाले असतात की कुलाच्या कल्याणासाठी ही ते आपली प्रतिज्ञा मोडत नाहीत. यावेळी देशमाने सत्यवतीच्या ऐकले असते तर त्यांनी यशस्वीपणे राज्य चालवले असतेच व पुढे होणारा वंश श्रेणी ठरला असता केवळ लोकापूर टाळण्यासाठी व अत्यंतिक निर्वाचा नेपोटी भीष्मच अप्रत्यक्षरीत्या खरोखुलाच्या नाश्याला कारणीभूत ठरले असाही एक मतप्रवाह तयार झाला. अशा अनेक जण त्यांच्या घटना महाभारतांत आहेत म्हणूनच जे महाभारतात नाही ते जगात नाही हे वचन वाचताना महाभारताच्या महतीची कल्पना माणसास येते आपले तत्वज्ञान लेखी शास्त्र धर्म तत्वे इतिहास कला संस्कृती व सर्वांगीण सुधारणा किती उच्च प्रतीची होती हे जाण्याची असल्यास महाभारत जाणून घ्यावे लागेल.



हे व्यासांचे महाभारत म्हणून जाणून मांडण्याचे काम कांतीलाल कडू यांनी प्रचंड मेहनत घेऊन व चिंतन करून आपल्या समोर ठेवलेले आहे. त्यासाठी त्यांनी मूळ भारतासह शिवाजी सावंत यांचे मृत्युंजय दाजी पणशीकर यांचे महाभारत एक सोडाचा प्रवास राजीव पटेल अभय टिळक व अनेक समीक्षकांच्या लेखनाचा अभ्यास करताना आपल्या विविध पोरांनाही मागवा घेतला आहे. हे करताना त्यांनी जनमानसात असलेल्या श्रद्धास्थानांना वंदनीय देव देवतांना आरोपीच्या पिंजऱ्यात घेऊन त्यांचे मूर्तीभंजन करण्याची भूमिका घेतली नाही अशी अनेक प्रकरणे कांतीलाल यांनी सह्यादितपणे रेखाटले आहेत त्याबद्दल निश्चितच त्यांचे अभिनंदन करायला हवे. प्रभात काली स्नानादी आहे की करण्यासाठी व्यासमुनी गंगा तीरावर आले होते. थंड पाण्यात स्नान करून त्यांनी सूर्यदेवाला अर्ध्य दिले. प्रसंगाने व्यासांचे महाभारत या कादंबरीचा प्रारंभ होतो हस्तीना पुरात कौरव पांडवांच्या महायुद्धाचे ढग जमा होऊ लागलेले असतात व कौरव पांडव आपापल्या संबंधित राज्यांची संधान बांधू लागले असतात या पार्श्वभूमीवर कादंबरीची सुरुवात होते. त्यानंतर व्यासमणी आपल्या जन्माचे कथा सांगतात. खरे तर ही कादंबरी क्रांतीलाल यांनी व्यास मार हे स्वतः सांगत असून ती प्रथम पुरुषी एक वचनी आहे त्यामुळे त्यांचे मनांतील विचार चिंतन व योजना ते स्वतःच वाचकांना सांगत आहेत. मात्र, ते या ग्रंथातीलच एक पात्र असल्याने त्यांनी निवेदन त्यांचे निवेदन तृतीय पुरुषी आहे. त्यास व्यासमणी लेखनात त कोणाचेही कोणत्याही गुपित लपवीत नाहीत त्यांच्या स्वतः च्या जन्माची कथाही ते खोलेपणे मांडतात पराशर नामक ऋषी सत्यवतीच्या होडींतून गंगा पार होत असताना ते सत्यवतीचे लावण्य व धाडसी स्वभाव पाहून मोहित होतात अनेक वर्ष लैंगिक भुकेवर नियंत्रण मिळविण्यात त्यांनी विजय मिळवलेला असतो. पण सत्यवतीचे देखणे वैभव पाहून त्यांचा संयम संपतो व ते सत्यवादी कडे समागमाची मागणी करतात. त्यांच्या तेजाने जपून सत्यवती त्यांना नकार देत नाही पण दोन्ही किनाऱ्यावरील माणसांपासून तिला भय वाटत होते. पराशय होणे आपल्या तपश्चर्याचे बलाने नौकेभोवती धोक्यांची आवरण तयार करतात व एकांतात दोघांचे निधन होते. पुढे सत्य वतीला पुत्र होतो पण हा पुत्र गंगेच्या दोन रिफांमध्ये गावापासून दूर वाढवला जातो दोन दिवसांमध्ये वाढला म्हणून तो वायफायन पुढे तो जाणता झाल्यावर पराशर त्याला घेऊन वनांतपचार केला जातात जाताना व्यास आपल्या आईला वचन देऊन जातात ज्यावेळी तू मला आठ मार्च त्यावेळी मी तुला मदतीला साक्षात प्रकट होईल पुढे ज्या ज्या वेळी सत्यवतीने आपल्या पोतराज भेटण्याची मनोकामना केली त्या त्यावेळी व्यासांनी प्रकट होऊन सत्य व तिला मदत केली.

त्यानंतर कांतीलाल यांनी व्यासांच्या तोंडूनच सत्यवतीच्या जन्माची कथा परशुरामाचा पराक्रम आणि त्यांनी केलेला शास्त्री यांचा संवाद गौतम ऋषी व अहिल्या यांचे कथा भ्रगुशींनी क्रोधने साक्षात विष्णूंच्या वर्षास्थळावर केलेला दत्ता प्रहार भीष्माने विचित्र वीर्यासाठी स्वयंवरतून आंबा अंबिका व अंबालिका यांचे केलेले अपहरण आंब्याचा क्रोध तिने केलेली तपश्चर्या व नंतर घेतलेला शिखंडी जन्म द्रौपदी स्वयंवर व तिला पाच पांडवांचे प्राप्त झालेले पत्नी कौरवांनी भर सभेत केलेले द्रौपदीचे वस्त्रहरण पांडवांचा वनवास भारतीय युद्ध प्रचंड प्रमाणात झालेला नरस आव्हान दृश्य असे करणे द्रोणाचार्य अभिमन्यू घटत्कच जयेंद्र या वीरांचा मृत्यू ते हस्तीना पुढच्या सिंहासनावर युजेस्टिराला बसविल्यापासून पांडवांच्या स्वर्गरोहणापर्यंतचा भाग कांतीलाल यांनी अतिशय सविस्तरपणे व रसाळपणे व्यासांच्या तोंडून मधून घेतलेला आहे. कृष्णाने सत्यभामेसाठी साक्षात इंद्रांचा रोज पत्करून पृथ्वीवर आणलेले पारिजातकाचे झाड व त्यावरील फुलांनी रुक्मिणीच्या अंगणात नित्यनेमाने टाकलेला सडा हे प्रकरण पद्म पुरणात व हरिवंशत आहे. श्रीकृष्ण रुक्मिणी सत्यभामा यांच्या प्रेमाचा त्रिकोण व सवती मत्सर आणि स्त्री हट्ट प्रत्यक्ष श्रीकृष्णालाही सुटलेला नाही हे दर्शवून त्यांच्यातील नातेबंद व दुरावा यांचे प्रत्येकारी वर्णन कांतीलाल यांनी महाभारतांत आणले आहे. यातील काही प्रकरणात काहींनी अक्षय फी घेतले आहेत. त्यात सत्य वतीने आपल्या सोनाच्या नियोग विधीसाठी व्यासांना बोलवल्यावर आणखी तिसऱ्या स्त्रीच्या नियोगाचा हट्ट का करण्यात आला याबाबत थोडा खुलासा करतो सत्यवतीने आपल्या अंबिका या सणांच्या ठाई गर्भधारणा करण्यासाठी व्यासांना निमंत्रित केल्यावर व्यासांनी त्यापूर्वी या देवींनी मी सांगतो ते व्रत शुद्ध भावनेने एक वर्षपर्यंत केले पाहिजे तरच ती स्त्री माझ्यासारख्या उग्र तपसव्याशी समागमास योग्य होईल. परंतु, सत्यवतीला तेवढा धीर नव्हता अखेर व्यासांनी आपली विरोपता व वेश व शरीर सहन करण्याची मानसिक व शारीरिक तयारी करणारा असेल तर मी कौशल्यशी अंबिकेशी समागम करण्यास तयार आहे म्हणून व्यास रात्री अंबिकेच्या शयनगृहात गेले, त्यांचे ते उग्ररूप पिंगट जटा व लाल डोळे पाहून अंबिका घाबरली व तिने आपले डोळे घट्ट मिटले व्यासांनी आपले आईच्या आज्ञेचे पालन केले. व ते तिथून बाहेर पडले जाताना ते आहेस म्हणाले हा मुलगा विद्वान महाबुद्धिमान व बलशाली होईल पण मातृदोषांमुळे तो अंध होईल सत्यवतीने त्यानंतर दुसरी सून अंबालिका याच्यासाठी पुन्हा व्यासांना निमंत्रण दिले. त्यांनी पुन्हा येऊन आपले कर्तव्य केले त्यांच्या विद्रुप व उग्र रूपाकडे पाहून अंबालिका भीतीने पांढरी फटक पडली. व्यासांनी पुन्हा जाताना हा पुत्र पांढरा होईल माझ्याकडे पाहतात अंबालिका भीतीने पांढरी पडली होती काही कलाने सत्य वतीने पुन्हा आपली सून अंबिका हीच समजूत काढली व तिला नियोगास तयार केले व्यासांना निमंत्रित केले पण यावेळी अंबिकेने आपल्या रूप सुंदरदाशीला तो मतं कपडे व दागिने यांनी मडवून व्यासांकडे पाठविले तिने ऋषींचे आदला तिथे करून त्यांना नमस्कार केला व निर्मळ मनाने व निसन कोच पणे ती व्यासांची रमामा झाली. व्यासांनी जाताना तिला आशीर्वाद दिला या क्षणापासून तुझे दासी पण संपेल तुला मुलगा धर्मात्मा होईल बुद्धिमान व महाज्ञाने होईल हाच मुलगा प्रसिद्ध विधुर होय हाच यम धर्माचा अवतार मानला जातो मांडव्य ऋषींच्या शापामुळे यम धर्माला दासेपोटी जन्म घ्यावा लागला होता सत्यवतीच्या अठा हसामुळे व्यासांना तीन वेळा नियोगासाठी यावे लागले होते व हे सारे प्रयत्न नियतीने निष्पर ठरविले होते.

व्यासांच्या महाभारतात अशा अनेक कोट जातील व विस्मयकारक प्रसंगांची सविस्तर वर्णने आहेत. कांतीलाल यांनी ते लिहिताना कोठेही सभ्यतेची मर्यादा ओलांडली नाही तर काही प्रसंगांवर भाष्य करताना त्यांनी अनेक सुभाषिते व्यासांच्या तोंडी दिलेली आहेत अभिनव आक्रम कता हिरवेने मुद्दे मांडून प्रतिपक्षाचा अध्यक्ष करणे टाळले आहे. खरे तर कांतीलाल यांचा तो स्वभाव नाही आहे राजकारणात व आपल्या खासगी आयुष्यात ते आक्रमण सडेतोड मुद्दे मांडणारे व कोणतेही तमा न बाळगता स्पष्ट बोलणे आणि त्यातून कोणतेही संकट स्वतःवर ओढून घेण्यात ते तर्फेद असले तरी या इथे त्यांनी स्वतःवर नियंत्रण ठेवून लिखाण केले आहे कदाचित महर्षी व्यासांनीच त्यांनाही दीक्षा दिली असेल व्यासांप्रती त्यांचा असलेला आदर व्हाव व भक्तिभाव यामुळे त्यांच्या लेखणीला ही सवेदनशींचा व मधुरता आली असावी जय जेवाचक ही कादंबरी वाचतील त्यांना त्यांना आपल्या ऋषीमुनींनी लिहिलेले राम ायण महाभारत हरिवंशय योग वशिष्ठ हे ग्रंथ मूळ स्वरूपात वाचण्याची जिज्ञासा निर्माण होईल व ते त्यांच्या कादंबरीचे यश असेल. ***

**व्यासांचे महाभारत लेखक कांतीलाल कडू.**
**सर्वाय प्रकाशन पनवेल, पृष्ठे ५१२.**
**किंमत रुपये पाचशे.**




होय, हा 'बेबी बॉस' सध्या जगातील दिग्गज आणि खतरनाक गोलंदाजांच्या चिंधड्या उडवत मैदानावर अक्षरशः तांडव घालत आहे. वय लहान पण कीर्ती महान, अशीच काहीशी त्याची ख्याती आहे.

आज भारतीय क्रिकेटमध्ये अनेक स्टार पुत्रांची चर्चा रंगते. 'इंडियन वॉल' राहुल द्रविड यांचा सुपुत्र समित द्रविड आपल्या तंत्रशुद्ध फलंदाजीने धावांचा डोंगर उभारत आहे, तर त्यांचा दुसरा मुलगा अन्वित द्रविड हा वडिलांप्रमाणेच एक उत्तम यष्टिरक्षक आणि कमालीचा आक्रमक फलंदाज म्हणून उदयास येतोय. मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांचा मुलगा अर्जुन तेंडुलकर असो वा नजफगढचा नवाब वीरेंद्र सेहवागचा सुपुत्र असो, ही सर्व मंडळी मैदानावर घाम गाळत आहेत.

परंतु, या सर्व स्टार पुत्रांच्या गर्दीत कोणत्याही प्रकारची पार्श्वभूमी नसलेला, बिहारच्या मातीतून आलेला १५ वर्षांचा वैभव सूर्यवंशी आपल्या स्फोटक फलंदाजीने प्रतिस्पर्ध्यांना पुरता नामोहरम करत आहे आणि सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

२७ मार्च २०११ रोजी बिहारमधील समस्तीपूर येथे जन्मलेल्या या डावखुऱ्या फलंदाजाचा इथपर्यंतचा प्रवास अजिबात सोपा नव्हता. वैभवच्या नसांनसांत क्रिकेट धावत होते, हे त्याचे वडील संजीव सूर्यवंशी यांनी अचूक ओळखले. आपल्या मुलाला देशाचा महान क्रिकेटर बनवण्यासाठी वडिलांनी स्वतःची जमीन विकायलाही मागेपुढे पाहिले नाही. बापाच्या याच त्यागाचे आणि विश्वासाचे चीज वैभवने मैदानावर चौकार-षटकारांची आतिषबाजी करत केलेआहे.

> **क्रिकेटच्या अथांग आकाशात अनेक तारे चमकतात, पण काही तारे असे असतात जे उगवताच संपूर्ण नभांगण आपल्या प्रकाशाने उजळून टाकतात. सध्या क्रिकेट जगताला अशाच एका वादळाने कवेत घेतले आहे, ज्याचे नाव आहे वैभव सूर्यवंशी! क्रीडारसिकांनी त्याला अत्यंत आदराने आणि कौतुकाने नाव दिले आहे... 'बेबी बॉस'!**

वैभवने वयाच्या प्रत्येक टप्प्यावर क्रिकेटच्या इतिहासाला नवी व्याख्या दिली आहे.जानेवारी २०२४ मध्ये, वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षी बिहारकडून प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण करत त्याने महान क्रिकेटपटू युवराज सिंगचा विक्रम मोडीत काढला.

नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या आयपीएल लिलावात 'राजस्थान रॉयल्स'ने वैभवला १.१ कोटी रुपयांना खरेदी केले. यासह तो आयपीएल इतिहासातील सर्वात तरुण खेळाडू ठरला.

वयाच्या १४ व्या वर्षी, गुजरात टायटन्सविरुद्ध खेळताना त्याने अवघ्या ३८ चेंडूत १०१ धावांची वादळी खेळी केली. यामध्ये त्याने अवघ्या ३५ चेंडूंत शतक पूर्ण करत ख्रिस गेलनंतर आयपीएल इतिहासातील दुसरे सर्वात वेगवान शतक ठोकण्याचा पराक्रम केला.

जून २०२६ मध्ये झालेल्या १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेत वैभव

**श्री. धनंजय शेटये**

सूर्यवंशीने जे काही केले, ते क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णअक्षरांनी लिहिले गेले आहे. भारताला विश्वविजेता (चॅम्पियन) बनवण्यात या १४ वर्षांच्या वादळाने सिंहाचा वाटा उचलला होता.

इंग्लंडविरुद्धच्या अंतिम सामन्यात वैभवने मैदानावर जणू धावांचा पाऊस पाडला. त्याने केवळ ८० चेंडूत १७५ धावांची ऐतिहासिक आणि अवाढव्य खेळी केली, ज्यामध्ये १५ चौकार आणि १५ गगनचुंबी षटकारांचा समावेश होता. या अंतिम सामन्यात त्याने अवघ्या ५५ चेंडूत आपले शतक पूर्ण केले.

वैभवची ही १७५ धावांची खेळी कोणत्याही आयसीसी स्पर्धेच्या अंडर-१९ किंवा वरिष्ठ गटाच्या अंतिम सामन्यातील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या ठरली आहे! १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेत एकूण धावा ७ डावांत ४३९ धावा जमविलेल्या. सरासरी ६२.७२ स्ट्राइक रेट १६९.४९ एकूण षटकार ३० एकाच विश्वचषकात सर्वाधिक षटकार मारण्याचा विश्वविक्रम त्यांच्या नावावर आहे. त्याच्या या अफाट आणि अविश्वसनीय कामगिरीसाठी त्याला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' चा किताब देण्यात आला, तसेच आयसीसीच्या 'टीम ऑफ द टूर्नामेंट'मध्येही त्याला मानाचे स्थान मिळाले.

एका नव्या युगाची सुरुवात वय अवघे १५ वर्षे, पण बॅटमधील धग एखाद्या कसलेल्या योद्ध्यासारखी! वैभव सूर्यवंशीच्या याच सातत्यपूर्ण आणि स्फोटक कामगिरीची दखल घेत निवडकर्त्यांनी त्याला वरिष्ठ भारतीय टी-२० संघात प्रथमच आमंत्रित केले आहे.

हा केवळ एका खेळाडूचा विजय नाही, तर एका बापाच्या संघर्षाचा, बिहारच्या मातीचा आणि गुणवत्तेचा विजय आहे. 'बेबी बॉस' वैभव सूर्यवंशी आता आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची निळी जर्सी घालून जगातील गोलंदाजांचा थरकाप उडवण्यासाठी सज्ज झाला आहे.

क्रिकेट जगतातील या नव्या 'सूर्याचा' उदय झाला असून, त्याचा प्रकाश पुढील अनेक दशके क्रिकेट विश्वावर पडत राहील यात शंका नाही! ***

# अ‍ॅक्शनपटाची बहार!



लवकरच अ‍ॅक्शनचा नवा अध्याय मोठ्या पडद्यावर उलगडत आहे. युवा पिढीच्या धाडसाला, स्टाईलला आणि थराराला साद घालणारा बहुप्रतीक्षित हिंदी स्पाय-अ‍ॅक्शनपट 'अल्फा' देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. दमदार अ‍ॅक्शन, रहस्यमय मिशन, आधुनिक तंत्रज्ञान, वेगवान पाठलाग, जबरदस्त व्हिज्युअल्स आणि भावनिक नात्यांची सांगड घालणारा हा चित्रपट तरुण प्रेक्षकांसाठी वर्षातील सर्वात मोठा सिनेमॅटिक अनुभव ठरणार आहे. आलिया भट्ट आणि शर्वरी वाघ यांच्या प्रभावी भूमिका, भव्य निर्मितीमूल्य, रोमांचक कथानक आणि प्रत्येक फ्रेममध्ये जाणवणारी ऊर्जा प्रेक्षकांना सुरुवातीपासून शेवटपर्यंत खिळवून ठेवेल. शर्वरी वाघ 'अल्फा'मध्ये धाडसी, चपळ आणि अत्यंत कुशल गुप्तहेराच्या भूमिकेत झळकणार आहे. थरारक अ‍ॅक्शन, स्टायलिश व्यक्तिमत्त्व आणि प्रभावी स्क्रीन प्रेझेन्समुळे तिची भूमिका विशेष लक्षवेधी ठरते. उत्साह, वेग, साहस आणि मनोरंजनाचा नवा मापदंड अनुभवण्यासाठी हा चित्रपट बघायला हरकत नाही, चित्रपटामध्ये प्रत्येक मिशनची सुरुवात एका धाडसी पावलाने होते. त्या पावलाचे नाव अल्फा असे आहे.

सध्या बॉलिवूडमध्ये चर्चेत असणाऱ्या 'अल्फा' या स्पाय-अ‍ॅक्शन चित्रपटात शर्वरी एका महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहे. शार्प लूक्स, फिटनेस आणि स्टायलिश व्यक्तिमत्त्व लाभलेल्या शर्वरीकडून या चित्रपटात प्रभावी कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मेहनत आणि सातत्यपूर्ण अभिनयामुळे ती नव्या पिढीतील आश्वासक अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. हिंदी चित्रपटसृष्टीतील उदयोन्मुख अभिनेत्री असलेल्या शर्वरी वाघने अभिनयक्षेत्रात येण्यापूर्वी काही काळ सहाय्यक दिग्दर्शक म्हणूनही काम केले. आत्मविश्वासपूर्ण अभिनय आणि पडद्यावरील प्रभावी उपस्थितीमुळे तिने अल्पावधीतच स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. शर्वरीने २०२० मध्ये अभिनेत्री म्हणून चित्रसृष्टीमध्ये पदार्पण केले.



# ग्लॅमरस आणि प्रतिभावान!

# बालांगण

## एल निनो-ला निनामधला फरक

कल्पना करा की प्रशांत महासागरातील म्हणजेच पॅसिफिक समुद्रातील पाणी अचानक नेहमीपेक्षा जास्त गरम झाले आहे आणि हे गरम पाणी हजारो किलोमीटरच्या मोठ्या भागात पसरले आहे. या नैसर्गिक घटनेला 'एल निनो' असे म्हणतात. सामान्यपणे प्रशांत महासागरातील वाऱ्यांमुळे गरम पाणी पश्चिमेकडे म्हणजे आशियाच्या दिशेने ढकलले जाते. पण कधी कधी हे वारे कम कुवत पडतात. त्यामुळे गरम पाणी मध्य आणि पूर्व प्रशांत महासागरात साचते. यामुळे जगभरातील वारे, ढग आणि पावसाचे स्वरूप बदलू लागते. हाच एल निनोचा परिणाम असतो.

तर कधी उलट परिस्थिती तयार होते. प्रशांत महासागरातील पाणी




नेहमीपेक्षा जास्त थंड होते. त्याला 'ला निना' म्हणतात. ला निनामध्ये हवामानातील बदल एल निनोच्या उलट दिशेने होतात. भारतातील पावसासाठी मॉन्सूनचे वारे अत्यंत महत्त्वाचे असतात. एल निनोच्या काळात हे मॉन्सूनचे चक्र काही प्रमाणात कमकुवत होऊ शकते. त्यामुळे भारतात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता वाढते. काही वर्षांमध्ये दुष्काळसदृश परिस्थितीही निर्माण होऊ शकते. अर्थात, एल निनो आला म्हणजे भारतात दुष्काळ पडतोच असे नाही. ला निना असताना मात्र भारतात सामान्यतः चांगला किंवा सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता वाढते. एल निनो आणि ला निना यांचा परिणाम अनेक देशांवर होतो. षवयांचा अंदाज काही महिने आधी येऊ शकतो. एल निनो आणि ला निना या केवळ समुद्रातील घटना नाहीत, तर त्या जगभरातील हवामानावर प्रभाव टाकणाऱ्या पृथ्वीच्या महत्त्वाच्या नैसर्गिक प्रक्रिया आहेत. महासागराच्या तापमानातील बदल हजारो किलोमीटर दूर असलेल्या देशांनाही प्रभावित करू शकतो, हीच निसर्गाची जादू आहे.

**रंजक विज्ञान**

## यात आहे सर्वांत जास्त व्हिटॅमिन-सी



उत्तम आरोग्यासाठी आवश्यक असणारे व्हिटॅमिन सी मिळवण्यासाठी लिंबू, आवळा किंवा पेरू यांपैकी कोणता पर्याय चांगला याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? अनेकांना लिंबू 'व्हिटॅमिन-सी'चा सर्वोत्तम स्रोत असल्याचे वाटते. परंतु हे पूर्णपणे खरे नाही. तेव्हा याबद्दल पोषणतज्ज्ञ काय म्हणतात हे आज जाणून घेऊ या.

**व्हिटॅमिन-सी का महत्त्वाचे आहे?**

व्हिटॅमिन-सी आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, त्वचा निरोगी ठेवते, जखमा बरे करण्यास मदत करते तसेच अँटीऑक्सिडंट म्हणून देखील कार्य करते. त्यामुळेच ते शरीरासाठी अत्यावश्यक असते. त्याच्या कमतरतेमुळे अनेक प्रकारच्या आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

**हे लक्षात घेता आपण** १०० ग्रॅम या मापामध्ये व्हिटॅमिन सी बद्दल बोलायचे ठरवले तर आकडे खालीलप्रमाणे असतात.


एका लिंबामध्ये ५३ मिलीग्राम व्हिटॅमिन सी असते. पेरूमध्ये हेच प्रमाण २२८.३ मिलीग्राम इतके असते तर आवळ्यामध्ये हे प्रमाण तब्बल ३०० मिलीग्राम इतके असते.

तेव्हा या आकड्यांवरूनच स्पष्ट होते की आवळा व्हिटॅमिन सी चे सर्वात मोठा भांडार आहे. त्यानंतर पेरू आणि नंतर लिंबाचा नंबर लागतो. अर्थात आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी चे प्रमाण सर्वाधिक असले तरी एका वेळी १०० ग्रॅम आवळा खाणे प्रत्येकासाठी सोपे नाही. आवळ्याला तुरट चव असते. तसेच कच्चे आवळे खाणारे लोक खूप कमी असतात. बरेचदा रस किंवा लोणच्याच्या स्वरूपातच आवळ्याचा वापर केला जातो. पेरू मात्र आपण सहज खाऊ शकतो. त्याची चव गोड आणि किंचित आंबट असल्यामुळे तुमच्यासारख्या लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत पेरू सर्वांनाच आवडतो. तुम्ही एका वेळी १०० ग्रॅम किंवा त्याहून अधिक वजनाचा पेरू सहजपणे खाऊ शकता. अशा प्रकारे आपल्याला कोणत्याही समस्येशिवाय भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी

**फिटनेस फंडा**

## आयपी अ‍ॅड्रेसची गंमत

तुम्ही आयपी अ‍ॅड्रेस हा शब्द ऐकला असेल. आयपी अ‍ॅड्रेस म्हणजे इंटरनेट प्रोटोकॉल अ‍ॅड्रेस. कॉम्प्युटर नेटवर्कशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक उपकरणाला काही आकडे दिले जातात. हे आकडे म्हणजे त्या उपकरणाचा आयपी अ‍ॅड्रेस. प्रत्येक उपकरणाचा आयपी अ‍ॅड्रेस वेगळा असतो. त्यामुळे इंटरनेटशी जोडल्या गेलेल्या प्रत्येक उपकरणाची ओळख पटवणं सोपं जातं. तुमच्या घरच्या वायफायशी कॉम्प्युटर, मोबाईल फोन, लॅपटॉप जोडलेला असतो. या प्रत्येक उपकरणाचा आयपी अ‍ॅड्रेस वेगळा असतो.





**टेक्नो टिप्स**

आयपी अ‍ॅड्रेस दोन प्रकारचे असतात. आयपीव्ही ४ आणि आयपीव्ही ६. समजा तुम्ही फिरायला जाणार आहात. सोबत तुम्ही लॅपटॉप घेतला आहे. अशा वेळी तुमच्या घरचा आयपी अ‍ॅड्रेस लॅपटॉपमध्ये दिसणार नाही. कारण बाहेर गेल्यावर तुम्ही दुसरं इंटरनेट किंवा वायफाय कनेक्शन वापरणार आहात. त्यामुळे तुम्हाला तात्पुरता आयपी अ‍ॅड्रेस मिळेल. ते ठिकाण सोडून दुसऱ्या ठिकाणी गेल्यावर पुन्हा नवा आयपी अ‍ॅड्रेस दिला जाईल... मंडळी, आयपी

## भूगोलात घडवू शकता कारकीर्द

तुम्ही भूगोल शिकता. हा विषय आवडत असेल तर त्यात उच्च शिक्षणही घेता येईल. भूगोलाशी संबंधित विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. बऱ्याच गोष्टींसाठी भूगोलाची मदत घ्यावी लागते. बारावीनंतर या क्षेत्रात विविध अभ्यासक्रम करता येतील. जियोइन्फॉरमेटिक्स मध्ये बीई, रिमोट सेन्सिगमध्ये बीई किंवा बीटेक, जीआयएस अँड रिमोट सेन्सिंगमध्ये बीटेक करून पुढे जाता येईल. नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर, इंडियन रिमोट सेंसिंग एजन्सी, प्लॅनिंग कमिशन, जियोलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया, युनिक आयडेंटिफिकेशन अ‍ॅथोरिटी ऑफ इंडिया आदी संस्थांमध्ये तुम्ही काम करू शकता.




जिओग्राफी, हायड्रोग्राफी तसंच आयटीमधली पदवी मिळवून तुम्ही या क्षेत्रात करीअर करू शकता. आता जिओग्राफिक इन्फॉर्मेशन सिस्टिमचा आवाका खूपच वाढला आहे. स्मार्ट गाइडन्स सिस्टिम तयार करण्यापासून नैसर्गिक स्रोतांचा शोध घेण्यासाठी उपग्रहांची मदत घेईपर्यंत

**कोण होणार?**

## क्यूआर कोडमध्ये दडलंय काय?

सध्या विविध ठिकाणी क्यूआर कोडचा वापर होतो. आर्थिक व्यवहारांसाठी, अ‍ॅप डाऊनलोड करण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करावा लागतो. या छोट्याशा कोडमध्ये बरीच माहिती दिलेली असते. बऱ्याच लोकांची माहिती व्ही कार्डमध्ये सेव्ह झालेली असते. यात फोन नंबर, नाव, टोपण नाव, कंपनीचं नाव अशी बरीच माहिती असते. त्याला 'बिझनेस कार्ड' किंवा 'व्ही कार्ड' असं म्हणतात. हे व्ही कार्ड म्हणजे एकप्रकारचा क्यूआर कोडच आहे. असा कोड तयार करण्याची प्रक्रिया अगदी सोपी आहे.

विविध पेमेंट अ‍ॅप्समध्ये एक चौकोन असतो. या चौकोनात काळ्या रंगाचं नक्षीकाम पहायला मिळतं. हा क्यूआर कोड असतो. तो स्कॅन केल्यावर आपल्याला सगळी माहिती मिळते. क्यूआर कोड उपलब्ध करून देणाऱ्या वेबसाईट्स आहेत. युजर्सना गूगलमध्ये जाऊन क्यूआर कोड जनरेट टाईप करावं लागेल. यानंतर तुमच्यासमोर बऱ्याच वेबसाईट्स ओपन होतील.



**तंत्रज्ञान**

या वेबसाईटमध्ये गेल्यावर व्ही कार्डचा पर्याय दिसतो. यात तुमची सगळी माहिती भरावी लागेल. यानंतर क्यूआर कोड जनरेट या पर्यायावर क्लिक करा. आता तुमची सगळी माहिती क्यूआर कोडच्या रूपात सेव्ह होईल. हा कोड स्कॅन केल्याशिवाय कोणालाही ही माहिती बघता येणार नाही. फोनमधल्या कॅमेऱ्यात क्यूआर कोड स्कॅनरचा पर्याय असतो.

## ऑस्ट्रेलियाची ग्रेट डिव्हायडिंग रेंज

'ग्रेट डिव्हायडिंग रेंज' ही ऑस्ट्रेलिया खंडातील सर्वांत मोठी, सर्वात लांब आणि सर्वात महत्त्वाची पर्वतरांग मानली जाते. ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनाऱ्यालगत पसरलेल्या या पर्वतरांगेची लांबी सुमारे ३,५०० किलोमीटर आहे. ती उत्तरेकडील क्वीन्सलँड राज्यापासून सुरू होऊन न्यू साउथ वेल्समार्गे दक्षिणेकडील व्हिक्टोरिया राज्यापर्यंत पसरलेली आहे. त्यामुळे ही जगातील सर्वांत लांब सलग पर्वतरांगांपैकी एक मानली जाते. या पर्वतरांगेला ग्रेट डिव्हायडिंग म्हणतात, कारण ती ऑस्ट्रेलियातील नद्यांच्या प्रवाहाचे विभाजन करते. पर्वतरांगेच्या पूर्वेकडे उगम पावणाऱ्या नद्या थेट प्रशांत महासागराकडे वाहतात, तर पश्चिमेकडील नद्या देशाच्या अंतर्गत भागाकडे वळतात. त्यामुळे ऑस्ट्रेलियाच्या जलव्यवस्थेत या पर्वतरांगेचे अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

ऑस्ट्रेलियातील आदिवासी लोक हजारो वर्षांपासून 'ड्रीमटाइम' या संकल्पनेवर विश्वास ठेवतात. त्यांच्या मते सृष्टीच्या सुरुवातीला काही दिव्य पूर्वज, प्राणी आणि आत्म्यांनी पृथ्वीवर भ्रमण करून पर्वत, नद्या, जंगले आणि इतर भूभाग निर्माण केले. ग्रेट डिव्हायडिंग रेंजमधील अनेक टेकड्या, खडक आणि दऱ्या यांना अशाच ड्रीमटाइम कथा जोडलेल्या आहेत. त्यामुळे हा पर्वत त्यांच्या श्रद्धांशीही जोडला गेला आहे. या पर्वतरांगेतील सर्वात उंच शिखर म्हणजे माउंट कोसियुस्को. त्याची उंची सुमारे २,२२८ मीटर आहे. ते ऑस्ट्रेलियाच्या मुख्य भूभागावरील सर्वोच्च शिखर मानले जाते. पर्वतरांगेच्या दक्षिण भागात असलेल्या ऑस्ट्रेलियन आल्प्समध्ये हिवाळ्यात बर्फवृष्टीही होते. ग्रेट डिव्हायडिंग रेंज म्हणजे केवळ पर्वतांचा समूह नाही, तर त्यात पठारे, टेकड्या, दऱ्या, जंगले आणि गवताळ प्रदेश यांचाही समावेश होतो. या प्रदेशात दाट निलगिरीची जंगले, सुंदर धबधबे आणि खोल दऱ्या आढळतात. 'ब्लू माउंटन्स' हा या पर्वतरांगेतील सर्वात प्रसिद्ध भाग आहे. निलगिरीच्या जंगलांमधून हवेत पसरणाऱ्या सूक्ष्म तेलकणांमुळे दूरून पाहताना पर्वतांवर निळसर छटा दिसते, म्हणून त्यांना ब्लू माउंटन्स असे म्हटले जाऊ लागले. या पर्वतरांगेत अनेक वैशिष्ट्यपूर्ण ऑस्ट्रेलियन प्राणी आढळतात. कांगारू, कोआला, वॉम्बॅट, प्लॅटिपस आणि विविध प्रकारचे पक्षी येथे राहतात. जैवविविधतेच्या दृष्टीने हा प्रदेश अत्यंत समृद्ध मानला जातो. ग्रेट डिव्हायडिंग रेंजमधून उगम पावणाऱ्या अनेक नद्या ऑस्ट्रेलियातील शेती, उद्योग आणि शहरांना पाणी पुरवतात. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेतही या पर्वतरांगेचा मोठा वाटा आहे. हा प्रदेश गिर्यारोहण, ट्रेकिंग, कॅम्पिंग, स्कीइंग आणि निसर्ग पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे.



**माहिती पर्वतरांगांची**

## अंडी खाताना...

मांसाहारी लोकांच्या आहारातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे अंडी. त्यापासून अनेक पदार्थ बनवले जातात आणि ते अनेक प्रकारे बनवले जातात. अंडी आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असतात. पण कधीकधी अंडी खराब होतात आणि आपल्याला कळतही नाही. असे एकही खराब अंडे डिशमध्ये गेले तर मात्र संपूर्ण अन्न खराब होते. खराब अंडी खाल्ल्याने विषबाधादेखील होऊ शकते. म्हणूनच अंडी न फोडता खराब झाली आहे की ताजी आहेत हे समजण्याच्या काही टिप्स आज पाहू या.



**करून पाहा**

यामुळे आई घरात नसतानाही तुम्ही योग्य अंडे निवडून एखादा झटपट पदार्थ करु शकता.

अंडी ताजी आहेत की नाही हे जाणून घेण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे आधी एक ग्लास थंड पाणी घ्या आणि त्यात हलक्या हाताने अंडी घाला. अंडी ताजी असतील तर पाण्याच्या तळाशी बसतील आणि जुनी असतील तर वर येतील. म्हणूनच अंडी पाण्याच्या पृष्ठभागावर पूर्णपणे तरंगू लागली तर ती खराब असल्याचे समजून घ्या.

यासाठी तुम्ही मेणबत्ती पद्धतही वापरु शकता. यासाठी मोबाईलची किंवा साधी टॉर्च वापरू शकता. आधी खोलीत अंधार करा आणि टॉर्च लावून त्या प्रकाशात अंडी फिरवा. अंडी पूर्णपणे स्वच्छ आणि कवचापासून पिवळी दिसत असतील तर ती ताजी असल्याचे समजून घ्या. परंतु अंडी खराब दिसत असेल तर चांगली नसल्याचे समजून घ्या.

अंड्याचा बाहेरील भाग पाहूनही तुम्ही त्याच्या गुणवत्तेचा अंदाज लावू शकता. जसे की, अंड्याचे कवच पूर्णपणे स्वच्छ, चमकदार आणि कोणतेही डाग नसलेले असेल तर ते ताजे असते. परंतु कवचावर भेगा, चिकटपणा आणि त्यावर काळे किंवा हिरवे डाग असतील तर अंडे खराब असू शकते.

मुलांनो, या सोप्या पद्धती वापरून तुम्ही घरी अंड्याची गुणवत्ता तपासू शकता. अंड्याबद्दल काही शंका असेल तर ते फेकून देणे चांगले.

## मॅगलेव्ह ट्रेन... बुलेटपेक्षाही सुसाट




तुम्ही कधी अशी रेल्वे पाहिली आहे का जी रुळांवर धावतच नाही? उलट ती रुळांच्या थोडीशी वर हवेत तरंगत पुढे जाते. ऐकायला जादूसारखे वाटते ना? पण ही जादू नसून विज्ञानाची कमाल आहे. या अद्भुत रेल्वेला मॅगलेव्ह ट्रेन म्हणतात. मॅगलेव्ह हा शब्द मॅग्नेटिक लेव्हिटेशन म्हणजेच चुंबकीय शक्तीने हवेत तरंगणे या शब्दांपासून तयार झाला आहे. साधारण रेल्वेची चाके रुळांवर फिरतात. त्यामुळे घर्षण निर्माण होते आणि वेगाला मर्यादा येते. पण मॅगलेव्ह ट्रेनला चाकेच नसतात. शक्तिशाली चुंबकांच्या मदतीने ती रुळांपासून काही सेंटीमीटर वर उचलली जाते. त्यामुळे रुळ आणि ट्रेन यांच्यात घर्षण जवळजवळ नसते. त्यामुळेच ही ट्रेन अतिशय वेगाने धावू शकते. साधारण बुलेट ट्रेनचा वेग ताशी ३०० ते ३५० किलोमीटर असतो. पण काही मॅगलेव्ह ट्रेन्स ताशी ६०० किलोमीटरपेक्षाही जास्त वेगाने धावू शकतात. म्हणजेच डोळ्याची पापणी लवते न लवते तोच ती खूप पुढे गेलेली असते! मॅगलेव्ह ट्रेनची सुरुवात करण्यासाठी अनेक देशांनी संशोधन केले. आज जपान आणि चीन हे देश या तंत्रज्ञानात आघाडीवर आहेत. चीनमध्ये चालणारी मॅगलेव्ह ट्रेन जगातील सर्वात वेगवान व्यावसायिक रेल्वे सेवांपैकी एक मानली जाते. तर जपानने या मॅगलेव्ह ट्रेनच्या चाचण्यांमध्ये ६०० किलोमीटरपेक्षाही जास्त वेग गाठला आहे. मॅगलेव्ह ट्रेनमध्ये प्रवास करणे हा एक वेगळाच अनुभव असतो. चाकांचा आवाज नसल्यामुळे प्रवास खूप शांत वाटतो. धक्केही कमी बसतात. त्यामुळे प्रवासी आरामात प्रवास करू शकतात. मात्र या ट्रेनचे एक आव्हानही आहे. मॅगलेव्हसाठी विशेष रुळ आणि प्रगत तंत्रज्ञान लागते. त्यामुळे अशा रेल्वेमार्गांच्या उभारणीचा खर्च खूप मोठा असतो. म्हणूनच सध्या जगात फार कमी ठिकाणी मॅगलेव्ह ट्रेन धावताना दिसते. पण जग जवळ येते आहे तशी या वेगवान रेल्वेजची गरज वाढणार आहे. त्यामुळे काही वर्षांनंतर कदाचित आपण अशा रेल्वेत बसून काही तासांचा प्रवास अवघ्या काही मिनिटांमध्ये पूर्ण करू. विज्ञानाच्या जगातील हे खरोखरच एक अद्भुत आश्चर्याचा अगदी सहजपणे अनुभव घेत असू.

**अद्भुताचे अंतरंग**

### स्टडी टिप्स

#### लागा तयारीला



तुम्ही सुट्टीत खूप धमाल केली असेल. पण आता अभ्यासाला लागायला हवं. दहावी-बारावीची मुलं तर आता बराच जोर लावतील. या मुलांनी आता अभ्यासावर, उजळणीवर भरपूर भर द्यायला हवा. अर्थात महत्त्वाची वर्षे असली तरी अजिबात घाबरू नका. शांतपणे अभ्यास करा. विषय समजून घ्या. आकलन उत्तम ठेवा. सराव करा. तुम्हाला चांगलं यश मिळेल.

### खवय्येगिरी

#### मस्त टोमॅटो ऑमलेट



वेगळं काही खायचं असेल तर तुम्ही टोमॅटो ऑम्लेट बनवू शकता. यासाठी वाटीभर बेसन, कांदा, टोमॅटो, लाल तिखट, मीठ असं साहित्य घ्या. कांदा आणि टोमॅटो बारीक चिरून घ्या. डाळीच्या पिठामध्ये थोडं पाणी घाला. पीठ फार पातळ करायचं नाही हे लक्षात ठेवा. आता त्यात कांदा, टोमॅटो, तिखट, मीठ घाला. सगळे घटक नीट मिक्स करा. तवा घ्या. त्यावर थोडं तेल घाला. आता डाळीचं पीठ तव्यावर पसरवा. छोटी धिरडी घाला. दोन्ही बाजूंनी खरपूस भाजून घ्या. सॉससोबत खा.

### दोस्त हे मस्त

#### असे हे कुत्रे



कुत्रा हा इमानी प्राणी. हा प्राणी आसपास सहज आढळतो. त्यामुळे त्याच्याविषयी फारशी माहिती घ्यावीशी वाटत नाही. पण कुत्र्याबद्दलच्या बऱ्याच गोष्टी आपल्याला माहीत नसतात. मुलांनो, 'मॅक्स' हे कुत्र्याचं नाव खूप प्रसिद्ध आहे. मॅक्स नावाच्या कुत्र्यांची संख्या बरीच जास्त आहे. कुत्र्यांची वास घेण्याची क्षमता खूप चांगली असते. यामुळे गुन्हेगारांचा शोध घेण्यात कुत्रे महत्त्वाची भूमिका बजावतात. कुत्र्याला वेगवेगळ्या चवी फारशा कळत नसल्या तरी तो विविध प्रकारचे वास ओळखू शकतो.

### 'योगा'योग

#### सूर्यभेदी प्राणायाम



सध्या प्रदूषण बरंच वाढत आहे. प्रदूषणापासून बचाव करण्यासाठी तुम्ही काही आसनं करू शकता. त्यापैकी एक आसन म्हणजे सूर्यभेदी प्राणायाम. प्राणायामाबद्दल तुम्ही ऐकलं असेल. सूर्यभेदी प्राणायामामुळे श्वसनसंस्थेचे विकार दूर होतात. या आसनामुळे शरीर आणि मनाला शांती मिळते. हे आसन करण्यासाठी तुम्ही सुखासनात किंवा पद्मासनात बसू शकता.

## निवडक

### मुंबईच्या सुवर्णकन्येचा सत्कार

**मुंबई :** जागतिक स्तरावर भारतीय बॅडमिंटनचा झेंडा अभिमानाने फडकावणारी आणि मुंबईची 'गोल्डन गर्ल' म्हणून ओळख निर्माण करणारी तारिणी सुरी हिचा ग्रेटर मुंबई बॅडमिंटन असोसिएशनतर्फे भव्य सत्कार करण्यात आला. तिच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करत असोसिएशनतर्फे तिला सन्मानचिन्ह आणि २५ हजारांचे रोख पारितोषिक प्रदान करून गौरविण्यात आले. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात गुवाहाटी येथे झालेल्या बीडब्ल्यूएफ जागतिक कनिष्ठ मिश्र सांघिक स्पर्धेत भारतीय संघाने उपांत्यपूर्व फेरीत दक्षिण कोरियावर मात करत ऐतिहासिक कांस्यपदकाची कमाई केली. विशेष म्हणजे, २५ वर्षांनंतर भारताला या स्पर्धेत पदक जिंकण्याचा मान मिळाला आणि त्या ऐतिहासिक भारतीय संघात तारिणी सुरी हिचा महत्त्वपूर्ण समावेश होता. तारिणी सुरी हिने देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध बॅडमिंटन स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण आणि उत्कृष्ट कामगिरी करत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. कठोर परिश्रम, शिस्तबद्ध सराव आणि स्पर्धात्मक वृत्तीच्या जोरावर तिने यशाची अनेक शिखरे गाठली आहेत. प्रख्यात प्रशिक्षक आणि माजी भारतीय खेळाडूंच्या मार्गदर्शनाखाली तारिणी सुरी हिने आपल्या खेळामध्ये सातत्याने प्रगती करत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावी छाप पाडली आहे. तिची जिद्द, मेहनत आणि समर्पण यामुळे ती भारतीय बॅडमिंटनमधील भविष्यातील आशादायी खेळाडू म्हणून उदयास आली आहे.



### इशान किशन अव्वल स्थानी विराजमान

**दुबई :** भारतीय यष्टीरक्षक-फलंदाज इशान किशन आता टी-२० क्रिकेटमधील जगातील नंबर-१ फलंदाज बनला आहे. ताज्या क्रमवारीनुसार, त्याने आपल्या कारकिर्दीत पहिल्यांदाच अव्वल स्थान पटकावले आहे. गेल्या वर्षभरापासून अव्वल स्थानी असलेल्या अभिषेक शर्माचे वर्चस्व संपुष्टात आले आहे. टी-२० फलंदाजी क्रमवारीत अव्वल स्थानी पोहोचणारा इशान हा चौथा भारतीय क्रिकेटपटू आहे. आयर्लंडविरुद्ध भारताची नुकतीच झालेली दोन सामन्यांची टी-२० मालिका संपल्यानंतर इशानने आपल्या कारकिर्दीतील सर्वोच्च क्रमवारी गाठली. आयर्लंडविरुद्धच्या मालिकेत इशान किशनची कामगिरी निराशाजनक होती, त्याने पहिल्या सामन्यात १ धाव आणि दुसऱ्या सामन्यात केवळ १२ धावा केल्या होत्या. मात्र, पुरुष टी-२० विश्वचषकापासून हा फलंदाज चांगल्या लयीत आहे. या डावखुऱ्या फलंदाजाने विश्वचषकात २०० हून अधिक स्ट्राइक रेटने ३१७ धावा केल्या होत्या. अभिषेकने जवळपास १२ महिने अव्वल स्थान कायम राखले होते. विराट कोहली, सूर्यकुमार आणि अभिषेक यांच्यानंतर इशान आता टी-२० आंतरराष्ट्रीय क्रमवारीत अव्वल स्थानी पोहोचणारा चौथा भारतीय क्रिकेटपटू ठरला आहे. इशानचे ८७६ गुण आहेत, तर अभिषेकचे ८६९ गुण आहेत. आयर्लंडचे क्रिकेटपटू लॉर्कन टकर आणि रॉस अडायर यांनी भारताविरुद्धच्या प्रभावी कामगिरीनंतर क्रमवारीत मोठी झेप घेतली आहे. तिलक आणि सूर्यकुमार हे देखील आयसीसी फलंदाजी क्रमवारीत अव्वल १० मध्ये आहेत. तिलकचे स्थान कायम आहे, तर सूर्याची क्रमवारीत एका स्थानाने खाली घसरण झाली आहे.



### विशालची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**ठाणे :** मीरा-भाईंदरच्या श्री गणेश आखाड्यातून आणखी एका दमदार मल्लाने राष्ट्रीय पातळीवर झेप घेतली आहे. युवा पैलवान विशाल जाधव याने पुण्यातील वारजे येथे झालेल्या २३ वर्षांखालील वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेच्या महाराष्ट्र संघ निवड चाचणीत ९२ किलो वजनी गटात सर्व प्रतिस्पर्ध्यांवर निर्विवाद वर्चस्व गाजवत प्रथम क्रमांक पटकावला आणि महाराष्ट्र संघात मानाचे स्थान मिळवले. आता १० ते १२ जुलै २०२६ दरम्यान रोहतक (हरियाणा) येथे होणाऱ्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत तो महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे. गणेश आखाड्यासाठी आणि ठाणे जिल्ह्यासाठी ही अभिमानाची कामगिरी ठरली आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या वतीने आयोजित या निवड चाचणीत विशाल जाधवने सुरुवातीपासूनच आपली ताकद दाखवून दिली. पहिल्या फेरीत त्याने कोल्हापूरच्या अवधूत अवघडे याचा १०-० एकतर्फी गुणफरकाने पराभव केला. दुसऱ्या फेरीत सोलापूरच्या उदयसिंग सोडकर याला सहज नमवत उपांत्य फेरी गाठली. उपांत्य सामन्यात पुणे जिल्ह्याच्या निरंजन माझिरे याच्यावर अत्यंत चुरशीच्या लढतीत मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात सांगलीच्या प्रतीक गौंड समोर सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत त्याला कोणतीही संधी न देता १०-० अशा दणदणीत विजयासह महाराष्ट्र संघातील स्थान पक्के केले आहे.



### सर्बियाच्या जोकोविचची आगेकूच

**लंडन :** सात वेळा चॅम्पियन ठरलेल्या नोव्हाक जोकोविचने विम्बल्डन २०२६ मध्ये आपली प्रभावी कामगिरी सुरू ठेवली आहे. त्याने दुसऱ्या फेरीत ग्रीसच्या स्टेफानोस त्सित्सिपासला ६-३, ६-४, ६-२ असे पराभूत करत तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. सेंटर कोर्टवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात, ३९ वर्षीय सर्बियन दिग्गजाने सुरुवातीपासून शेवटपर्यंत सामन्यावर वर्चस्व गाजवले. जवळपास दोन तास चाललेल्या या सामन्यात जोकोविचने अनुभव आणि अचूकतेचे उल्लेखनीय प्रदर्शन केले. दुसऱ्या सेटच्या आठव्या गेममध्ये, त्सित्सिपासला ब्रेक पॉइंट वाचवण्याची एक उत्तम संधी मिळाली होती, पण त्याने दोन सोपे स्मॅश वाया घालवले. जोकोविचने चुकीचा फायदा उचलत सर्व्हिस ब्रेक केली आणि त्सित्सिपासच्या पुनरागमनाच्या आशा संपुष्टात आणल्या. या विजयासह, जोकोविचने त्सित्सिपासविरुद्ध आपला सलग १२वा विजय नोंदवला. आता तिसऱ्या फेरीत त्याचा सामना फ्रान्सच्या २५ व्या मानांकित आर्थर रिंडरनेकशी होईल. जोकोविच आपल्या आठव्या विम्बल्डन विजेतेपदासाठी आणि विक्रमी २५ व्या ग्रँडस्लॅम एकेरी विजेतेपदासाठीच्या शर्यतीत कायम आहे.



## महिला टी २० विश्वचषकात

# इंग्लंड अंतिम फेरीत




**| ओव्हल | वृत्तसंस्था |**

इंग्लंडने महिला टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. गुरुवारी रात्री झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात संघाने दक्षिण आफ्रिकेचा ४० धावांनी पराभव केला. आता रविवारी लॉर्ड्सच्या मैदानावर विजेतेपदासाठी इंग्लंडचा सामना ऑस्ट्रेलियाशी होईल.

ओव्हल मैदानावर इंग्लंडने २३ धावांत ३ विकेट गमावल्या होत्या आणि संघ खूप अडचणीत होता. येथून नेट सायव्हर-ब्रंट आणि हेदर नाईटच्या जोडीने चौथ्या विकेटसाठी केवळ ९० चेंडूंमध्ये १३३ धावांची विक्रमी भागीदारी केली. या भागीदारीच्या जोरावर इंग्लिश संघाने ५ विकेट गमावून १६९ धावा केल्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेचा संघ २० षटकांत ८ विकेट गमावून केवळ १२९ धावाच करू शकला.

नाणेफेक गमावून फलंदाजी करणाऱ्या इंग्लंडची सुरुवात खराब झाली. संघाला पॉवरप्लेमध्ये केवळ १६ धावाच करता आल्या. आफ्रिकेच्या वेगवान गोलंदाज शबनीम इस्माईल आणि मारिझान कॅपने अचूक गोलंदाजी केली.

कॅपने तिच्या भेदक गोलंदाजीने ४ षटकांत केवळ १६ धावा देऊन १ बळी घेतला. इस्माईलने ३१ धावांत २ बळी घेतले.

काफच्या दुखापतीमुळे मागील तीन सामने खेळू न शकलेल्या नॅट सायव्हर-ब्रंटने या सामन्यात सोफिया डंकलीची जागा घेतली. तिने येताच दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांवर प्रतिहल्ला सुरू केला. तिने मैदानाभोवती चौफेर फटके मारले.

सायव्हर-ब्रंटने तिच्या ४७ चेंडूंतील खेळीत ११ चौकार आणि १ षटकार मारत ७५ धावा केल्या. धावताना तिच्या दुखापतीचा कोणताही परिणाम दिसला नाही.

दुसऱ्या टोकाकडून हीथर नाईटने तिला पूर्ण साथ दिली. नाईटने अयाबोंगा खाकाच्या चेंडूवर षटकार मारून तिचे अर्धशतक पूर्ण केले. नाईटने ४७ चेंडूंमध्ये ५८ धावांची खेळी केली. म्लाबाने दोघांना तीन चेंडूंच्या आत बाद केले असले तरी, तोपर्यंत इंग्लंडने एक मजबूत धावसंख्या उभारली होती.

दक्षिण आफ्रिकेला विजयासाठी टी-२० विश्वचषक इतिहासातील दुसरी सर्वात मोठी धावसंख्या (१७० धावा) गाठायची होती.

दक्षिण आफ्रिकेच्या इस्माईलने सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर इंग्लंडची सलामीवीर एमी जोन्सला बाद करून इतिहास रचला. ती महिला टी-२० विश्वचषकात ५० बळी घेणारी जगातील पहिली महिला खेळाडू ठरली आहे.

ब्रिट्स आणि मारिजाने काप, दोघीही एक्स्ट्रा कव्हरवर नॅट सायव्हर-ब्रंटला झेल देऊन बसल्या. यानंतर दक्षिण आफ्रिकेचा संघ पुनरागमन करू शकला नाही आणि २० षटकांत ८ गडी गमावून केवळ १२९ धावाच करू शकला.

### रोनाल्डोचा पोर्तुगाल अंतिम सोळात

**टोरंटो :** क्रिस्टियानो रोनाल्डोच्या पोर्तुगाल संघाने फुटबॉल विश्वचषकाच्या प्री-क्वार्टर फायनलमध्ये प्रवेश केला आहे. पहिल्या सामन्यात क्रोएशियाचा २-१ ने पराभव केला. प्री-क्वार्टर फायनलमध्ये पोर्तुगालचा सामना स्पेनशी ७ जुलै रोजी होईल. टोरंटो स्टेडियममध्ये इव्हान पेरिसिचने हाफ टाइमनंतर गोल करून क्रोएशियाला १-० ने आघाडी मिळवून दिली. ६८व्या मिनिटाला रोनाल्डोने पेनल्टीवर बरोबरीचा गोल केला. पूर्ण वेळेपर्यंत १-१ अशी स्कोअरलाइन राहिली. या परिस्थितीत इंजरी टाइममध्ये गोंसालो रामोसने हेडरद्वारे गोल करून आपल्या संघाचा विजय निश्चित केला.

## वेंगसरकर क्रिकेट अकॅडमीचे मैदान पुन्हा विकसित

■ **१४ कोटींच्या प्रकल्पातील हिरवळ व रेती बदलण्याचे काम सुरू; गुणवत्ता व नियोजनावर पुन्हा चर्चा**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवीन पनवेल येथील दिलीप वेंगसरकर आंतरराष्ट्रीय क्रिकेट अकॅडमीच्या मैदानावरील गवत व रेतीच्या गुणवत्तेबाबत दैनिक कृषीवलने एप्रिल २०२६ मध्ये उपस्थित केलेले मुद्दे आता प्रत्यक्षात अधोरेखित होताना दिसत आहेत. अकॅडमीच्या मैदानावरील संपूर्ण हिरवळ आणि रेती बदलण्याचे काम सुरू करण्यात आले असून, मैदान नव्याने विकसित केले जात आहे.

दैनिक कृषीवलने १६ एप्रिल २०२६ रोजी ''वेंगसरकर क्रिकेट अकॅडमी की धुळीचे मैदान?'' या मथळ्याखाली प्रसिद्ध केलेल्या वृत्तात मैदानावरील गवताचा दर्जा, चेंडूची अनियमित उसळी, क्षेत्ररक्षणा दरम्यान होणाऱ्या अडचणी आणि खेळाडूंच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर आता मैदानाच्या पुनर्विकासाचा निर्णय झाल्याने त्या मुद्द्यांची दखल घेतली.

१४ कोटी रुपये खर्चून नवीन पनवेलच्या सेक्टर-११ येथील राजीव गांधी मैदानावर आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रिकेट अकॅडमी उभारण्यात आली. स्थानिक आणि होतकरू क्रिकेटपटूंना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प साकारण्यात आला. मात्र प्रशिक्षण सुरू झाल्यानंतर काही खेळाडू आणि प्रशिक्षकांनी मैदानाच्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त केली होती.

मैदानासाठी गुजरातमधून विशेष प्रकारची रेती आणि गवत आणण्यात आले होते. मात्र, पनवेलच्या स्थानिक हवामान, दमट वातावरण आणि मातीच्या गुणधर्मांशी ते अपेक्षितरीत्या जुळवून घेऊ शकले नाही. त्यामुळे हिरवळ टिकून राहिली नाही आणि मैदानाचा दर्जा प्रभावित झाला. आता पश्चिम बंगालमधून नवीन रेती आणि गवत मागवून संपूर्ण मैदान नव्याने विकसित करण्याचे काम सुरू आहे.

या घडामोडींमुळे प्रकल्पाच्या नियोजन, तांत्रिक सल्ला, गुणवत्ता तपासणी आणि अंमलबजावणी प्रक्रियेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. एवढ्या मोठ्या खर्चाच्या प्रकल्पात स्थानिक परिस्थितीचा पुरेसा अभ्यास झाला होता का, गुणवत्ता नियंत्रणाची प्रक्रिया प्रभावी होती का आणि कामाची अंतिम तपासणी कोणत्या निकषांवर करण्यात आली.

सार्वजनिक निधीतून उभारण्यात येणाऱ्या क्रीडा प्रकल्पांमध्ये दर्जा आणि दीर्घकालीन टिकाऊपणाला प्राधान्य मिळणे आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत. मैदानाच्या पुनर्विकासानंतर खेळाडूंना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा असून, या संपूर्ण प्रकरणाची तांत्रिक पडताळणी करून आवश्यक त्या सुधारणा करण्याची मागणीही पुढे येत आहे.

**'कृषीवल'ने आधीच वेधले होते लक्ष**

१६ एप्रिल २०२६ रोजी दैनिक कृषीवलने ''वेंगसरकर क्रिकेट अकॅडमी की धुळीचे मैदान?'' या वृत्तातून मैदानाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित केले होते. गवताचा दर्जा, चेंडूची अनियमित उसळी, क्षेत्ररक्षणातील अडचणी आणि खेळाडूंच्या सुरक्षिततेसंदर्भातील निरीक्षणांकडे लक्ष वेधण्यात आले होते. आता मैदानावरील संपूर्ण हिरवळ आणि रेती बदलण्याचे काम सुरू झाल्याने त्या वेळी मांडलेल्या मुद्द्यांची दखल घेतल्याचे स्पष्ट होत आहे.

### भारतीय महिला संघात बदलाचे वारे

**| मुंबई | प्रतिनिधी |**

भारतीय महिला क्रिकेट संघावर टी-२० विश्वकरंडकात साखळीतच गारद होण्याची नामुष्की ओढवली. यामुळे मागील वर्षी एकदिवसीय विश्वकरंडक पटकावणाऱ्या भारतीय महिला संघाला मोठा धक्का बसला. भारतीय महिला संघाच्या कामगिरीवर टीकाही होऊ लागली. याच पार्श्वभूमीवर भारतीय महिला क्रिकेट संघाच्या माजी खेळाडू डायना एडलजी यांनी परखड मत व्यक्त करताना म्हटले की, भारतीय महिला क्रिकेटच्या हितासाठी आता कठोर निर्णय घेण्याची वेळ आहे. मुख्य प्रशिक्षक अमोल मुजुमदार व कर्णधार हरमनप्रीत यांच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची गरज आहे. डायना यांनी भारतीय महिला संघाबाबत मत व्यक्त करताना म्हटले की, हरमनप्रीत माझी आवडती खेळाडू. मी तिला नेहमीच पाठिंबा दिला, पण आता भारतीय महिला संघाला पुढचा विचार करण्याची गरज आहे. हरमनप्रीतला खेळाडू म्हणून संघात ठेवायला हवे, पण कर्णधार म्हणून नव्या खेळाडूच्या नावावर शिक्कामोर्तब करण्याची आवश्यकता आहे. नवनवीन योजना राबवणारा कर्णधार असायला हवा. गोलंदाजीत कशा प्रकारे बदल करता येतील याकडे विशेष लक्ष देणारा कर्णधार हवा. हरमनप्रीत कर्णधार म्हणून स्थिरावली आहे. यामध्ये बदल आवश्यक आहे. दोन वेगळे संघ हवेत डायना यांनी एकदिवसीय व टी-२० अशा दोन प्रकारांत दोन वेगळे संघ पाहिजेत असे त्यांनी सांगितले.

### भारतीय बॅडमिंटनमध्ये नवीन स्कोअरिंग प्रणाली

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय बॅडमिंटनमध्ये जुलै २०२६ पासून नवीन स्कोअरिंग प्रणाली लागू होईल. यानुसार, गेम २१ ऐवजी १५ गुणांचे असतील. बॅडमिंटन असोसिएशन ऑफ इंडियाने गुरुवारी याची घोषणा केली. नवीन नियमांचा पहिला वापर ७ ते १४ जुलै दरम्यान एर्नाकुलम येथील प्रादेशिक क्रीडा केंद्रात होणाऱ्या ऑल इंडिया सीनियर रँकिंग स्पर्धेत केला जाईल.

हे स्वरूप सर्व विभागीय स्पर्धा, देशांतर्गत रँकिंग स्पर्धा आणि राष्ट्रीय स्पर्धांमध्ये लागू होईल. यात अंडर-११, अंडर-१३, अंडर-१५, अंडर-१७, अंडर-१९, सीनियर आणि मास्टर्स या सर्व वयोगटांचा समावेश असेल.



नवीन स्वरूपानुसार, सामने पूर्वीप्रमाणेच बेस्ट ऑफ-३ गेमचे असतील, परंतु आता प्रत्येक गेम २१ ऐवजी १५ गुणांचा असेल. १४-१४ अशी बरोबरी झाल्यास, २ गुणांची आघाडी आवश्यक असेल. जर स्कोअर २०-२० पर्यंत पोहोचला, तर पुढील गुण मिळवणारा खेळाडू गेम जिंकेल. म्हणजेच, प्रत्येक गेमची कमाल मर्यादा २१ गुण असेल.

आता मिड-गेम ब्रेक ११ गुणांऐवजी ८ गुणांवर मिळेल आणि तो ६० सेकंदांचा असेल. तिसऱ्या गेममध्ये खेळाडू ८ गुणांवर कोर्ट बदलतील. गेमच्या मधला १२० सेकंदांचा ब्रेक पूर्वीप्रमाणेच सुरू राहील आणि मागील गेमचा विजेताच पुढील गेममध्ये पहिली सर्व्हिस करेल.

### दक्षिण मुंबईत रंगणार कॅरम उत्सव

**| मुंबई | प्रतिनिधी |**

दक्षिण मुंबईतील कॅरमपटूंना आपल्या कौशल्याचा ठसा उमटविण्याची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. हिंदू हृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त खासदार अरविंद सावंत आणि जाणीव ट्रस्ट यांच्या पुढाकाराने तसेच मुंबई डिस्ट्रिक्ट कॅरम असोसिएशन यांच्या सहकार्याने भव्य रोख पारितोषिकांच्या कॅरम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ११, १२ जुलै रोजी समाज मंदिर वातानुकूलित सभागृह, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई येथे ही स्पर्धा रंगणार असून दक्षिण मुंबईतील कॅरमप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## लॅमॉन्ट जेकब्स ठरला १०० मीटरची शर्यतीत वेगवान धावपटू

**ऑस्ट्रियन ओपनमध्ये कारकिर्दीतील नोंदवली सर्वोत्तम वेळ**

**| आयझेनस्टाट | वृत्तसंस्था |**

इटलीचे स्प्रिंटर लॅमॉन्ट मार्सेल जेकब्सने १०० मीटरची शर्यत ९.६७ सेकंदात पूर्ण केली. ३१ वर्षीय जेकब्सने ऑस्ट्रियन ओपनमध्ये बुधवारी आपल्या कारकिर्दीतील सर्वोत्तम वेळ नोंदवली. मात्र, त्याची वेळ रेकॉर्ड बुकमध्ये नोंदवली जाऊ शकली नाही, कारण आयसेनस्टॉटमधील शर्यतीदरम्यान वाऱ्याचा वेग निर्धारित मर्यादेपेक्षा (+४.१ मीटर प्रति सेकंद टेलविंड) जास्त होता.




यामुळे जेकब्स कोणत्याही परिस्थितीत उसेन बोल्टनंतर जगातील सर्वात वेगवान धावपटू बनला आहे. बोल्टच्या नावावर ९.५८ सेकंदांचा जागतिक विक्रम आणि ९.६३ सेकंदांचा विंड-असिस्टेड वेळ नोंदवला आहे. बोल्टने २००९ च्या वर्ल्ड ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये जागतिक विक्रम केला होता.

जेकब्सची सुरुवात तितकी वेगवान नव्हती. सुरुवातीच्या मीटरमध्ये ब्रिटनचा रोमेल ग्लेव्ह आणि दक्षिण आफ्रिकेचा ४०० मीटर विश्वविक्रमधारक वेड वॅन नीकेर्क त्याच्या पुढे होते. पण, वेग पकडल्यानंतर जेकब्सने पुनरागमन केले आणि जवळपास एक मीटरच्या फरकाने विजय मिळवला.

ब्रिटनचा रोमेल ग्लेव्ह ९.७६ सेकंदांसह दुसऱ्या स्थानावर, वेड वॅन नीकेर्क ९.८३ सेकंदांसह तिसऱ्या स्थानावर राहिला. जपानचा योशिहिदे किर्यू ९.९९ सेकंदांसह चौथ्या, जर्मनीचा ओवेन अंसाह १०.०० सेकंदांसह पाचव्या स्थानावर राहिला.

### सेरेनाचा पहिल्याच फेरीत पराभव



**| लंडन | वृत्तसंस्था |**

अमेरिकन टेनिसपटू सेरेना विल्यम्सचे जवळपास चार वर्षांनंतर एकेरीतील बहुप्रतिक्षित पुनरागमन अयशस्वी ठरले. सात वेळा विम्बल्डन चॅम्पियन राहिलेल्या सेरेनाला पहिल्याच फेरीत ऑस्ट्रेलियाच्या २० वर्षीय माया जॉइंटने ६-३, ६-७ (६), ६-३ ने पराभव स्वीकारावा लागला. सेरेना २०२२ च्या यूएस ओपननंतर प्रथमच एकेरीचा सामना खेळली. दीर्घकाळच्या अनुपस्थितीमुळे, तिचे कोणतेही एकेरी रँकिंग नव्हते आणि तिला वाइल्ड कार्डद्वारे विम्बल्डनमध्ये प्रवेश देण्यात आला होता. सेरेनाने नेहमीप्रमाणे वेगवान सर्व्हिस आणि शक्तीशाली ग्राउंडस्ट्रोकचे प्रदर्शन केले असले तरी, जागतिक क्रमवारीत ८७ व्या क्रमांकावर असलेल्या माया जॉइंटने निर्णायक क्षणी आपला खेळ उंचावत सामना जिंकला.

**१४ सुवर्ण, ७ रौप्यपदक,१६ कांस्यपदके | १९०० खेळाडूंचा सहभाग**

## पिंच्याक सिलॅट स्पर्धेत महाराष्ट्राला विजेतेपद

**| नाशिक | प्रतिनिधी |**

१४ व्या राष्ट्रीय स्तरीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेचे आयोजन इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनच्या मार्गदर्शनाने महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोशियनने छत्रपती संभाजीनगर मार्गावरील जनार्दन स्वामी आश्रमाच्या सर्वेश्वर महादेव ट्रस्टच्या इनडोअर हॉल येथे केले होते. सिंगा, मकान, प्रि टिन, सब ज्युनियर व ज्युनियर या वयोगटातील खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये २८ राज्य व ८ केंद्र शासित प्रदेशातील १९०० खेळाडू सहभागी झाले. १४ सुवर्ण, ७ रौप्यपदक,१६ कांस्यपदक मिळवून महाराष्ट्र राज्याने या स्पर्धेत प्रथम क्रमांकाची ट्रॉफी मिळवत विजेतेपदाला गवसणी घेतली.




स्पर्धेचे उद्घाटन २८ जून रोजी करण्यात आले होते. या सोहळयास पिंपळगाव मर्चंट बँकेचे सीईओ भोजराज जैन, इंडियन पिंच्याक सिल्याट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवले, सचिव तारीख जर्गर आदी मान्यवर उपस्थित होते.

१४ सुवर्ण, ७ रौप्यपदक,१६ कांस्यपदक मिळवून महाराष्ट्र राज्याने प्रथम क्रमांकाची ट्रॉफी मिळवून आपले स्थान अबाधित ठेवले.

१० सुवर्ण, ४ रौप्यपदक, २ कांस्यपदक मिळवून उत्तराखंड राज्याने दुसऱ्या क्रमांचे स्थान मिळवले. ९ सुवर्ण,१४ रौप्य,१७ कांस्यपदक मिळवून जम्मू आणि काश्मीर राज्याने तिसऱ्या क्रमांकावर होते. आणि ७ सुवर्ण, ६ रौप्य आणि ७ कांस्यपदके मिळवून ओडिसा राज्याने चौथा क्रमांक पटकावला.

तसेच उत्कृष्ट खेळाडू रुद्र येवले महाराष्ट्र, इंद्रा बनसोडे महाराष्ट्र, निर्मयी भानुशाली महाराष्ट्र, दनस्वी शर्मा दिल्ली, अहमद ताह, मोहम्मद अलीम जम्मू आणि काश्मीर, आदिना नईम छत्तीसगड, सुजित चंदिगढ या खेळाडूंना गौरवण्यात आले.

इंडियन पिंच्याक सिल्याट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवले यांनी खेळाडूंचे कौतुक केले व पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेकरिता केतन गुंजाळ, निलेश गाढवे, लक्ष्मण दातीर, नागेश बनसोडे, योगेश पानपाटील, आकाश धबडगे, धनंजय जगताप, अंशुल कांबळे, अनुज सरनाईक, संकेत धामणे, सुरेखा येवले, भरत जाधव, गौतम केदारे, अमोल कदम, अरविंद शिर्के, अश्विनी राऊत, पल्लवी म्हात्रे, पौर्णिमा तेली यांचे सहकार्य लाभले. स्पर्धा अतिशय उत्साहात पार पडली. महाराष्ट्र पिंच्याक सिल्याटचे पदाधिकारी तृप्ती बनसोडे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028

दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.

■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**

(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)